म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. नं. ८८



REFBK-0019385

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं० ३८४
ठाणे सन १९

गायकवाड सरकारचे दिवाण

बाबाजी आपाजी फणसे

यांची बखर.

यादी घराण्यांची हकीकत. खासगत. भास्करराव विठ्ठल खासगीवाले मुकाम बडोदे, प्रांतगुजराथ. श्रीमंत राजमान्यराजश्री सेनापति साहेब यांजकडोन सरक्युलर नंबर १८ तारिख १७ माहे एप्रिल सन १८८६ जाहल्या लगत, फडणिस साहेब याजकडोन नंबर २७७ तारिख ११ जून सन मजकुरचे लिहून आल्यावरून. श्रीमंत सरकार महाराज साहेबांचे सेवेशीं हकीकत लिहून देण्यांत येते ती खालीं लिहिल्याप्रमाणें– आमचे आजे तिर्थस्वरूप कैलासवासी रखमाजी जोती उर्फ बाबाजी आपाजी यांचे सख्खे वडील बंधू भास्कर जोती उर्फ रावजी आपाजी. या उभयतांचे पणजे तिर्थस्वरूप कैलासवासी प्रयागजी अनंत फणसे कुळकर्णी मौजे कळंबें तर्फ परळी प्रांत सातारा–पनवेलकर हे श्रीमंत शाहु माहाराज छत्रपती स्वामी साहेबांचे शेवेसीं परम दक्ष व हुशार, बोलणारे, लिहिणारे, शाहाणे, शूरमर्द महाराजांही पाहून किल्ले सातारा व किल्ले परळी येथील सुभेदारीची सनद शके १५७१ चे सालीं करून दिल्ही. नंतर मौजे कळंबें तालुका परळी प्रांत सातारा. हा कुळकरणाचा गांव दरोबस्त त्यांस वंशपरंपरेनें इनाम देऊन सनदा पत्रें करून दिलीं – त्या अस्सल सनदापत्राच्या प्रती खालीं लिहिल्या प्रमाणें—

श्रीमंत महाराज मातुश्री आई साहेब यांणी राजश्री अंताजी प्रयाग प्रभू यांसी दिल्हें इनामपत्र ऐसिजेः तुह्मी हुजूर साताऱ्यास मुक्काम देऊन साहेबासंनिध विनंती केली कीं मौजे कळंबे तर्फ परळी प्रांत सातारा

हा गांव पूर्वी कैलासवासी महाराज स्वामी यांणी आपले बाप प्रयागजी अनंत यांसी स्वराज्य मोंगलाई एकुण दुतर्फा देखील इनाम तिजाई व बाबती, कुलबाब, कुलकानू, हल्लीं पट्टी व पेस्तर पट्टी, जल, तरू, तृण, कांष्ठ, पाषाण, निधीनिक्षेप सहीत, खेरीज हक्कदार व इनामदार करून वंशपरंपरेनें इनामकरून दिला. त्याणीं अनुभविला. त्यास आपले बापाचें देहअवसान जाहालीयावरी महाराजस्वामीनीं मौजेमजकूर आपणास पूर्ववतप्रमाणें इनामकरार करून पत्रें करून दिल्हीं. त्याप्रमाणें हल्लीं आपण इनाम अनुभवित आहां. त्यास मौजेमजकुरीं आपला कुळकर्णाचा गांव तेथें वतन घरवाडा होता. मध्यें सर्व बिशाद व कागदपत्र होते. त्यास घरास अग्न लागोन घर दग्ध जाहालें. त्यामध्यें सर्व विषय व कागदपत्रही जळाले. त्यांस भोगवटीयास कागद पत्र पाहिजेत. तरी महाराज साहेबीं कृपाळू होऊन पत्रें करून देऊन वंशपरंपरेनें इनाम चालविला पाहिजे म्हणून विदित केलें. त्याजवरून मनांस आणून तुह्मी पुरातन सेवक. तुमचे बापानें साहेबांची निष्ठेनें सेवा केली. हल्लीं तुह्मीही निष्ठेनें सेवा करीत आहां. तुमचे वंशपरंपरेनें चालविणें अवश्यक जाणून साहेब तुह्मावर कृपाळू होऊन मौजेमजकूर पूर्ववत प्रमाणें स्वराज्य व मोंगलाई अंमल येकूण दुतर्फा देखील इनाम तिजाई व बाबती, कुलबाब, कुलकानू, हल्लीं पट्टी व पेस्तर पट्टी, जल,तरू, तृण, काष्ठ, पाषाण, निधीनिक्षेपसहित चतुःसिमा पूर्वमर्याद प्रमाणें खेरिज हक्कदार व इनामदार करून दिला असे. तरी तुह्मी मौजेमजकुरीं सदरहु प्रमाणें आपले वंशपरंपरेनें इनाम अनुभवून सुखरूप राहणें. जाणिजे. छ २९ माहे रजब .सुरूसन सलास खमसेन मयातेन व अल्लफ लेखनालंकार

मोर्तब

नं. २५६
सन १८९

श्री

आज्ञापत्र समस्त राज कार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाळाजी पंडित प्रधान ताा. मोकदम मौजे कळंबे तर्फ परळी सुरूसन सितेज. मया व आल्फ मौजे मजकूर, पेशजी पासून राजश्री जोंती अनंत सुभेदार माजी किल्हे सातारा यांजकडून हुजुरून इनाम चालत आहे. त्यांस सालगुदस्त मशारनिल्हे कडून. मौजे मजकूर दूर करून सरकारांत जप्त करून सरकारतर्फेनें राजश्री गोविंदराव मोरेश्वर यांस कमाविस सांगितली होती त्यांस मशारनिल्हेवर कृपाळू होऊन मौजे मजकुरचा अम्मल पूर्ववत प्रमाणें करार करून देऊन सनद सादर केली असे. तरी तुम्ही मशारनिल्हेसी रूजू होऊन मौजे मजकुरचा अम्मल पूर्ववत प्रमाणें वसूल सुरळीत देणें. गोविंदराव मोरेश्वर यांकडे वसूल न देणें. जाणिजे. छ. १४ मोहरम या हुजूर.

लेखन सीमा

श्री

श्रीगजानन
चरणीतत्पर
गोविंदराव मोरेश्वर

स्वारी राजश्री गोविंदराव मोरेश्वर दि० रा० पंत— प्रधान ताा मुकदम मौजे कळंबे तर्फ परळी सुरू सन सितेन मय्या आल्फ मौजे मजकूर राजश्री जोती अनंत सुभेदार माजी किल्हे हा गांव सातारा याजकडे

हुजूर इनाम पेशजी पासून चालत आहे. तो साल मजकूरीं सरकारांत जप्तकेला होता, त्याची जप्ती—मोकळी करून मशारनिल्हेकडे पूर्ववत प्रमाणें करार केला असे. तरी मशारनिल्हेस रूजू होऊन सुरळीत वसुल देणें जाणिजे छ १४ मोहरम- मोर्तब सु०

लेखन सिमा

राजाराम नरपति यासन्निहित बाळा जी बाजीराव.

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाळाजीपंडित प्रधान ताा मोकदम मौजे कळंबे ताा परळी सुरूसन सितेन मय्या तेन अल्फ मौजे मजकूर पेशजी पासून राजश्री जोती अनंत सुभेदार माजी किल्ले सातारा यांकडे हुजुरून इनाम चालत आहे. त्यास सालगुदस्त मशारनिल्हे कडोन मौजे मजकूर दूर करून सरकारांत जप्त करून सरकार तर्फेनें राजश्री गोविंदराव मोरेश्वर यांस कमाविस सांगितली होती. त्यांस मशारनिल्हे वर कृपाळू होऊन मौजे मजकुरचा अमल पूर्ववत प्रमाणें करार करून देऊन सनद सादर केली असे. तरी तुह्मीं मशारनिल्हेसी रूजू होऊन मौजे मजकुरचा अमल वसूल पूर्ववत प्रमाणें वसूल सुरळीत देणें गोविंदराव मोरेश्वर यांजकडे वसूल न देणें. जाणिजे. छ १४ मोहरम याहुनुर.

लेखन सीमा

श्री

शीक्का छत्रपती

स्वस्ति राज्याभिषेक शके ९० सुभानु नाम संवत्सरे जेष्ठ वद्य

१० रविवार सर क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति स्वामी यांणीं राजश्री जोती अनंत प्रभू यासी दिल्हें इनामपत्र. ऐसिजे तुह्मी हुजूर शाहु नगर नजिक किल्हे सातारा येथील मुकामीं स्वामी संनिध येऊन विनंती केली कीं. कैलासवासी माहाराज- स्वामी यांनीं आपले आजे प्रयाग अनंत यांसी मौजे कळंबे तर्फ परळी प्रांत सातारा. हा गांव स्वराज्य व मोंगलाई येकूण दुतर्फा देखील इनाम, तिजाई, बाबती, व कुल बाब, व कुलकानू हल्लीं पट्टी व पेस्तरपट्टी, जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेप सहित खेरीज हक्कदार व इनामदार करून वंशपरंपरेनें इनाम देऊन पत्रें करून दिल्हीं. त्या उपरी आपले आजे त्यांचे देह आवसान जाहाली- याजवरी कैलासवासी महाराज स्वामीनीं तुह्मावरी कृपाळु होवून तुमचे आजे प्रयाग अनंत यांसी कैलासवासी महाराज यांणीं मौजे मजकूर स्वराज्य व मोंगलाई येकूण दुतर्फा देखील इनाम तिजाई व बाबती कुलबाब व कुलकानु हल्लीं पट्टी व पेस्तर पट्टी जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण, निधि, निक्षेपसहित खेरीज हक्कदार व इनामदार करून वंश परंपरेनें इनाम देऊन, पत्रें करून दिल्ही. त्या प्रमाणें अनुभवित असतां तुमचे आजे मृत्यु पावले. त्याउपर तुमचे बाप अंताजी प्रयाग यांस कैलासवासी महाराज यांणीं पूर्ववत प्रमाणें मौजेमजकूर इनाम करार करून पत्रें करून दिल्हीं, त्याप्रमाणें अनुभवीत असतां मौजे मजकुरीं तुमचा वतनी वाडा यांस आग्न लागून दग्ध झाला. त्यामध्यें सर्व विशाद व कागद पत्र जळाले, त्यामध्यें मौजे मजकुरची पत्रें ही दग्ध झाली. याजकरितां कैलासवासो मातोश्री यांणी भोगवटी यास वंशपरंपरेनें पत्रें करून दिल्ही. त्याप्रमाणें तुम्ही अनुभवित आहां. तुमचे बाप अंताजि प्रयाग मृत्यु पावले. हल्लीं मौजे मजकुरीं स्वराज्य व मोंगलाई येकूण दुतर्फा देखील इनाम तिजाई, व बाबती, कुल बाब व कुल कानू, हल्लीं पट्टी व पेस्तर पट्टी, जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेपस-

हित खेरीज हक्कदार व इनामदार करून तुह्मास तुमचे पुत्रपौत्रादिवंशपरंपरेनें इनाम करार करून दिल्हा असे. तरी तुह्मी मौजे मजकुर सदरहु चतुःसिमा पूर्व मर्यादे प्रमाणें तुह्मी व तुमचे वंशपरंपरेनें इनाम अनुभवून सुखरूप राहणें – जाणिजे. लेखनालंकार

शिक्का. रूजु
मंत्री सरकार

ता २२ माहे जिलकाज–
सुरूसन आर्बा सितेन मय्या अलफ़

शीक्का
छत्रपति.

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ९० सुभानु नाम संवत्सरे – जेष्ठ वद्य १० रविवासरे – क्षेत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती स्वामी यांसी. समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री नारोपंडित प्रतिनिधी यांस आज्ञा केली ऐशीजे. राजश्री जोती अनंत प्रभू यांस हुजूर शाहु नगर नजीक किल्ले सातारा येथील मुक्कामीं स्वामी संनिध येऊन विनंती केली कीं, कैलासवासी यांसी आपले आजे प्रयाग अनंत यांसी मौजे कळंबें तालूके परळी हा गांव स्वराज्य व मोंगलाई येकूण दुतर्फा देखील इनाम, तिजाई व बावती, कुल बाव व कुलकानु, हल्ली पट्टी व पेस्तरपट्टी, जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण, निधीनिक्षेपसहित खेरिज हक्कदार व इनामदार करून वंशपरंपरेनें इनाम देऊन पत्रें करून दिल्हीं. त्या उपरी आपले आजे यांचे देह आवसान जाहलीयाजवरी कैलासवासी महाराज स्वामीनीं आपले तिर्थस्वरूप अंताजी प्रयाग

यांस मौजे मजकुर वंशपरंपरेनें ईनाम करार करून पत्रें करून दिल्हीं. त्याप्रमाणें अनुभवीत असतां मौजे मजकूर आपला कुळकर्णाचा गांव तेथें वतनी घरवाडा होता तेथें सर्व बिशाद व कागदपत्र होते. त्यास घरास आग लागून दग्ध जाहले त्यामध्यें सर्व बिशाद व कागदपत्र दग्ध जाहले. हें वर्तमान कैलासवासी मातोश्री यांसी निवेदन केलें, त्याणीं कृपाळू होऊन आपले तिर्थस्वरूप अंताजी प्रयाग यांस मौजे मजकुर सदरहुप्रमाणें करार करून छ २९ रज्जब सुरू सन सल्लास खमसैन यासालीं इनाम पत्रें करून दिल्हीं, त्या प्रमाणें आपण इनाम अनुभवीत अहां त्यास आपले तिर्थरूप अंताजी प्रयाग यांचे देहअवसान झालें. तरी हल्लीं स्वामीनीं कृपाळू होऊन भोगवटी यांस आपले नावें इनाम पत्रें करून देऊन वंशपरंपरेनें इनाम चालविला पाहिजे म्हणून विदित करून कैलासवासी मातोश्री यांची पत्रें असलीं दाखविलीं. तीं मनास आणून हे पुरातन राज्यांतील एकनिष्ठ सेवक निष्ठेनें सेवा करीत आहेत, यांचे वंशपरंपरेनें चालविणें आवश्यक जाणून स्वामी याजवरी कृपाळू होऊन यांचें आजे प्रयाग अनंत यांस कैलासवासी महाराज यांणीं मौजे मजकूर स्वराज्य व मोंगलाई येकूण दुतर्फा देखील इनाम तिजाई बावती, कुलकानु, हल्लींपट्टी, पेस्तरपट्टि, जल, तरू, तृण, काष्ट, पाषाण, निधीनिक्षेपसहित खेरिज हक्कदार व इनामदार करून वंशपरंपरेनें इनाम देऊन पत्रें करून दिल्हीं. त्याप्रमाणें अनुभवीत असतां त्यांचे आजे मृत्यु पावले. त्या उपरी यांचे बाप अंताजी प्रयाग यांसी कैलासवासी यांणीं पुर्ववत प्रमाणें मौजे मजकूर इनाम करार करून पत्रें करून दिल्ही. त्या प्रमाणें अनुभवीत असतां, मौजे मजकुरीं यांचा वतनी वाडा यासी अग्न लागोन दग्ध जाहला. त्यामध्यें सर्व हिशोब व कागदपत्र जळाले. त्यामध्यें मौजे मजकूरचीं पत्रेंही दग्ध जाहलीं, याजकरितां कैलासवासी मातुश्री–यांणी भोगवटयास वंशपरंपरेनें पत्रें करून दिल्हीं, त्याप्रमाणें हे अनुभवित आहेत. यांचे बाप अंताजी प्रयाग

मृत्यु पावले. हल्लीं मौजे मजकूर स्वराज्य मौंगलाई एकूण दुतर्फा दिलेलें इनाम व तिजाई व बाबती, कुलबाब व कुल कानु, हल्लींपट्टी व पेस्तरपट्टी, जल, तरू, तृण, काष्ट, पाषाण, निधिनिक्षेपसहित खेरीज हक्कदार व इनामदार करून त्याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम करार करून दिल्हा असे, तरी तुह्मीं मौजे मजकूर सदरहु चतुःसिमा पूर्व मर्यादेप्रमाणें यासीं व यांचे वंशपरंपरेनें इनाम चालविणें. प्रतिवर्षीं नवीन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रत लिहून हे पत्र भोगवटीयास यांजजवळ परतोन देणें जाणिजे. बहुतां लिहीणें तरी सुज्ञ असा. बार बार बार बार.

शिक्का.

रूजू.
सुमंत मंत्री सरकार.

तारीख २२ माहे जिलकाद
सुरू सन आर्बा शितेन मय्या
अल्फ


श्री

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान मोकदम मौजे कळंबें तर्फ परळी सुरूसन सब्बाशितेन मय्या व अल्फ. श्री यवतेश्वर येथील ब्राह्मण संतर्पणास मौजे मजकुरचे सरदेशमुखीचे ऐवजीं रूपये तीस सालाबाद राजश्री जोती अनंत यांजकडे पावतात. त्याप्रमाणें करार असे. तरी तुह्मी सालाबादप्रमाणें सदरहु नेमणूक मशारनिल्हेकडे पावणें गुदस्तांचा ऐवज राहिला असेल तोही देणें. जाणिजे छ २८ सफर आज्ञा प्रमाण

लेखन सीमा

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शेके ९० सुभानु नाम संवत्सरे- जेष्ठ वद्य दशमी रविवार- क्षेत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती स्वामी यांणीं- देशमुख व देशपांडे तर्फ परळी प्रांत सातारा यांसीं



आज्ञा केली ऐशीजे- राजश्री जोती अनंत प्रभु यांणीं हुजूर शाहुनगर नजीक किल्ले सातारा येथील मुक्कामीं स्वामी संनिध येऊन विनंती केली कीं, कैलासवासी यांणीं आपले आजे प्रयाग अनंत यांस मौजे कळंबें ता० मजकूर हा गांव स्वराज्य व मोंगलाई एकूण दूतर्फा देखील इनाम तिजाई व बाबती, कुलबाब, कुलकानू, हल्लींपट्टी व पेस्तरपट्टी, जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेपसहित, खेरीज हक्कदार व इनामदार करून वंशपरंपरेनें इनाम देऊन पत्रें करून दिल्हीं. त्या उपरी आपले आजे यांचें देहावसान जाहल्यावर कैलासवासी महाराज स्वामींनीं आपले तिर्थरूप अंताजी प्रयाग यांस मौजे मजकूर वंशपरंपरेनें इनाम करार करून पत्रें करून दिल्हीं. त्याप्रमाणें अनुभवित असतां मौजे मजकुरीं आपला कुळकर्णाचा गांव तेथें वतनी घरवाडा होता तेथें सर्व बिशाद व कागद पत्र होते त्यास घरास अग्न लागून दग्ध जाहलें. त्या मध्यें सर्व विषय व कागद पत्र ही दग्ध जाहले. हें वर्तमान कैलासवासी मातुश्री यांस निवेदन केलें. त्यांणीं कृपाळू होऊन आपले तिर्थरूप अंताजी प्रयाग यांस मौजे मजकूर सदरहु प्रमाणें करार करून छ २९ रजब सुरूसन सल्लास खमसेन या सालीं इनाम पत्रें करून दिल्हीं. त्या प्रमाणें आपण इनाम अनुभवीत आहां, त्यास आपले तिर्थरूप अंताजी प्रयाग यांचें देहावसान जाहलें तरी हल्लीं स्वामींनीं कृपाळु होऊन भोगवटयास आपले नावें इनाम पत्रें करून देऊन वंशपरंपरेनें इनाम चालविला पाहिजे. विदित करून कैलासवासी मातुश्री यांचीं पत्रें आणून


दाखविलीं, तीं मनास आणून हे राज्यांतील पुरातन एकनिष्ठ सेवक निष्ठेनें सेवा करीत आहेत. यांचे वंशपरंपरेनें चालविणें अवश्यक जाणून स्वामी यांजवरी कृपाळू होऊन यांचे आजे प्रयाग अनंत यांस कैलासवासी महाराज यांणीं मौजे मजकूर स्वराज्य व मोंगलाई एकूण दुतर्फा देखील इनाम, तिजाई व बाबती, कुलबाब, कुलकानू, हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी, जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण निधिनिक्षेपसहित खेरीज हक्कदार व इनामदार करून वंशपरंपरेनें इनाम देऊन पत्रें करून दिल्हीं. त्याप्रमाणें अनुभवित असतां यांचे आजे मृत्यु पावले. त्या उपरी यांचे बाप अंताजी प्रयाग यांस कैलासवासी यांणीं पुर्ववत प्रमाणें मौजे मजकूर इनाम करार करून पत्रें करून दिल्हीं. त्या प्रमाणें मौजे मजकुरीं यांचा वतनीवाडा यास अग्न लागून दग्ध जाहला. त्यामध्यें सर्व बिशाद व कागद पत्र जळाले. त्या मध्यें मौजे मजकुरचीं पत्रेंही दग्ध जाहलीं. याजकरितां कैलासवासी मातुश्री यांणीं भोगवटयास वंशपरंपरेनें जीं पत्रें करून दिल्हीं. त्याप्रमाणें हे अनुभवित आहेत. यांचे बाप अंताजी प्रयाग मृत्यु पावले. हल्लीं मौजे मजकूर स्वराज्य व मोंगलाई व दुतर्फा देखील इनाम तिजाई व बाबती, कुलाबाब, कुलाकानू, हल्लीपट्टी, व पेस्तरपट्टी, जला तरू, तृण, काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेपसहित-खेरीज हक्कदार व इनामदार करून यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम करार करून दिल्हा असे. तरी तुह्मी मौजे मजकूर सदरहु चतुःसीमा पूर्वमर्यादे प्रमाणें यांसीं व यांचे वंशपरंपरेनें इनाम चालविणें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रत लिहूनघेऊन हें पत्र भोगवटयास यां जवळ परतोन देणें-जाणिजे. लेखनालंकार.

शिक्का.

रूजू. संमत. संमत. संमत.
सुमंत. मंत्री. सरकार.
बार.

श्री.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शेके ९० सुभानु नाम संवत्सरे. जेष्ट वद्य १० रविवार क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती स्वामीं यांणीं



मोकदम मौजे कळंबें तर्फ परळी प्रांत सातारा यांसीं.

आज्ञा केली ऐशीजे. राजश्री जोती अनंत प्रभू यांणीं हुजूर शाहूनगर नजीक किल्हे सातारा येथील मुक्कामीं स्वामी संनिध येऊन विनंती केली कीं, कैलासवासी महाराज यांणीं आपले आजे प्रयाग अनंत यांसीं मौजे मजकूर स्वाराज्य व मोंगलाई एकूण दुर्तफा देखील इनाम तिजाई व बाबती, कुलाबाब, कुलाकानू, हल्लींपट्टी व पेस्तरपट्टी, जल, तरू, तृण, काष्ठ पाण, निधि निक्षेप सहित- खेरीज हक्कदार व इनामदार करून वंशपरंपरेनें इनाम देऊन पत्रें करून दिल्हीं, त्या उपरी आपले आजे यांचें देहावसान जाहल्यावर कैलासवासी महाराज स्वामी आपले तिर्थरूप अंताजी प्रयाग यांसीं मौजे मजकूर वंशपरंपरेनें इनाम करार करून पत्रेंकरून दिल्हीं, त्याप्रमाणें अनुभवित असतां, मौजे मजकूर आमला कुळकर्णाचा गांव तेथें वतनी घरवाडा होता. तेथें सर्व बिशाद व कागदपत्र होते, त्या घरास अग्न लागून दग्ध जाहलें. त्या मध्यें सर्वविषय, कागदपत्र दग्ध जाहले, हें वर्तमान कैलासवासी मातुश्री यांसीं निवेदन केलें. त्यांणीं कृपाळू होऊन आपले तिर्थरूप अंताजी प्रयाग यांसीं मौजे मजकूर सदरहु प्रमाणें करार करून छ २९ रजब सुरूसन सल्लास खमसेन या सालीं इनाम पत्रें करून दिल्हीं, त्या प्रमाणें आपण इनाम अनुभवित आहां. त्यास आपले तिर्थरूप अंताजी प्रयाग यांचें देहावसान जाहलें तरी हल्लीं स्वामींनीं कृपाळू होऊन भोगवट्यास आपले नावें इनाम पत्रें करून देऊन वंशपरंपरेनें इनाम चालविला पाहिजे म्हणून विदित करून कैला-

सवासी मातुश्री यांची पत्रें आणून दाखविलीं, तीं मनास आणून हे राज्यांतील पुरातन एकनिष्ठेनें सेवा करीत आहेत. यांचे वंशपरंपरेनें चालविणें अवश्यक जाणून स्वामीं यांजवरी कृपाळू होऊन यांचे आजे प्रयाग अनंत यांसी कैलासवासी महाराज यांणीं मौजेमजकूर स्वराज्य व मोंगलाई एकूण दुतर्फा देखील इनाम तिजाई व बाबती, कुलाबाब, कुलाकानू, हल्लींपट्टी व पेस्तरपट्टी, जल, तरू, तृण, काष्ठपाषाण, निधिनिक्षेपसहित खेरीज हक्कदारव इनामदार करून वंशपरंपरेनें इनाम देऊन पत्रें करून दिल्हीं. त्याप्रमाणें अनुभवित असतां यांचे आजे मृत्यु पावले– त्याउपरी यांचे अंताजी प्रयाग यांसीं कैलासवासी यांणीं पूर्ववत प्रमाणें मौजेमजकूर इनाम करार करून पत्रें करून दिल्हीं. त्याप्रमाणें अनुभवित असतां मौजेमजकुरीं यांचा वतनी वाडा यासीं अमलागोन दग्ध जाहला. त्यामध्यें सर्व बिशाद व कागदपत्र जळाले त्यामध्यें मौजेमजकूरचीं पत्रेंही दग्ध जाहलीं. याजकरितां कैलासवासी मातुश्री यांणीं भोगवटयास वंशपरंपरेनें पत्रें करून दिल्हीं, त्याप्रमाणें हे अनुभवित आहेत. यांचे बाप अंताजी प्रयाग मृत्यु पावले. हल्लीं मौजेमजकूर स्वराज्य मोंगलाई एकूण दुतर्फा दिल्हेलें इनाम व तिजाई व बाबती, कुळबाब व कुळकानु, हल्लींपट्टी व पेस्तरपट्टी, जल, तरू, तृण, काष्ठ पाषाण, निधिनिक्षेपसहित-खेरीज हक्कदार व इनामदार करून त्यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम करार करून दिला असे. तरी तुह्मी यांचे आज्ञेंत वर्तोन मौजेमजकूर चतुःसिमा पूर्वमर्यादा सदरहु प्रमाणें सालबार सालमासीं व यांचे वंशपरंपरेनें वसूल देत जाणें. प्रतिवर्षीं नवीन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची नकल लिहून घेऊन पत्र भोगवटयाबद्दल यांजपासीं परतोन देणें. जाणिजे लेखनालंकार

शिक्का

तारिख २२ माहे जिलकाद सुरु सन आर्बा सितेन मय्या अल्फ.— } रूजु. समंत. समंत. समंत. सुमंत मंत्री. सरकार

श्री

शिक्का

आज्ञापत्र राजश्री. पंतप्रधान ताहा मोकदम मौजे कळंबे तर्फ परळी प्रांत वांई सुरूसन सब्बा मय्या व अल्फ मौजे मजकूरीं येथील खालशाचा अम्मल राजश्री बाबुराव कृष्ण यांजकडे किल्ला सातारा येथील सरंजामास आहे तो, व सरदेशमुखी खेरीज श्री यवतेश्वरची नेमणुक सालाबादची करून खास पागेचे कमावीसदार राजश्री भवानीशंकर हैबतराव यांजकडे आहे, ती त्यांजकडून दूरकरून साल मजकूरपासून राजश्री जोती अनंत सुभेदार माजी किल्ले सातारा यांस बादल मुशारा साताऱ्याचे डोलाकडे नेमणूक आहे, त्या पैकीं करार करून देऊन ही सनद सादर केली असे; तरी यांशी रूजू होऊन मौजे मजकूर येथील सदरहु अमलापैकीं श्री येवतेश्वरची नेमणूक सालाबादची तीस रुपये खेरीज करून बाकी तींही अमलांचा वसूल दरसाल सुरळीत त्यांजकडे बादल मुशारा देतजाणें. जाणिजे. छ ११ सफर आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा

श्री

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्यराजश्री माहादाजी केशव गोसावी यांसीं, सेवक माधवराव नारायण प्रधान. नमस्कार सुरूसन सबां सुबाईन मय्या व अल्फ. मौजे कळंबें तर्फ परळी येथील सरदेशमुखीचा अम्मल तुह्मांकडे होता तो दूर करून राजश्री जोती अनंत सुभेदार

यांणी किल्ले सातारा याचा बादल मुशारा नेमणूक साताऱ्याचे डोलाकडे आहे, त्या पैकीं सालमजकुरा पासून सरंजाम करार करून देऊन पेशजी तुह्मास सनद सादर जाहली आहे, असें असतां सनदे प्रमाणें मौजे मजकूरचे सरदेशमुखीचा अम्मल सुरळीत देतनाहीं ह्मणून हुजुरीं विदित जहालें. त्याजवरून हें पत्र सादर केलें असे तरी पेशजीचे सनदे प्रमाणें सरदेशमुखीचा अम्मल मौजेमजकुरचा मशारनिल्हेकडे सुरळित देववणें तुह्मी दिलगिरी न करणे. येविशींचा फिरोन बोभाट येऊं न देणें जाणिजें छ २ रबिलाखर आज्ञाप्रमाण.

लेखन सिमा

श्री

आज्ञापत्र. राजश्री पंतप्रधान तहा मोकदम मौजे कळंबें तर्फ परळी प्रांत वाई सुरुसन सब्बां सब्बैन मय्या व अलफ. मौजे-मजकूर येथील खालशाचा व सरदेशमुखीचा व खास पागेचा अम्मल पेशजी कमाविसदाराकडून दूर करून राजश्री जोती अनंत सुभेदार माजी किल्ले सातारा याची बादल मुशाहिरा नेमणूक सातारचे डोलाकडे आहे, त्या ऐवजीं साल मजकूर पासून मौजे मजकुरचे सदरहु अम्मल करार करून देऊन पेशजी सनद सादर जाहली असतां सनदे प्रमाणें वसूल सूरळीत देत नाहीं ह्मणून हुजूर विदित जाहलें; त्याजवरून हें आज्ञापत्र सादर केलें असे, तरी पेशजीचे सनदे प्रमाणें सदरहु तीनही अमलांचा वसूल मशारनिल्हेकडे सुरळीत देत जाणें. येविशींचा फिरोन बोभाट न येऊं देणें. जाणिजे छ २ रबिलाखर. आज्ञा प्रमाण

लेखन सीमा

राजाराम नरपति
यासन्निहित बाळा-
जी बाजीराव.

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान तहामोकदम मौजेकळंबें तर्फ परळी सुरूसन समान सम्मानी मय्या व अलफ. मौजे मजकूर येथील खालसा व सरदेशमुखी व खास पाग; तीनही अम्मल जोती अनंत सुभेदार माजी किल्ले सातारा यांजकडे बादल मुशाहिरा चालत होते, त्यास ते मृत्यु पावले सबब त्यांचे पुत्र गंगाधर जोती सुभेदार माजी किल्ले मजकूर यांचे नावें करार केले असे. तरी मौजे मजकूर पैकीं खालसा व सरदेशमुखी व खासपाग या तीनही अंमल बादल मुशाहिरा पेशजी प्रमाणें यांजकडे वसूल देत जाणें. जाणिजे. छ २१ मोहरमपा० हुजूर

लेखन
सीमा

श्री

राजश्री गंगाधर जोती व सिताराम चिमणाजी ये. बिन जोती अनंत व भास्कर जोती व रखमाजी जोती गोसावि यांस.

अे० माधवराव नारायण प्रधान. आशिर्वाद सुरूसन शित्तेन मय्या व अलफ शेके १७१६ आनंद नाम संवत्सरे तुह्मी हुजुर कसबें पुणें येथील मुक्कामी येऊन विनंती केलीकीं, आपले पर्णजे प्रयागजी अनंत यांस श्रीमंत कैलासवाशी शाहुमहाराज छत्रपति-स्वामी यांणीं मौजे कळंबें ता० परळी प्रांत वांई हा गांव दरोबस्त कुलबाब, कुलकानू इनाम देऊन राज्य पत्रें करून दिल्हीं होतीं.

त्यास राज्यपत्रें आपले घरांत दग्ध जहालीं; यास्तव पूर्ववत प्रमाणें श्रीमंत कैलासवासी ताराबाई साहेब व राजाराम महाराज छत्रपति-स्वामी यांचीं राज्यपत्रें करून घेतलीं. परंतु गांवचा अंमल, जिल्हे-बाब व पांच विघे जमीन परशराम पंडित प्रतिनिधी यांजकडील. ते त्याणीं अंताजी वासुदेव यांस इनाम दिल्हें आहे. व खालसा, सरदेशमुखी व खास पागा हे अम्मल सरकारांत आहेत. मोकाशाचा अंमल मात्र आपले पणजे प्रयागजी अनंत याचा वंश सारे मिळून अनुभवित आहों. त्यांस स्वामीनीं कृपाळू होऊन जिल्हे बाबीचा अंमल व जमीन प्रतिनिधी यांजकडील त्यांचा आकार ३५० रुपये होतो. त्याचे मोबदला त्यांस देऊन जिल्हे बाबेचा अंमल; जमीन सुद्धा आह्मां चौघांभावांस नूतन इनाम सरकारांतून करार करून देऊन भोगवठ्यास पत्रें करून दिल्हींपाहिजेत;ह्मणून त्याजवरून मनास आणितां तुमचे पणजे प्रयाग अनंत यांचे नावें मौजे कळंबें ता।० परळी प्रांत वांई हा गांव दरोबस्त इनाम राज्यपत्रीं आहे, परंतु मोकाशाचा एक अंमल तु-ह्मांकडेस इनाम चालत आहे,त्यास तुह्मी स्वामी सेवा एकनिष्ठपणें बहुत दिवस केली. यास्तव तुमचें चालविणें जरून जाणून तुह्मावर कृपाळू होऊन मौजे मजकूर येथील खालसा व सरदेशमुखी व खासपागा हे सरकारी अंमल खेरीज करून जिल्हे बाबेचा अंमल व जमीन रा० परशराम पंडित प्रतिनिधि यांजकडून अंताजी वासुदेव यांस इनाम आहे, त्याचा आकार ३५० साडे तिनशें रुपये होतो. त्याचे मोबदला शेरें ता० होबळी परगणे कऱ्हाड पैकीं सदहु ऐवज त्यांस ला-वून देऊन मौजे मजकुरचा जिल्हे बाबेचा अंमल जमीन सुद्धां देखील इनाम तिजाईं दरोबस्त कुलबाब. कुलकानु, हल्लीं पट्टी व पेस्तर पट्टी खे-रीज हक्कदार व कदीम इनामदार करून सालमजकूरपासून तुह्मांस नूतन इनाम सरकारांतून करार करून दिल्हा असे. तरी मौजे मज-कुरचा जिल्हे बाबेचा अंमल जमीन सुद्धां सदरहु प्रमाणें तुह्मी व

तुमचें पुत्रपौत्रादिवंशपरंपरेनें इनाम अनुभवून सुखरूप राहणें. जाणिजे छ २ सवाल आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा

शिक्का.

छत्रपति स्वामी यांणीं

संवत् १८५०

श्री

रा०देशाधिकारी व लखना वर्तमान भा० ता।० परळी प्रांत वांई गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्रे० माधवराव नारायण प्रधान आशिर्वाद नमस्कार सुरुसन आर्बा सितेन व अलफ. शेकें १७१६ आनंद नाम संवत्सरे. रा० गंगाधर जोती व सिताराम चिमणाजी ये. बिन जोती अनंत व भास्कर जोती व रखमाजी जोती यांणीं हुजूर कसबें पुणें येथील मुक्कामीं येऊन विनंती केली कीं आपले पणजे प्रयाग अनंत यांस श्रीमंत कैलासवासी शाहुमहाराज छत्रपति स्वामी यांणीं मौजे कळंबें तर्फ मजकूर हा गांव दरोबस्त कुलबाब, कुलकानू इनाम देऊन राज्य पत्रें करून दिल्हीं होतीं त्यास राज्यपत्रें आपले घरांत दग्ध जाहलीं. यास्तव पूर्ववत प्रमाणें श्रीमंत कैलासवासी ताराबई साहेब व राजाराम महाराज छपत्रति स्वामी यांचीं राज्य पत्रें करून घेतलीं. परंतु गांवचा अंमल जिल्हेबाब व पांच बिघे जमीन रा० परशराम पंडित प्रतिनिधी यांज कडील ते त्यांणी अंताजी वासुदेव यांशीं इनाम दिल्ही आहे. व खालसा व सरदेशमुखी व खासबाग हे अंमल सरकारांत आहेत. मोकाशाचा अंमल मात्र आपले पणजे प्रयाग अनंत यांचा वंश सारे मिळून अनुभवित आहोंत.

त्यांस स्वामीनीं कृपाळू होऊन जिल्हे बावीचा अंमल व जमीन प्रतिनिधी कडील, त्याचा आकार ३५० साडे तिनशें होतो, त्याचे मोबदल्यास देऊन जिल्हे बावीचा अंमल जमीन सुद्धां आह्मां चौघां भावांस नूतन इनाम सरकारांतून करून देऊन भोगवट्याचीं पत्रें करून दिल्हीं पाहिजे. ह्मणून त्याजवरून मनास आणितां यांचे पणजे प्रयाग अनंत यांचे नावें मौजे मजकूर हा गांव दरोबस्त इनाम राज्य पत्रीं आहे. परंतु मोकाशाचा एक अंमल यांजकडे इनाम चालत आहे; त्यास यांणीं स्वामी सेवा एकनिष्ठपणें बहुत दिवस केली. यांचें चालविणें जरूर ह्मणून यांजवर कृपाळू होऊन मौजे मजकूर येथील खालसा व सरदेशमुखी व खासबाग हे सरकार अंमल खेरीज करून जिल्हे बावीचा अम्मल व जमीन परशराम पंडित प्रतिनिधी यांजकडून अंताजी वासुदेव यांसी इनाम आहेत. यांचा आकार ३५० साडेतिनशें रुपये होतो. याचे मोबदला मौजे शेरें तर्फ हवेली प्रांत कऱ्हाड पैकीं सदरहु ऐवज त्यांजकडे देववून मौजे मजकूरचा जिल्हे बावीचा अम्मल जमीन सुद्धां देखील इनाम तिजाई दरोबस्त कुलबाब, कुलकानू, हल्लींपट्टी व पेस्तरपट्टी खेरीज, हक्कदार व कदिम इनामदार करून साल मजकूर पासून दिल्हें असे. तरी मौजे मजकुरचा जिल्हेबाबेचा अम्मल जमीन सुद्धां सदरहु प्रमाणें यांस व यांचे पुत्रपौत्रादिवंशपरंपरेनें चालविणें. दरसाल नवीन पत्रांचा हुजूर न करणें. या पत्रांच्या प्रती लिहून घेऊन हें अस्सल पत्र यांज जवळ भोगवट्यास परतून देणें. जाणिजे छ २ शिक्का. शिवआज्ञाप्रमाण

लेखनसीमा.

श्री

संवत्
१८५१

अखंडित लक्ष्मी आळंकृत राजमान्यराजश्री गंगाधर जोती माजी सुभेदार किल्ले सातारा गोसावी यांस

स्ने० माधवराव नारायण प्रधान आशिर्वाद सुरुसन खमस तिसेन मय्या व अल्फ तुह्मास संसार बेगमीस मौजे आकले ता॥ सातारा येथील कुरणां पैकीं पंचवीस हजार गवत देतजाणें, ह्मणोन पुण्याहून रा० कृष्णराव अनंत यांच्या सनदा आल्या गवत पुडे सुमोरें

१०००० छ १ सब्बान सन इहिदे सितेन
१५००० छ २७ जमादिलखर सन आर्बा सितेन

२५०००

एकूण पंचवीस हजार गवत मौजे मजकूरचे कुरणां पैकीं दरसाल देत जाणें. ह्मणून त्यावरून पंचवीस हजार गवताचें रान कुरणां तील तुह्मास नेमून दिल्हें, त्याची चतुःसिमा पूर्वेस कृष्णाजी जग न्नाथ संस्थान धावडशी यांस चांभार पेंडा नेमून दिल्हा आहे त्याची हद्द, व पश्चिमेकडील भेरू लिंगाचे कडयाचे माथा ओघळ आहे, त्याचे खालीं धोंडा आहे, त्याचे खालीं निवडुंगाची जाल नाकाडीवरील, त्याचे खालीं ओघळ, त्याचे खालीं तळवटेस टेंबी ओघळीचे पूर्वेस आहे, ती येणें प्रमाणें पंचवीस हजारांचे रान नेमून दिल्हें असे. तरी तुह्मी सदरहु हद्दीप्रमाणें कुरणाची राखण करून सालदरसाल गवत कापून नेत जाणें. गवताचे चतुःसिमेचें रान कुरणाकडील व सरकारचे कारकून पाठवून नेमून दिल्हें, त्याची चौकशी दोन तीन वर्षें कारकून पाठवून केली. त्यास गवत पंचवीस हजारांत कमीच निघत गेलें. पंचवीस हजारास जाजती निघाल्यास सरकारांत द्यावें. जाणिजे छ०७र०पा०हुजूर.

लेखन सीमा.

श्री

संवत्
१८५३

आज्ञापत्र– राजश्री पंतप्रधान तहामोकदम मौजे कळंबें ता० परळी सुरूसन सबां सितेन मय्याअलफ श्री यवतेश्वर येथील ब्राह्मणसंतर्पणास मौजे मजकुरचे सरदेशमुखीचे ऐवजीं रूपये तीस सालाबाद रा० जोती अनंत याजकडे पावतात, त्याप्रमाणें करार आहेत, तरी तुह्मी सालाबाद प्रमाणें सदरहु नेमणूक मशार निल्हे कडे पावत्रणें. गुदस्तांचा ऐवज राहिला असेल तोही देणें जाणिजे. छ २८ सफर आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा

श्री

संवत् १८६७

आज्ञापत्र रा० पंत प्रधान तहामोकदम मौजे कळंबें ता० परळी सूरूसन इहिदे अशर मय्यातेन व अलफ मौजे मजकूर येथील खालसा व सरदेशमुखी व खासबाग एकूण तीन अंमल प्रांत वांई पैकीं गंगाधर जोती सुभेदार माजी किल्ले सातारा यांजकडे बादल मुषाहिरा चालत आहे. त्यास ते वृद्ध जाहले सबब सिताराम भास्कर मशारनिल्हेचे पुतणे यांजकडे सदरहु तीन अंमल करार करून दिले असत. तरी गंगाधर जोती यांजकडे मौजे मजकूर पैकीं खालसा व सरदेशमुखी व खासबाग पेशजी चालत असल्या प्रमाणें सिताराम भास्कर सुभेदार माजी किल्ले मजकूर यांजकडे बादल मुषाहिरा चालवणें. जाणिजे. छ. ४ जमादिलावल पा० हूजूर.

लेखन सीमा.

श्री

संवत् १८६७



आज्ञापत्र रा० पंतप्रधान तहामोकदमानी गांवगन्ना प्रांतानिहाय सुरूसन इहिदे अशर मय्यातेन व अल्लफ-गंगाधर जोती सुभेदार माजी किल्ले सातारा यांजकडे बादल मुषाहिरा गांवगन्ना जमीन चाहूर-

१८।१ ताा सातारा—
८६ मौजे निंगडी.
८६ मौजे कामखी.
·॥।१७॥· मोजे देहगांव.
१॥३॥ मौजे जुळे.

१८।१.
·॥।१॥ ताा कुडाळे.
·१०॥।१॥कसबे मजकूर.
८६ मौजे बमणोळी.
८२६ मौजे रायगांव.

·॥।१॥·
८१९।४॥। ता० परळी.
८१९८३। मौजे गौंडी.
८।१॥· मौजे कुरूळ.

८१९।४॥।·
८५॥. मौजे नागठाणें ताा० उंबरज प्रांत कऱ्हाड.

१॥२८८३॥.

एकूण दहा गांवापैकीं दीड चाहूर अठ्ठावीस विघे साडेतीन पांड जमीन चालत आहे. त्यास ते वृद्ध जाहले सबब त्यांचे ऐवजीं पुतणे सिताराम भास्कर सुभेदार माजी किल्ले सातारा यांस करार केला आहे, तरी गंगाधर जोती यांजकडे सदरहुं गांवगन्ना पैकीं दीड चाहूर अठ्ठाविस विघे साडेतीन पांड जमीन चालत आल्याप्रमाणें मशारनिल्हेकडे चालवणें. जाणिजे छ ४ जमादिलावल पा० हुजूर

लेखन मीमा.

श्री

संवत् १८६७

शिक्का

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान तहामोकदममानी देहगांव ताा० सातारा व वंदन सुरूसन इहिदे अशर मय्यातेन व अल्लफ. चिमाजी जोती कारकून माजी किल्ले सातारा यांजकडे देहगांव पैकीं बादल मुषाहिरा.

४२५॥- ताा सातारा.

४९।॥ मौजे दरे सुर्द.

४१६॥ मौजे देगांव.

४२५॥.

४२१॥१॥ मौजे अंतापुर ताा वंदन.

१७=

एकूण तीन गांवां पैकीं पाव चाहूर सवासत्रा विघे दोन पांड जमीन चालत होती. त्यांस ते मृत्यु पावले सबब त्यांचे ऐवजीं नातू नारायणराव सिताराम कारकून माजी किल्ले सातारा यांसी करार केलें असत तरी सदरहु तीन गांवापैकीं पावचाहूर सवासत्रा विघे दोन

पांड जमीन चिमाजी जोती यांजकडे चालत आल्या प्रमाणें मशारनिल्हेकडे चालवणें. ० जाणिजे छ ४ जमादिलावल या हूजूर.

लेखन सीमा

येणें प्रमाणें सनदापत्रें आह्मांपाशीं आहेत, त्यांच्या प्रती दाखल केल्या आहेत. या प्रमाणें आमचे ति० कैलासवाशी बाबाजी आपाजी यांचे पणजे प्रयागजी अनंत यांस श्रीमंत शाहुमहाराज छत्रपति स्वामी यांहीं किल्ले सातारा व परळी येथील सुभेदारी देऊन कळंबें गांव इनाम दिल्यावर छत्रपति स्वामी महाराज कैलासवासी जाहले. नंतर शेके १६०७ चे सालीं विजापूर घेण्याकरितां दिल्लीहून औरंगजेब बादशाह आले, त्यांणीं साताऱ्यास येऊन किल्ल्याच्या श्री मंगईलाच्या बुरुजाखालीं सुरुंग नेऊन बुरजाखालीं दारूचें बुधले पुरून सरबत्ति देतां बुरुज उडाला, तेणें करून लोक पडले व मेले. बादशाहाचा मोरचा लागला. प्रयागजी बाबा हे बुरुज उडाला ते समयीं किल्यावरून पडले तेव्हां त्यांचे सभोंवती किल्ल्याचे दगड श्री इश्वरेच्छेनें त्यांचा बचाव होईल असे पडले; लढाई शिकस्त जाहली. नंतर रात्रीस कारकून व शिपायी मशाली लावून, कोण मेले व कोण जिवंत आहेत ह्मणून चौकशी करितां गेले आणि तपास करूं लागले, त्या वेळेस प्रयागजी बाबाचे अंगावरील वस्त्रांचा छेडा त्या लोकांचे दृष्टीस पडला. तो पाहून त्यांस हाक मारतांच मी जिवंत आहे बचावून दगड काढा; तेव्हां संतोष वाटून दगड काढिले. ते साबिद निघाले. त्यांस घेऊन छत्रपति महाराजां जवळ नेले. राजाराम साहेबांनीं पाहून त्यांही चिंचनेर, देह गांवची जमीन त्यांस बक्षीस वंशपरंपरेनें दिल्ही. व पेशजी सातारें व परळी येथील किल्ल्यांची सुभेदारीची असामी, व मौजे कळंबें

हा गांव दिला. आमचे आजे बाबाजी साहेब, यांचे वडील आपाजी ऊर्फ जोतिराव अनंत हे सातारा किल्ल्याचें सुभेशरीचें काम करीत होते. त्यांस चार पुत्र त्यांची नावें येणें प्रमाणें.

१ वडील गंगाधर जोती. २ दुसरे चिमाणाजी जोती.
३ तिसरे भास्कर जोती. ४ चवथे रखमाजी जोती.
ऊर्फ रावजी आपाजी. ऊर्फ बाबाजी आपाजी.

येणें प्रमाणें चार पुत्र त्यांत गंगाधर जोतीराव यांस संतान नाहीं. दुसरे चिमाणाजी जोतीराव यांस दोन पुत्र एक सिताराम; दुसरे सखाराम चिमणाजी ह्या दोघां पैकीं, भास्कर जोती ऊर्फ रावजी आपाजी यांस पुत्र न जाहल्यामुळें त्यांचे अंतकालीं सिताराम चिमणाजी यांस दत्तक घेतलें. आणि रखमाजी जोती ऊर्फ बाबाजी आपाजी यांस औरस पुत्र विठ्ठलराव बाबाजी हे आमचे वडील.

चिमणाजी हे उमेदवार व खरशिकर व वांगीकर आप्त ते घर घोडीं बाळगून शिलेदारी. रोजगार, तलवार बहादरपणानीं हर सरदारी करीत असत. शेके १६८९ संवत् १८२४ इसवी इंग्रजी सन १७६८ चे सालीं पट्टण मुक्कामीं **दामाजीराव** गायवाड यांही कैलास वास केला. तेव्हां **फत्तेसिंगराव** नजीक खेड्यास गेले होते. त्यांस वर्तमान कळतांच आले. क्रिया केली. **गोविंदराव** बाबा हे देशीं होते, तेथें कळविलें. नंतर सरकारांत पदाचीं वस्त्रें **गोविंदराव** बाबानीं मागितलीं. तेव्हां वडील **सयाजीराव** गायकवाड यांस द्यावयाचीं. तुह्मास कशीं मिळतील ? असें उत्तर जाहल्यानंतर रुपये २१००००० एकविस लक्ष पदा संबधीं नजर कबूल करून वस्त्रें घेतलीं. हें वर्तमान **फत्तेसिंगराव** यास कळल्यावर त्यांहीं **बाळाजी यमाजी** सरदारी बंदोबस्ताचे बोलण्या करितां पुण्यास पाठवून आपणही गुजरात प्रांताचा बंदोबस्त करून जातीनें पुण्यास गेले. तों **गोविंदराव** बाबानीं सरकार नजरेचे ऐवजाचा रसद भरणा आगाऊ घेऊन मामलती महालानि हायचे लोकांस सांगितल्या; आणि

वीस २०००००० लाख रुपये सरकारांत कबुलायती प्रमाणें भरणा केला. कमाविसदार सनता घेऊन गुजरातेंत आले. **फत्तेसिंगराव** यांणीं गुजरात प्रांताचा बंदोबस्त केला होता, सबब नवे कमाविसदार आले त्यांची दाद लागली नाहीं. **फत्तेसिंगराव** पुण्यास येऊन पदाविशीं बोलतां उत्तर जाहलें कीं; एकदां वस्त्रें जाहलीं, तीं फिरण्या-विशीं बोलणें बोलतां हें नीट नाहीं. तेव्हां फारच भीड घातली. तें समयीं त्यांची मनो धारणा ठेविणें **श्रीमंतास** योग्य जाणोन राव साहेबांनीं सांगितलें कीं, पदाधिकारी सरदारी एकानीं करावी, व मुलकी काम एकानीं करावें. याप्रमाणें वहिवाट चालवावी ह्मणून आज्ञा जाहली. त्याप्रमाणें **फत्तेसिंगराव** यांणीं सरदारी ऐवजाचा तोड जोड लावून **श्रीमंता**चा निरोप घेऊन बडोद्यास आलें. पुढें **फत्तेसिंगराव** यांजकडून सरदारी खर्चाची तजवीज वेळचेवेळीं गोविंदराव बाबांकडे न पाठविल्यानीं गोविंदराव बाबा यांजला तीन हजार फौजेनिशीं चाकरी करावयाची. तेव्हां श्रीमंत स्वारीबरोबर जिनगीचे व बाहेरचे स्वारीस गेलेले त्यांस खर्चाची अडचण येऊं लागल्या कारणानें श्रीमंतांस मजकूर कळविला. तिकडोन **फत्तेसिंगराव** यांस हुकूम गेले. परंतु बरोबर तजवीज न राहिल्यामुळें एकमेकांत लढा-ईचे प्रसंगही जाहले. त्यांत खरशीकरांचे सरदारींत चिमणाजी व वांगीकर सरदार होते. ते सोनगडा नजीक वांगीकराकडील लोक व खासे चिमणाजी आपाजी कामास आले. असें जाहल्यानीं गोविंदराव बाबा यांणीं सारीच वहिवाट मजकडे सांगावी ह्मणोन महादजी शिंदे व मालोजी घोरपडे व तांबवेकर नाईक वगैरे कामदार मार्फत बोलणें चालूं केलें. दरम्यान महादजी शिंदे यांची हिंदुस्थानांत स्वारी होण्याची ठरली, तेव्हां श्रीमंत आज्ञा आपल्या आपल्या धारणें प्रमाणें पालण होत नाहीं असें मनांत बागलें. जाणोन गोविंदराव बाबांनी महादजी शिंदे यांस सागितलें कीं, आपण मजविशीं पुष्कळ मेहनत केली, परंतु कांहीं जाहलें नाहीं. तेव्हां माझे नशीबाची परिक्षा जाहली तरी आतां

मी आपले बरोबर येतों. आपण हिंदुस्थानांत जातां ते गुजरातेंतून जावें ह्मणजे आपल्या जरबिनी आमचा सळ बसेल. तेव्हां महादजी शिंदे यांहीं उत्तर केलेंकीं; श्रीमंतांची परवानगी घेतली पाहिजे. त्या प्रमाणें महादजी शिंदे यांणी श्रीमंतांस कळविलेंकीं गोविंदराव बाबा मज समागमें येतात. त्यांचे ह्मणणें तुह्मी गुजरातेंतून माळव्याकडे जावें. तसें आमची व फत्तेसिंगराव यांची घोडे मोबदलाची तकार आहे तीही पाहतों. आणि त्यांचे सरदारी खर्चापुर्ती गोविंदराव बाबांची सजल लावण्याविशीं फत्तेसिंगराव यांस सांगतों. त्यावरून तसें करण्याची श्रीमंतांची परवानगी घेऊन गोविंदराव बाबा यांस बरोबर चलावें ह्मणतां, खंडोआवजी यांस सांगितलें कीं सारी खर्चाची मिसळ लागली पाहिजे. तेव्हां खंडो पंतांनीं उत्तर केलेंकीं; दुरदेशीं जाणें. लौकिका प्रमाणें सरंजाम पाहिजे. त्या खर्चाची मिसळ कशी लागेल ती लागो; असें ह्मणून खंडोपंतांनीं रावजी आपाजीस सांगितलें. श्रीमंताचे आप्त गोपाळ नाईक भिडे आहेत. आणि कोट्याधीश. त्यांकडे तुह्मी जाऊन स्वारी खर्चाची तजवीज केल्यास लागेल. कारण भिडे यांजकडे तुमचें वळण चांगलें आहे. त्याजवरून रावजी बाबा यांही खटपट करून भिडे यांचें ह्मणण्याप्रमाणें त्या ऐवजाचे निकालाविशीं खात्रीदार राहून, भिडे यांजकडून ऐवज घेऊन तजवीज स्वारी खर्चाची लावून दिल्ही. तेव्हां भिडे यांणीं गोविंदराव बाबा यांस कळविलें कीं, आमचा ऐवज घेण्याकरतां आपले बरोबर रावबा यांस त्यांचे जातीचे खर्चाचा बंदोबस्त करून न्यावें. त्या प्रमाणें रावजी आपाजी यांचा बंदोबस्त करून देऊन त्यांजला स्वारी बराबर घेतले. नंतर महादजी शिंदे पाटीलबावा गोविंदराव गायकवाड यांस सरंजामानिशीं स्वारी बरोबर घेऊन सोनगडास येऊन गुजरातेंत येतात अशी खबर फत्तेसिंगराव यांस लागल्या वरून कांहीं मेवाशिये व गिराशिये बोलावून वस्त्रें देऊन सांगितलेकीं तुह्मांस ज्या रीतीनें शिंदे व गायकवाड यांचा उपमर्द होईल तितका करावा. आधींच तस्कर; त्यांत राजाज्ञा; मग अविचारास उणे

काय ? अवल रात्रीची चोरी; जी वस्तु सांपडेल ती घोडया सुद्धां न्यावी; दिवसा लुटणें व मारणें; अशी एकच गर्दी कोळयांनीं केली. पाटील बावा त्रासले. तेव्हां भडोचेस येऊन खंबायतवाल्याचे अमलांतून मोळ्या कडाकुटीनें जसे तसे बडोद्याकडे न येतां परभारें पावागडाकडून कुशळगडास जाऊन तेथून उज्जयनीस गेले. नंतर गोकूळ वृंदावन करून ग्वाल्हेरीस जाई इतक्यांत सन सत्तास सव्वेन शेक १६९४ संवत १८२९ चे कार्तिकमासीं माधवराव बल्लाळराव-साहेब कैलासवासी जाहले. आणि रमाबाई साहेबांनीं सहगमन केलें. त्याजमुळें सर्वांस दिलगिरी प्राप्त झाली. पुढें राघोबा दादा चुलत चुलते, नारायणराव बल्लाळ यांस साताऱ्यास नेऊन शेके १६९५ चे प्रधानपणाचीं वस्त्रें दिल्हीं. त्याप्रमाणें नारायणराव साहेबांनी वहिवाट नऊ महिनें केली. नंतर भाद्रपद शुद्ध १३ सह चतुर्दशीचे दिवशीं सन आर्बा सव्वैनांत सुमेरसिंग गारद्याकडून दादासाहेब यांचें कुटुंबानीं नारायणराव साहेबांस मारविलें. नंतर नानासाहेबांची स्त्री श्री० गंगाबाई गरोदर आहे ती बाळंतपणास पुरंदरचे किल्ल्यावर दादा साहेबां-ची कन्या, बारामतीकरांची सून काकूबाई साक्षी करितां नेतों तरी तुह्मी सरंजामानिशीं पुण्यास यावें ह्मणोन नाना फडणीस यांणीं पत्र पाटीलबावा शिंदे यांस पाठविलें. तें पत्र पाटील बावास पावतांच ग्वाल्हेरीस न जातां पुण्यास जाण्यास निघाले. तेव्हां गोविंदराव बावा यांहीं सागितलें कीं मी गुजरात मार्गानीं येतों. असें पाटील बावा यांचा निरोप घेऊन सरंजामानिशीं बडोद्यास येतां मार्गी खंडो आबाजी तांबेटकर यांचा फारच वाखा जाहला. त्यांत कुचदरकुच जाणें दुखण्यानीं फार हैराण जाहले; वांचत नाही. असें त्यांचें त्यांस वाटल्यावर गोविंदराव बावांस बोलावून मी दुखण्यांतून वांचत नाहीं, ह्मणोन निरवानिरवी करितों कीं, मी आज सुमारें पंधरा वर्षें जाहलीं. रावजीचे भरंशावर काढिलीं. जेथें प्रसंग आडला. तेथें रावबा आतां तुह्माशिवाय

हा प्रसंग शेवटास जात नाहीं, झटलें असतां त्यांणीं जीवादारभ्य चाकरी केली. त्याचे भाऊ चिमणाजी आपाजी लढाईत सोनगडास कामास आले. याजकरितां त्यांजला त्यांचे लेंकरालेंकरी चालवणें. अशा योग्यतेचा बंदोबस्त करून देऊं असें माझें वचन गुंतलें. तसें त्यांणीं श्रीमंतांजवळ चाकरी निष्ठेनी दरकदार, कामदार व बायांसहित सर्वांचा लोभ संपादून घेऊन चाकरी करावी. याजमुळें सर्वांस रावबा पाहिजे. कोणाचें गैर वाजवी करणें नाहीं. तसें लबाडी दरबारांत अगर उदम्यांत नाहीं. याजमुळें अगत्य ठेवितात. आपण इकडे निघते समयीं तयारीविशीं आज्ञा केली. एक पैशाचा ठिकाण नसतां भिड्यांकडून व जोहारी व कापडकरी, गोसांवी व जिनगर वगैरे जें जिकडोन सामान मिळले तें मिळवून लाखो रुपयांचें साहित्य केलें त्यांचे वायदे भरले. मशारनिल्हे बरोबर आले त्यांणीं विचारतां काय सागावें? आपण आज्ञा केल्यावर त्या गृहस्थांनीं एकही अक्षर काढलें नाहीं. असा पुरुष धुंडाळल्यानीं मिळा वयाचा नाहीं. परंतु धणीपणाचा योग हमेष साहित्य जाहलें. मी तर मरतों. जगतों तरी आपल्यास गुजरातींत नेऊन गादीवर बसवून मुजरा करावा असें चित्तांत होतें. परंतु देवाजीचे मनांस आलें नाहीं. उपाय काय? रावबास मात्र कोठें अडकवूं नका. मोकळा ठेवा झणजे तो हजार उलाढाली करून तुझांस वांचवील व आपण बचाव करून घेईल. व तुमचे सरदारीची सजल हरतऱ्हेनें बसवील. नाहीं तर इतरांचे हातून बसणार नाहीं. ही आपण खात्री ठेवावी. अशा प्रकारें बुद्धीस आलें त्या रीतिनें गोविंदराव बाबांस सांगितलें. नंतर व्याकूळ झालें. बोलवेना. तेव्हां त्याचा समय शेवटचा जाणोन गोविंदराव बाबा उठोन आले, आणि श्रमीं होऊं लागले. ते समयीं गोविंदराव बाबा यांस रावजीनें सांगितलें कीं आपण रडून काय होतें? आपण दैववान आहांत झणून शतावधिचें पाळण पोषण करितां याहून जास्ती पाळण कराल. तेव्हां रावबाचे गळ्यांत हात घालून

आतां कसें करावें. विचारलें तेव्हां सांगितलें कीं बाळाजीपंत व गोविंदपंत हें उभयतां खंडोपंताचे हस्त आहेत. काम काजांत वागलेले आहेत. त्यांस घेऊन आपण गुजरातेंत जावें. पाटीलबवा देशीं जातात. त्यांज बरोबर मी जातों. आपण गुजरातेंत जाऊन सळ बसला तर बरें; नाहीं तर पुण्यास आल्याशिवाय परिणाम नाहीं, असें बोलल्यावर रावबा तूं मला सोडूं नये. मी तुला अंतर करणार नाहीं. जर केला तर दमाजीच्या पोटचा नाहीं. श्रीखंडोबा व बहिरोबा व जोतीबा हे आमचे कुळस्वामी आहेत, त्यांची शपत. तूं माझे आईबाप व गण गोत तुज वांचून मी कोणाचा इतबार करणार नाहीं, ही खात्री ठेव. जेथें विकशील तेथें विकून घेईन. दौलत लुटली तरी तिचा मालक तूं. तूं देशील ती भाकर खाईन यांत अंतर पडणार नाहीं. गाई ब्राह्मणाची शपत घेऊन रावबास शपत घेण्यास सांगितलें तेव्हां रावबांनीं उत्तर केलें, कीं आमचें सर्वोपरी अगत्य, लेकरालेकरीं चालवीन. दौलत तुझी आपण ह्मणतां त्यापेक्षां मागणार काय? मागतों, परंतु आह्मी चाकर. आमचेकडून पदोपदीं चुकच आहे. क्षमा करणें धन्याकडे आहे, त्यापेक्षां जोंपर्यंत जीवात्मा आहे तों पावेतों पाहिजे तसें यत्न करून बडोद्याचे गादीवर बसवीन. हा हेतु शेवटास करणार जगदीश श्रीसांब यवतेश्वर समर्थ आहे, हीच शपत; दुसरें काय बोलावयाचें आहे? ह्मणोन समाधान करून उठविले. रावबांनीं पुढें पुण्यास जाण्याचा बेत रहीत करून स्वारी बरोबर बडोद्यास आले. श्री भीमनाथी उतारोन फत्तेसिंगराव यांसीं खटपट करून बडोद्यावर तोफा लावून लढाईचाही शह लाविला. निग्रहानीं लढाई करावी तर पूर्वी फत्तेसिंगराव यांही इंग्रज सरकारास भेटून च्यार रूपये खर्च करून अनुकूल करून घेतलें. त्या खर्चाचे ऐवजास गजराबाई कन्या व गमाजी पाटील दरम्यानदार दिल्हे, कारण बडोद्याचे गादीस हरकत होऊं नये. पेशवे आदी तुफानें केल्यास गायकवाड सरकारची मदत ठेवावी असा तहनामा संवत् १८२९ छ १८ महे सव्वाल ता० १२

जानेवारी सन १७७३ हिजरी सन ११८२ रोजीं जाहला आहे. याजमुळें पाटीलबावांनीं हिंदुस्थानांत जाण्याचा निरोप श्रीमंताचा घेतल्यावेळीं विनंती केली कीं गुजरात मार्गे पावागडाकडोन हिंदुस्थानांत जातो. बरोबर गोविंदराव गायकवाड येतात. फत्तेसिंगराव यांचा शिलशिला जाहला तर करूं न द्यावा. नाहींतर धण्यानीं दाब जरब देऊन करणें तसें करावें. असें मग जशी आज्ञा होईल तसें करूं. त्याचें उत्तर श्रीमंतांनी दिलें कीं, साडे एकत्तीस लाख रुपये दौलत सोडवून देण्याविशीं देतात त्याचा करार सरकारांत जाहला आहे, त्यास व्यत्यय न येतां सामदामानीं फत्तेसिंगराव तुह्माशीं ठराव करीत असेल तर करून द्यावा. उगीच जबरी गैर वाजवी लेखसोडून कराल तर सरकारचे बोलण्यास बाध येईल. असें केल्यास तुमचो मुरवत राहणार नाहीं, असा सरकार हुकूम; तेव्हां निग्रहानीं लढाई करावी हेंही नीट नाहीं. यास्तव लढाईचा विचार महकूब करून फत्तेसिंगराव यांणीं दाद लागूं न दिल्यानीं परत पुण्यास गेले; आणि दावडीस जाऊन राहिले. तों मि० वैशाख शु० १३ शेके १६९६ संवत् १७३१ चे रोजीं श्रीमंत माधवराव नारायण पुत्र जाहले, हें वर्तमान दादासाहेबांस कळलें. हिंदुस्थानांत जाण्याची मोहिम धरून धोरस गेले. तेथें सौ० आनंदीबाई प्रसूत होऊन बाजीराव जाहले. दादासाहेब यांणीं कलकत्यास वकील पाठवून खटपट केली. परंतु श्रीमंत माधवराव यांस पदाचीं वस्त्रें होतांच. दादासाहेब यांजबरोबर हुजुरात व मानकरी सर्व गेलेले, त्यांस पत्र पाठवून बोलावून घेतले, व पाटीलबावा शिंदे यांशीं बोलाविलें, तेही आले. पुढें फत्तेसिंगराव इ० सन १७८९ साली वारल्यावर मानाजीराव गायकवाड यांशीं सरकारांत वस्त्रांविशीं खटपट चालविली. परंतु ऐवजाविषयीं कांहीं तजवीज न होई तेव्हां नारो श्रीपत कारभारांत होते; त्यांशीं ऐवज जमा करून हुंड्या देऊन यांही आपले कडील बोलणार यांस पाठविलें. मागें मानाजीराव वारल्याची वातमी पुण्यास आली, तें वर्तमान रावबांस कळतांच गोविंदराव

महाराजांस सांगावें ह्मणून येत होते. तों नारो श्रीपताकडील बोलणार हुंड्यां सहित हातीं कागद वाचीत चालला. त्यांस रावबांनीं पाहून विचारून कागद पाहिला. तो मानाजी बाबास वस्त्रें देववण्याचा मजकूर लिहिलेला पाहून त्यांस सांगितलें कीं चला तुह्मांस वर्तमान सांगतों. ह्मणून त्यांस गोविंदराव बाबा यांजकडे आणून मानाजीराव निवर्तल्याचा दिवस सागून बोलणारांची खात्रीकरून हुंड्या सहित त्यांजला हरिपंत तात्यांकडे घेऊन गोविंदराव बाबांस वस्त्रें देण्याविशीं रावबा बोलले. तें ऐकून तात्यांनी उत्तर केलें कीं; तुह्मी फार दिवस याविशीं बोलतां खरे; माझ्या लक्षांत आहे. परंतु ऐवजाशिवाय बोलणें कसें शेवटास जातें? त्याची व्यवस्था काय ती सांगा, हल्लीं संधी आहे. मानाजी बाबाचा काळ जाहला. आतां बोलणें बोललां असतां नीट आहे. असें ह्मणतां, ऐवज जीवामाफक देण्यास सांगून अगत्य धरलें पाहिजे. तेव्हां तात्यांनी उत्तर केलें कीं, आह्मी कधीं मनावर धरलें नव्हतें. फत्तेसिंग वारल्यावर तुह्मांस सांगितलें तेव्हां पासून तुमची तजवीज होत आहे. मानाजी बाबाचे सरदारीविशीं बोलणें आलें. त्यांजलाही सांगितलें. ते ऐवज आणितां पार पडले. तुमचे नित्य क्रमांतील बोलणें चालूं आहे. असें ह्मणतां रावबांनी उत्तर केलें कीं आमचें काम उलगडोन देतो अशी आज्ञा जाहली तर आज या समयास ऐवजाची तजवीज लावून देतों. तेव्हां वाड्यांतून जाईन, नाहींतर कधीं जाणार नाहीं ह्मणतां, तात्यांनीं उत्तर केलें कीं तुह्मी कोणत्या रीतिनें ऐवजाची तजवीज करितां तें सांगा. रावबानीं उत्तर दिल्हें कीं; ऐवज आमचे गजव्यामाफक सांगितला तर आतां देऊं, नाहीं तर न करावयाचें ह्मणोन ओझें ठेवणें झाल्यास आमचा उपाय नाहीं. तेव्हां तात्यानीं सांगितलें कीं; एक साल नजराणा, शिवाय दरबार खर्च याशिवाय सरदारीपैकीं बाकीची तोड कशी लावितां? तेव्हां रावबानीं उत्तर केलें, एक सालचा नजराणा शिवाय दरबार खर्चाचा आंकडा ठरवून द्यावा. ह्मणजे बाकी सर-

कारचे घेण्याची तजवीज पुढें बोलूं. आजं वीस वर्षं खराबा होतों हें मनांत आणून जें करणें तें करावें. आपल्या शिवाय आमचा वाली कोण? असें ह्मणतांच उत्तर केलें कीं रावबा तूं आमचा व आह्मी तुमचे खरे; परंतु सरकारचा ऐवज जिकडील तिकडे कायम जाहल्या वांचून आह्मी सरकारांत कसें बोलावें? त्यावरून तात्यानें खानगीचा प्रकार ठरवून दरबार खर्चाचा आंकडा नाना जवळ बोलून सांगूं असें ह्मटलें. परंतु ऐवजाची खात्री जाहल्या खेरीज मी बोलणार नाहीं. तेव्हां साठ लक्षांची हुंडीचिठ्ठी दाखविली, ती पाहून संध्याकाळीं या ह्मणजे नानाकडे जाऊन आज काय तें ठरावांत आणूं, ह्मणोन उत्तर दिल्हें. नंतर नानाचा खिजमतगार रंगो गोपाळ निगुड याची गांठ घेऊन त्याजला मजकूर समजाविला. त्यांनीं नानास विचारिलें, त्याचें उत्तर नानानीं केलें कीं रावबा अशा कामांत मेहनत कशा करितां करितो, त्याजला सरकार न्यायाधिशाचें काम सरकारांतून सांगण्याचा विचार आहे. हे मराठे सरदार. यांचे बोलण्याचे, इमानाचें शाश्वत काय मानून उगाच खराब होतो, हें चांगलें नाहीं. या वरून रंगो गोपाळ निगुड यांणीं विनंती केली कीं रावजी आपाजी आपले चरणाचे आश्रयांनीं आज पंचवीस वर्षं आहेत. आपले आज्ञे प्रमाणें चालतो, त्यांचा हेतु गोविंदराव गायकवाड यांचें कल्याण करण्याचा आहे. त्याणीं मिळविलेला पैसा व कोणी उधार पाधार दिल्हे तें कर्ज घेऊन ही गोविंदराव यांचें खर्चास लाविला, घरचीं माणसें आकांत करीत असतां. त्यांचा व रावबांचा ऋणानुबंध जन्मांतरीचा असेल, याज करितां गायकवाडाकडे घेणें सरकारी आहे, त्याचे उगारणीस रावबा पाठविला आहे, असें समजून रावबाचे मनोदया सारखें कबूल करून ऐवजाची निशापाती कशी देतात हें विचारून खात्री जाहली तर काम सांगावें. या प्रमाणें खिजमतदार मजकूर यांणीं कळ विल्यावर नानानीं ऐकून उगाच राहिले. नंतर प्रहर रात्रीस हरिपंत तात्या रावबास घेऊन पांच चार मंडळी कामांतील घेऊन नानाजवळ

बोलण्याचा उपक्रम चालविला. राववानीं पण विनंती केली. ते समयीं नानानीं दुसरें एक दोन बोलणीं सरकार खालसा करण्याविशींचीं होतीं तीं कळविलीं. तेव्हां तात्यांनीं सांगितलें खालसा करण्यास अवघड पडेल. तो मजकूर नीट नाहीं. गोविंदराव यांस सांगावें त्याचा विचार कोणत्या रीतीनें करावयाचा त्याची तजवीज जाहली पाहिजे, ह्मणतांच नानानीं उत्तर केलेंकीं सरकारांत चाकरी करण्याचा करार एक, असतां न जाहली; व करार दोन रूपये ठरावापैकीं येणें, त्याचा हिशोब होणें. इतकें ओझें गोविंदराव यांस वस्तुतः उचलणार नाहीं. आणि सरकारांत रूपये आल्याशिवाय काम सांगणें घडत नाहीं, तेव्हां कोणत्या रीतीनें तुह्मीं तजवीज योजिली आहे ती सांगा; ह्मणजे त्याचा विचार करावयास येईल. तेव्हां त्यांणीं वस्त्रांबद्दलही नजराणा दिल्हा. तो गोविंदराव यांजकडे किंवा फत्तेसिंगराव यांजकडे याचा कागद पाहून देणें काय आहे तें सांगा, ह्मणजे तोड जोड करूं. त्या वरून गुरूजी कडून कागद आणून पहातां मनस्वी ऐवज बाकी निघूं लागला. तेव्हां हरिपंतांनीं नानास सांगितलें कीं आज सारा निकाल होत नाहीं. ज्याचें काम त्यास सांगावें. एकसाल नजराणा घेऊन बाकीचे ऐवजाचे तगाद्यास हुजरे द्यावे. त्यांणीं ऐवज येईल तसा पाठवून द्यावा. तेव्हां ते बोलल्या प्रमाणें याद केली. त्या प्रमाणें भरण्याचो जिमा हरिपंतांनीं घेऊन उद्यां वस्त्रें द्यावीं असें ठरलें. अडीच तीन प्रहर रात्रपर्यंत व्यवस्था करण्यांत आली. मग *तोफेचाशिपायी देऊन घरोघर मंडळीस पोंचविलें. दुसेर दिवशीं वस्त्रें द्यावयाची असतां १४ महाल नबाब यांजकडे ठेविलें. चौदां पैकीं सात महाल श्रीमंतांकडे व सात महाल गायकवाडांकडे. ते सात महाल सरकाराकडे द्यावे. कितीएक बखेड्यांविशीं बोलण्याचा प्रकार दिसोन आला तेव्हां गोविंदराव याजवळ सुरजतराम मुनसी सुरतकर ब्राह्मण, यांचे गोटांत मालिट साहे-

* तोफ झाल्यावर शहरांत फिरण्याची मनाई होती.

वांकडील होते. मानाजी बावा वारल्यावर गोविंदरावबाबाजवळ आपले खाऊन खुशामत करून असावें. सदरी लिहिलेले कामांत बखेडा दिसोन आल्यावरून त्यांणीं सांगितलें कीं फत्तेसिंगराव यांणीं तह इंग्रजांशीं केला. त्यांत पेशवे अगर हर कोणी आमचे दौलतीविशीं हरकत केली असतां तुह्मी मदत ठेवावी, असा करार केला. त्यांसही माहित आहे. या विषयीं माल्टि साहेबांनी सांगितलें असतां कारभारी कमी जास्ती बोलणार नाहींत तें सांगून माल्टि साहेबांकडे गेले. आणि सांगितलें कीं आपण आमची बहादरी केली आहे. त्यास आमचे महालास सरकारांतून हरकत आहे, सबब आपली मदत जाहली ह्मणजे वस्त्रें देतील. आपण नेटानें बोलल्याशिवाय काम होणार नाही, ह्मणतांच त्यांणीं कबूल करून आपले कामा करितां जाऊन उलगडून विचारिलें कीं गुजरातेंतील गायकवाड सरकारचा बंदोबस्त सरकारांतून जाहला किंवा होणें आहे? नानांनीं विचारिलें हें विचारणें तुह्मांस कारण काय? त्याजवरून त्यांणीं उत्तर केलें कीं आमचा त्यांचा तह आहे, कीं तुमची मदत आह्मीं ठेवूं. कोणी खलेल करील तर त्यास बिघाड होऊं देणार नाहीं. याजकरितां त्याचा बंदोबस्त करून देऊन रवाना करावें. तेव्हां नवसरी महाल घेणें तो रहित जाहला. हरिपंत तात्यांचा व नाना यांचा ठराव करून वस्त्रें सरकारी कोट्यावधी रुपयांचे देण्याबद्दल खात्रीदार माहादजी बावा शिंदे यांस देऊन संवत् १८५० भाद्रपदमाशीं श्रीमंत गोविंदराव महाराज गायकवाड यांस सुमुहूर्त वस्त्रें श्रीमंत पेशवे सरकारांतून देववून पेशवे सरकार विद्यमानें गोविंदराव गायकवाड यांही आपली दिवाणगिरी वंश परंपरेनें रावबास दिल्ही. नंतर गोविंदराव महाराज दिवाण रावजी आपाजी वगैरे सरंजामनिशीं संवत् १८५० चे कार्तिक माशीं बडोद्यास आले. नंतर राज्य कारभाराची दिवाणगिरी रावजी आपाजीस दिलेली ती निरंतर वंशपरंपरेनें चालण्या बद्दल सनदा पत्रकें करून दिल्हीं नंतर त्यांचे कनिष्ठ बंधु ति० कैलासवाशी बाबाजी आपाजी. आमचे आजे यांस रावजी आपाजी यांणीं पत्र लिहून

संवत् १८९१चे सालीं बडोद्यास आणविलें. ते त्यांजजवळ कामें काजांत वागत असत. पुढें इंग्रज सरकाराशीं गायकवाड सरकारचे जे तह जाहले आहेत, त्यांत तिसरे तहनाम्यांतील दहावे कलमांत मेजर वाकर साहेब यांणीं बोलणें करून कलमबंदी लिहून दिल्ही, ती आह्मी कबूल करितों. परंतु आह्मांस व आमचे राज्यास आमचे वंशींचा जो औरस गादीवर असेल त्यांस व रावजी आपाजी आमचे दिवाण यांचे पुत्र भाई भतीजे व सोयरे व बाबस्ते व माधव गोपाळ मजुमदार यांजवर आह्माकडोन गैरवाजवी होऊं लागल्यास कंपनी इंग्रज बहादूर यांणीं मदत हर एक विशीं करून कोणाचा जलेल यांजवर होऊं न द्यावा. त्यावरून कंपनी इंग्रज बहादूर यांचे तर्फेनें मेजर वाकर कबूल करितात कीं, तुह्मी व तुमचे वंशाकडे तुमचें राज्य कायम राहून रावजी आपाजी व त्यांचे भाईभतीजे वगैरे यांचा पुस्त दर पुस्त, दिवाणगिरी व कारभार जोंवरी तुमची दौलत तोंवरी पुस्तदरपुस्त मशार निल्हे सुद्धां दरम्यान बहादरी कंपनीची असे. तसें इंग्रज सरकारांतून ही ता० ८ माहे जून सन १८०२ रोजीं परगणें चिखली चौऱ्यांशीं येथील मौजे भाठें हा गांव इनाम वंशपरंपरेनें दिल्हा आहे. या शिवाय परभोरें इंग्रज सरकारांतून कितीएक कागद पत्र रावजी आपाजी यांचे बंदोबस्ताविशीं जाहलेले आहेत, ते हर्दु सरकारांस रोषन आहेत. यांतील एक याद:—


मुंबई सरकारची इच्छा अशी आहे जे, रावजी आपाजीची दिवाणगिरी बडोदे सरकारची हमेशा पुस्तदरपुस्त कायम रहावी. त्यांचे पुत्र भाईभतीजे व सोयरे बाबस्ते यांचे हमेशा सरकार कुमक वगैरे बरदास्ते करून वाजवीचे कामावर व जींतील गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादूर यांणीं अगर हर कोणी तुह्मांवर गैर वाजवी तुफान उठवून इजा दिल्यास कंपनी दरम्यान येऊन त्यांचा फैसला केला जाईल. या गोष्टीचे दरम्यानगिरीस मी ह्मणोन ह्या कागदावर माझी सही व सरकारची मोहर केली असे. सदर मुक्काम खंबायत येथें ठरलें. इंग्रजी सन



१८०२ ता० ८ जून—
जोनाथन डंकन."
संवत् १८५०

अखंडित लक्ष्मी आळंकृत राजमान्य राजश्री रावजी आपाजी गोसांवी यांस.

श्रे० अमृतराव रघुनाथ. आशिर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणे. विशेष कानोजीराव गायकवाड यांणीं बखेडा केल्यामुळें त्यांचा बंदोबस्त केल्याचा मजकूर राजश्री आनंदराव गायकवाड यांणी लिहिल्यावरून बहुत संतोष जाहला. गोविंदराव बंधु वर्गातील होते, त्यांचे मागें निर्वेधपणें दौलत स्वस्थतेनें चालावी हेंच काया वाचा मनें करून कळकळ होती, त्यास सांप्रत तुह्मीं बखेडे मोडले हें तुमचे सेवा धर्माची व एक निष्ठतेची पराकाष्टा आहे. गायकवाडाचे दौलतींत तुह्मां सारखे मनुष्य दुर्मीळ आहेत. असें समजून एथील मर्जी तुह्मावर बहुत प्रसन्न आहे. तिकडील प्रकर्णी इकडोन सर्वोपरी अनकूळतेचेच अर्थ घडतील, हें खातर जमा ठेवणें. जाणिजे. छ २७ रमजान सुरूसन इहिदे मयातैन व अल्फ बहुतकाय लिहीणें.



श्री

संवत् १८५७

अखंडित लक्ष्मी आळंकृत राजमान्य राजश्री रावजी आपाजी गोसांवी यांस.

श्रे० बाजीराव रघुनाथ प्रधान आशिर्वाद सुरूसन इहिदे मयातैन व अल्फ. नबाब मोमिलखान खंबायतकर यांजकडील तालुक्यांत

गायकवाड यांचे फौजेचा उपद्रव होता. व कांहीं पाळ्याचा ऐवज यांचा येणें तो गायकवाड यांजकडील कमाविसदार सुदामत प्रमाणें देत नाहीं. व बाबाजी कृष्ण शेलूकर यांजबाबद मागील खटले काढून उपसर्ग होतो ह्मणून नबाबा कडील नवाकनाख वकील यांणी हुजूर विनंती केली. त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी नबाब खंबायतकर पूर्वीपासून सरकार लक्षांत, आणि सरकार तालुक्यांत काठ्यांचा उपद्रव होता तेथें त्यांणी बोरे बंदी केली आहे. याजकरितां तुह्मी फौजेस ताकीद करून यांजकडील तालुक्यांस उपसर्ग न लागे तें करणें. व कांहीं पाळ्याचा ऐवज यांचा येणें तो कमाविसदारास ताकीद करून सुदामत प्रमाणें देववणें. व शेलूकरा बाबद मागील खटले काढून यांसीं उपद्रव करितां त्यास येविशींचा जाबसाल सरकारांत समजावून ध्यावयास येईल. तुह्मी वाजवीच्या अन्वयें हरएकविशीं यांचें साहित्य करीत जाणें. येविशीं फिरून बोभाट येऊं न देणें. जाणीजे. छ ३ जिलकाद.

मोर्तब.

येणे प्रमाणें रावजी आपाजी व बाबाजी आपाजी उभयतां बंधु सरकार कामकाजांत वागत असतां संवत् १८५३ चे सालीं बाबाजी साहेब यांस श्रीमंत गोविंदराव महाराज यांही मुकुंदराव गायकवाड यांचे स्वारीसमागमें चाकरीस जाण्याविशीं आज्ञा केली. आणि त्यांस छ २९ माहे जिल्हेज सन सबां तिसेन आषाढमासा पासून सालीना पालखी बद्दल रुपये १००० एकहजारची सनद करून दिल्ही, व चवरी तुह्मी करवीत जावी ह्मणून चवरीचा बहुमान देऊन सनद करून दिल्ही. आणि बाबाजी साहेबांस रावजी आपाजी यांहीं त्यांचे स्वारी बरोबर दिल्हे. तिकडून स्वारी करून आल्यावर संवत् १८५४ इसवी सन १७९८वांत गोविंदराव महाराज कैलासवासी झाल्यानंतर श्री-

मंत आनंदराव महाराज गादीनशीन झाल्यावर, संवत् १८५७ सालीं बाबाजी साहेब यांही प्रांत काठेवाड व प्रांत झालवाड येथील सरकार व रा० पंतप्रधान यांजकडील भाग व प्रांत महिकाठा वगैरे दुभागा पालणपुर सुद्धां मुलुखगिरीचा बंदोबस्त करण्याचें काम छ १७ महे साबान सुरूसन इहिदे मयातेन व अलफ रोजीं सांगितलें, आणि सनद करून दिल्ही. परंतु मल्हारराव हिमतबहादर कडीवाले यांणी सेना खासखेल समसेर बहादर यांचे मनस्वी बखेडे केले व करीत आहेत. त्या वरून सरकार तर्फे रावजी आपाजी दिवाण यांणीं इंग्रज सरकारास कळविलें. मल्हारराव गायकवाड यांस कळेल त्या युक्तिनें व रीतीनें तुह्मीं सांगावें. त्यांणीं न ऐकल्यास मल्हारराव गायकवाड मशारनिल्हे यांचें पारिपत्य लढाई देऊन उत्तम प्रकारें करावें, ह्मणजे तुमच्या फौजेचा खर्च आह्मी देऊं, असें मुंबईचे जनरल यांस कळवून त्यांची मदत मागितली, त्याबद्दल तहनामा पहिला चार कलमांचा छ १० जिलकाद सुरूसन इसन्ने मयातेन व अलफ संवत् १८५८ त ठरावांत आल्या प्रमाणें, कंपनी इंग्रज सरकार तर्फे मेजर वाकर साहेब फौजेसह मदतीस आनंदराव महाराज यांही मागून घेऊन आनंदराव महाराजांनीं पत्रासह मेजर वाकर साहेब यांस पलठणीसह बाबाजी साहेबांकडे पाठविलें. त्या पत्राची प्रत.

श्री ह्माळसाकांत.

राजश्री बाबाजी आपाजी गोसांवी यांस

अखंडित लक्ष्मी आळंकृत राजमान्य

ले० आनंदराव गायकवाड सेना खासखेल समशेर बहादुर राम राम सुरूसन इसन्ने मय्यातेन व अल्लफ. कंपनी इंग्रज बहादुर यांजकडून कडीकरांचें पारपत्यास सामिलातीस सरंजाम सुद्धां अजम कर्नल मेजर वाकर साहेब व अजम आगा महमद यांस पलठणें सुद्धां पाठविले आहेत, त्यांची मुलाकत होऊन बहुमान करू-

न खानगी केली आहे तरी त्यांचें सल्ला मसलतीनें लढाई वगैरे विचार करणें तो करीत जाणें. ह्मणजे शत्रुचे पारपत्य होऊन सरकार नक्षा होईल. जाणिजे छ ३ माहे सवाल.

शिक्का.

मोर्तब.

श्री ह्माळसा कांत.

संवत् १८५८.

रा० बाबाजी आपाजी गोसांवी यांसी

अखंडित लक्ष्मी आळंकृत राजमान्य

स्ने० आनंदराव गायकवाड सेना खासखेल समसेर बहादुर राम राम सुरूसन इसन्ने मया तेन व अल्लफ. तुह्मी मुलुखगिरीचें काम चौकशीनें जरजामीनीनें वगैरेचा बंदोबस्त सरकार लक्ष ठेवून करितां ह्मणोन समजलें त्यावरून बहुत संतोष जाहला ऐसियास महिकांठा व काठेवाड येथील तालुकेनिहायचे खंडणीचें काम सरकार नजराणासुद्धां सरकार नक्षा राखून स्नेयाखातर† खा बंद बसवून मेवासी वगैरेचे जमिनीचा बंदोबस्त पक्केपणें करून, चहुंकडे बारकाईनें नजर ठेवून, पुढें मुलुखगिरीचें काम यथास्थित पार पडे तें करावें. येविशीं तुमचा भरंवसा आहे. वरकड सविस्तर रा० रावजी आपाजी लिहितील त्यावरून कळेल. तुह्मी काठेवाड प्रांतीं गेलियावर घोडे व घोड्या चांगले नामी जातवंत जेथें असतील तेथोन आणवून दहा पंधरा पावेतों व नगरी पोषाख चांगले उंचप्रतीचे येणेंप्रमाणें सरकारांत पाठवावे. व खंबायत येथील चुकोती वगैरेचा जाबसाल उरकलियावर महिकाठ्याचे तालुक्यांत जलद जाणें. जाणिजे छ २२ माहे रबिलवल.

† खातरखा ह्म० स्नेह जोडून.



श्री झाळसा कांत.

रा. बाबाजी आपाजी गोसांवी यांस

अखंडित लक्ष्मीआळंकृत राजमान्य

स्ले० आनंदराव गायकवाड सेनाखासखेल समसेर बहादुर रामराम सुरूसन इसन्ने मयातेन व अलफ. तिर्थस्वरूप राजश्री मल्हारराव गायकवाड हिंमत बहादुर यांस सरकारांतून पत्र लिहिलें आहे, तें तुह्मी पाहून *काशीदास लाखोटा करून देऊन पुढें कडीस रवाना करणें. येथें बाहेदारासही आज्ञा केली आहे. त्याचीं ही पत्रें वाचून कडीस जातील. तुह्मी बहुत सावध पणें चहूंकडील बातम्या राखून पंचमहाल, वाला, शिहोर वगैरे आलिकडील जाबासाल ते उरकून शहरच्या सुमारें लौकर येणें. येथें राहिला सरंजाम त्याची ताकीद करून रवाना करण्याविशीं रा० रावजी आपाजी यांस आज्ञा केली. मुकुंदराव कडीस गेला किंवा दुसरे ठिकाणीं गेला, त्याची पक्की बातमी आणोन लिहून पाठवणें. जाणिजे छ २७ माहे जमादिलावल बहुत काय लि०





सदर्हु प्रमाणें बाबाजी आपाजी यांणीं कर्नल मेजर वाकर साहेबासह कडीचे स्वारीस जाऊन मसलत फत्ते करून मल्हारराव गायकवाड यांस ता० ३ माहे मे सन १८०२ रोजीं आपले स्वाधीन

* जासुदास.

करून घेतले. ते समयीं त्याचे खर्चाविशीं ठराव करून नडियाद मुक्कामीं ठेविले. ह्या मसलती करितां पलठणीची मदत मागितली सबब पलठणीचे जाबीदादी खर्चाचा ऐवज देण्याबद्दल मुंबईचे जनरल जोनाथन डंकन साहेब यांस गायकवाड सरकारांतून दस्तऐवज लिहून देऊन जामीन दिले.

त्यांची प्रत.

अजम जनरल जोनाथन डंकन इस्क्वायर प्रेसिडेन्ट गव्हर्नर निसबत कंपनी इंग्रजबहादूर दाममोहबत हु०

आजदीन ये खमस आनंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादर सलाम बादज सलाम. अंकीं, येथील खैर आफियत जाणून मोहिबी आपली खैर खुषी हमेषा कलमीं करीत असली पाहिजे. दिगर कंपनी इंग्रजबहादूर यांजकडील दोन हजार फौज व तोफखाना शिवाय आमचें सरकारांत तैनातीस दिल्हे. त्यास आमचे सरकारचे शिबंदीचे बरतफीचे तारखे पासून तुमचे फौजेची तारीख चालूं होईल. त्याची पहिले सालची एक वर्षाची जाबिदाद द्यावयाची सोई नाहीं. सबब एक ऐवज द्यावयाचा करार एकंदर बेरीज ७८०-००० सात लक्ष ऐंशी हजार सालिना बारमाही. त्या पैकीं परगणे नडियाद येथील गांव जाबिदीत ५०००० पन्नास हजारांचे लावून दिले आहेत. व बाकी एक वर्षानें द्यावयाचे रुपये ७३०००० सात लक्ष तीस हजार रोख देऊं. यासी ऐवज परगणे कडी येथील किल्ल्याचा व महाल मजकुरचा वाजवी खर्च वजा होऊन जी अमदानी येईल ती व भावनगर वगैरे काठा कोठेवाड सत्तावन अट्ठावनचे फसली पैकीं व हरएक ऐवजा पैकीं सदर्हु सात लक्ष तीस हजार रुपये बारा आण्याचें व्याजसुद्धां एक वर्षानें भरून देऊं. यासी निभावणीस बहादर रा० बाबाजी आपाजी व अजम कमाल उद्दिन हुसेन खान बहादर दिल्हे आहेत. सदरहु लिहिले प्रमाणें

निभावणी केली. छ ५ सफर सुरूसन सलास मय्यातेन व अलफ. जादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दिजे. हे कितावत.

बाबाजी आपाजी वर लिहिल्या प्रमाणें सही हस्ताक्षर रावजी आपाजी.

कमाल उद्दिन हुसेन खान बहादुर.

यांची मोहर.

सदर्हु दस्ताऐवज जाहल्यावर कर्नल मेजर वाकर साहेब यांणीं बाबाजी साहेब यांस पत्र लिहून कळविलें कीं, ही वरात आह्मी गोपाळदास सराफ निसबत सरकार इंग्रज कंपनी बहादुर यांस दिल्ही आहे, तरी मुदती प्रमाणें ऐवज सराफ मजकूर यांस देऊन पावती घ्यावी ह्मणोन लिहिलें त्या पत्राची प्रत खालीं लिहिल्या प्रमाणें.

"अजम बाबाजी साहेब मोहबत हु० साहेब मुषफला लार्क फर माय दोस्तान आज दीन ये खमस सरदार मेजर वाकर सलाम बाजत सलाम अंकीं येथीस खैर जाणून आपली खैर हमेशा कलमी करीत असोन हल्लीं दिगर आलिकडे थोडे दिवस पत्र येऊन वर्तमान आपले कडून कळून बहुत संतोष जाहला. माझी मर्जी हीच कीं, आपले कुटुंबास व सर्वांचे सुख संतोष श्रवण इच्छा आपले मुलुखगिरीस पलठण यावयाची ती हल्लीं मवाशांचा बंदोबस्त होऊन आपणाकडे लौकरच येईल. आपले बंधु अजम रावजी साहेब कितीएक जाबसाल करावयाचीं कलमें संपूर्ण बोलिला आहे. आमचे कडील पलठण आपले कुमकेस यावयाची त्यास त्याविशीं मलाही सामान केलें पाहिजे. जागा कोणते ठिकाणीं, जाण्याचें कोठें व रस्ता कोणता त्याचा तपशील सविस्तर लिहावा. दुसरा मजकूर आपले

प्रवासी जे आहेत त्यांची फौज प्रत्येक प्रत्येक किती आहे, जमियत किती व पर्जन्य काळ प्रमाणें त्या जमल्या असतां छावणीस कोणते ठिकाणी रहावें. व आमचे पलठणीचा शिरस्ता आहे कीं, वरसात जाहला ह्मणजे छावणी छपर बंद करून राहावें. त्यास या जागी जागा कोणती हें सविस्तर विचार करून तपशिलवार लिहावें. आह्मास वरात परगणे कडी येथें दोन लाख देण्याची श्रीमंत सेना खासखेल समसेर बहादुर यांणीं खंबायतचे मुक्कामीं पलटणचें खत सात लाख तीस हजार रुपयांचें तुमचे व अजम कमालुद्दिन हुसेनखान बहादुर यांचे बहादारीचे त्या ऐवजाचें दिल्हें आहे. ती वरात आह्मी गोपाळदास सराफ निसबत सरकार इंग्रज कंपनी बहादुर यांस दिल्ही आहे. त्या मुदती प्रमाणें ऐवज सराफ मजकूर यांस देऊन पावती घ्यावी ह्मणजे बहुत योग्य आहे. ता० १२ एप्रिल सन १८०३ जादा काय लि० प्यार मोहबत असोंदिजे हे किताबत."

मेजर वाकर यांची इंग्रजी सही

पुढें श्रावण शु० ५ संवत् १८५९ अव्वल मृग सालीं ता० १८ माहे जुलई सन १८०३ रोजीं रावजी आपाजी कैलासवासी जहाले. सिताराम चिमणाजी यांस रावजी आपाजीस दत्तक देऊन हें वर्त्तमान मेजर कर्नल वाकर साहेब यांणीं मुंबईचे जनरल साहेबांस लिहिलें. त्या बद्दल गमनी समाधान बद्दल उत्तर गायकवाड राज्यांत सामार्थ्यवान, बुद्धिवान दिवाण रावजी आपाजी कैलासवासी जाहल्याचें वर्तमान तुह्मी लिहून पत्र पाठविलें, तें पावलें. त्यास तुह्मी श्रीमंत राजश्री आनंदराव गायकवाड सेना खासखेल समसेर बहादुर यांस कैलासवासीचे दत्तक पुत्र रावजीचे स्थानीं राजश्री सिताराम रावजी व कैलासवासीचे भाऊ रा० बाबाजी आपाजी व कुटुंब पहिलें, सर्वांस सांगावें कीं मुंबई संस्थानांत प्रधान वगैरे यांस बहुत दुःख जाहलें. व आजपर्यंत अठरा मास पेशजी पासून जसे मशारनिल्हे व दुसरे कारभारी यांस व या दरो-

बस्तांस व दुसेर संबंधी यांस इंग्रज कंपनी पासून नवीन मदत जहाली त्या अन्वयेंच पुढें मदत होईल. कैलास वासी दिवाणजी-चे वेळेस गायकवाड राज्याची व कंपनीची दोस्ती उत्पन्न होऊन राज्याचें संरक्षण आजपर्यंत जाहलें. त्यामुळें सर्वांनीं आश्रयानीं राहून फारस सदरें विश्वास ठेवून सरकारची दौलत व सारे गुजरात प्रांताच्या रयतेस वेलूकम होईल म्हणून निश्चय चित्तीं करावा, म्हणोन सांगावें. मि० श्रावण शु० ७ ता० २० माहे जुलाई सन १८०३

हु०

संवत्. १८५९

अजम बाबाजी साहेब ज्यादा मोहबत हु० आज दिल्ल ये खलास मेजर वाकर साहेब सलाम बाजत सलाम येथील खैर ता० छ २८ रविलावल जाणोन साहेबीं आपली खैरकिफायत हमेशा करीत असलें पाहिजे. दिगर रावजी साहेब यांस आज दोन प्रहर दिवसास देव आज्ञा जाहली. इश्वरें मोठें वाईट केलें, तें पत्रीं कोठवर लिहावें. असो. इश्वर इच्छेस उपाय नाहीं. आपण खेद न करावा. आणि तिकडे आपण सर्व प्रकारें मेवासी वगैर यांचा बंदोबस्त यथास्थित राखून विसानगर, वडनगर, व पट्टण व डास किल्ले कडील सुद्धां तुम्ही बंदोबस्त राखाल हा भरंसा आहे. परंतु वियोगजन्यदुःख करून बंदोबस्ताचा विसर न पडावा, म्हणोन सूचना लिहिली आहे. तारीख १८ जुलई संवत् १८५९ इंग्रजी सन १८०३ जादा काय लिहिणें प्यार मोहबत असों दिजे हे कितावत.

सही इंग्रजी मेजर वाकर साहेब यांची.

म्हाळसा कांत.

यादि रा० सिताराम रावजी यांस गायकवाड सरकारांतून त्यांचे बंदोबस्ता विशीं हर्दु सरकारांतून रावजी आपाजी यांस दत्तक दिल्हे सबब कागद पत्र करून दिल्हे, ते खालीं लिहिल्या प्रमाणें.

यादी रा० सिताराम रावजी यांचे तिर्थरूप कैलास वासी रावजी आपाजी यांणी तीर्थरूप कैलास वासी गोविंदराव महाराज यां जवळ चाकरी एक निष्ठेनी बहुत दिवस केली, त्याजवर नजर देऊन मशारनिल्हे यांचा कालक्षेप चालला पाहिजे जाणोन सरकारांतून कृपावंत होऊन नेमणूक ठरावून दिल्ही. सुरूसन सब्बा मयातेन व अल्फ संवत् १८६३ चे सालीं. सालिना.

२३००० मौजे साडली परगणे सिनोर व मौजे वोटवें परगणे अमदाबाद सरकार जमाबंदी दोन्ही गांवें मिळोन हल्लीं आकार.

६००० शिबंदी हुजूर मध्यें जिलिबी बद्दल.

११००० पोतदार यांज कडोन एकंदर साली आकारांतून दिल्हे जातील.

२०००० मौजे भाटें प्रांत चौऱ्यांशी हा गांव इंग्रज सरकारा कडोन इनाम आहे त्याचा आकार.

६०,०००.

एकूण साठहजार रूपये सन तिसा मयातेन व अल्फ संवत् १८६५ चे साला पासून करार लिहून दिल्हे आहे. सदरहु प्रमाणें अस्सल शिक्याची याद बंगल्यास देण्याकरितां बाबाजी विठ्ठल निसबत मुजुमदार या जवळ दिल्ही. ही अस्सल याद त्यांचे वाड्यांत असे.

दुसरें पत्र आनंदराव महाराजां कडून—

चिरंजीव रा० सिताराम रावजी यांस आनंदराव गायकवाड सेना खासखेल समसेर बहादुर आशिर्वाद उपरी. तुमचे तिर्थरूप कैलास वासी रावजी आपाजी यांची दिवाणगिरी मुखत्यारी काम तुह्मांस सांगितलें आहे, त्या प्रमाणें करीत जाऊन जसा तुमचे वडिलांनी इंग्रज बहादूर यांचा आमचा दोस्तीचा हक्क केला, त्या प्रमाणें तुह्मी दिवसें दिवस अधिक दोस्तीचा हक्क वाढवून आमचे राज्यास कोण-

तीही हरकत व कोणीही गैरवाजवी दंगा फितुरी न करी अशी तजवीज ठेवितआलां त्या प्रमाणें ठेवावी; आणि आमचें राज्य निरंतर कायम रहाण्याविशीं, बंडखोरांचें बंड मोडण्याविशीं वगैरे कंपनी इंग्रज बहादुरांसीं आपले करार नामे परस्पर जाहाले आहेत त्याप्रमाणें कायम राहण्याची व हरएक विशींची तजवीज ठेवावी. कोणाचा मेळ होऊं न द्यावा. आमचे वंशांतील पुरुष आमचे राज्यावर असोन त्यांची स्थिती चांगली नसोन राज्यास अपाय करील असा, अथवा कंपनी इंग्रज बहादूर यांचे दोस्तीचे हक्कांत खलेल करील व अनीतिनें चालेल असी तुमची व कंपनी इंग्रज बहादूर यांची खात्री जाहल्यास आमचे वंशांत नीतिनें चालणारा व राज्यालायक व हिम्मतदार जो असेल त्याजला गादीवर बसवून राज्य चालविणें; आणि दौलतीचें रक्षण करावें. कैलासवासी गोविंदराव महाराज यांची व तुमचे वडील रावजी आपाजी यांचो परस्परें जीं वचनें व क्रिया आमचें राज्य व तुमची दिवाणगिरी कायम रहाण्या विशीं जाहल्या आहेत त्या प्रमाणें चालतील. तुह्मांस व तुमचे वंशास आमचे वंशांकडून तुमचे मुखत्यारींत वगैरे हरकत होणार नाहीं. या करितां आमचे दौलतीचे मुखत्यारी व अखत्यारी ही तुह्मास आहे, तरी कंपनी इंग्रजबहादूर यांची दोस्ती ठेवणें, व राज्याचें रक्षण करणें. व आपले मुलकांतील रयतेचें रक्षण करणें. हें सर्व तुह्मांकडे तुमचे व आमचे वंशजांनीं परस्परें विश्वास ठेवावा. छ १७ रबिलाखर सुरुसन अर्बा मय्यातैन व अलफ संवत १८६० हे आशिर्वाद. सदरहू अस्सल पत्र मशार निल्हे वडयांतील.

आमचे आजे ति० कैलास वासी बाबाजी आपाजी यांही ति० कैलासवासी रावजी आपाजी निवर्तल्यावर कामकाज केल्या बद्दल:—

श्री ह्माळसाकांत

संवत् १८६९

रा० बाबाजी आपाजी गोसांवि यांस

अखंडित लक्ष्मी आळंकृत राजमान्य.

स्ने० आनंदराव गायकवाड सेनाखासखेल समसेर बहादर राम राम सुरूसन सितमयातैन व अल्लफ प्रांत झालवाडा व काठेवाड हालार सोट वगैरे मुलूकगिरीचें कामकाज तुह्माकडे सांगितलें असे, त्यास चहुंकडे व घांस, दाणा वगैरे पार पाडून रयतेस आबाद राखून मुलुकाचा फौजेचा बंदोबस्त उत्तम ठेवून मुलुकांत प्रलय पाडोन सरकार नक्षा यस्थास्थित राखणें. जाणिजे छ ८ माहे रजब मोर्तब सु०

शिक्का.

मोर्तब

हु०

संवत् १८६२

अजब बाबाजी आपाजी साहेब हु.

मेहरबान दोस्तान येती जाद मोहिबन खुखली सीयत येतीहाद निशा. आज दिलाये खमस ईनत्वयन जोनाथन डंकीन इस्क्वायर प्रेसिडेंट गव्हर्नर जनरल जंजिरे मुंबई बादेशा कमी माफोलार बहुत स-विनेस्तम शाहुदे पिलयत कसम जिलबांद-तुमचें पत्र छ १ जिलकादचे आंतील शर्करायुक्त पाठविलेलें त्याचा अत्यादरें स्वीकार केला. तुह्मां इकडील मजकूर सविस्तर आलिशान अजम मेजर वाकर साहेब यांचे वरचेवर लिहिण्यावरून व सरकार कामदार येतीबारी मोत्यमंदी अजम गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचे मुख जबानीवरून सविस्तर कळला. गायकवाड सरकारचे दोस्त त्यापेक्षां गायकवाड सरकारजमेकरितां खर्च विशेष-सबब कर्जाचा पेंच हमेशा राहून दौलत गिरत्या फार आहे. यामुळें दिवाणगिरीचे कामांत बहुत खलेल होतो-याचे अर्थ मनन करून जमाबरहुकूम खर्च होऊन मागील देण्याचा निकाल व्हावा असा बं-

दोबस्त दौलतीचा झाला. झणजे तुमचे सरकारचे खर्च द्यावा येविशीं-या पेशजी होऊन तुह्मा सुद्धां तुमचे कुटुंबास बहुत सुख व दौलतीचें चांगलें आहे, हे इरादे तुमच्याहो अंतःकर्णी वागतात. झणून या गोष्टींत आमचा संतोष आपले ठाईं बहुत. यांचे अर्थ मात्यमदी मशारनिल्हे शास्त्री यांसी रुबरू हुकूम केला आहे, तें सांगतां कळेल. सदरहु अन्वयें झाल्यास सरकार कंपनी बहादर यांजकडून हुकूम होईल. व तुमचे पुस्तपन्हा होणें यासीं कमती पडणार नाहीं. खातर जमा पुर्ती असावी. कोणे विशीं जुदाही नाहीं. खाना छ १५ माहे मोहरम ता० ५ एप्रिल सन १८०६ इसवी. ज्यादा काय लिहिणें, प्यार मोबत असो दिजे. हे किताबत.

जो नाथनडंकिन साहेबांची सही.

प्रांत काठेवाड व प्रांत झालवाड येथील रजवाडे व कांठी यांणी बाबाजी साहेबांस इनाम गांव मौजे रसनाल पिंपळवें व मौजे इडाळें किल्ले विढलगड पुऱ्या सुद्धां संवत् १८६२ चे सालीं दिल्हीं आहेत. त्याप्रमाणें संवत् १८६२ पासून आज पावेतों आह्मांकडे सतत चालत आहेत. लखतर वाले ठाकूर यांज कडोन मौजे किशोळ खेरदी पुऱ्या सुद्धां फरोक्त करून घेतलें. त्यास प्रांत काठेवाड येथील पोलिटिकल एजंट लांगसाहेब यांणी तकार उत्पन्न करून सदर किशोळ गांवास वांधा घातला आहे, याजमुळें किशोळ गांव पुऱ्या सुद्धां आह्माकडे खरेदिठरावाप्रमाणें हल्लीं चालत नाहीं. व मौजे लिलापूर हा गांव लखतर वाल्यानीं आह्माकडोन रुपये ३१०५३ एकतिस हजार त्रेपन्न संवत् १८७३ चे सालीं आषाढमासीं गाहाण ठेविला आहे. ते रुपलखतरवाल्यां कडोन ठरावाप्रमाणें पोलिटिकाल एजंट साहेब यांणीं न देवितां लिलापूर हा गांव आह्मास दाद न देतां एक तर्फी लखतर वाल्यांस सोपून दिल्यावरून काम चालत आहे. त्याविशीं विलायत पर्यंत मेहनत घेणें आह्मांस अवश्य जरूर आहे.

बाबाजी साहेब यांणीं काठेवाड प्रांतीं देवालयांचे जिर्णोद्धार पुष्कळ

ठिकाणीं केले, आणि श्री यवतेश्वर महादेवाचें देवालय परगणे कडी येथें व श्री सिद्धेश्वर महादेवाचें देवालय सिद्धपूर येथें, व निळकंठेश्वर महादेवाचें देवालय बडोद्यांत खासगत वाडयांत वडिलांही आपले खर्चानीं बांधून त्यादेवाचा खर्च निरंतर चालवावा ह्मणोन सरकारांत विनंती केल्यावरून श्रीमंत सरकारांतून गांव मौजे आळंदे सप-परगणे कडी महालीं श्री यवतेश्वर महादेव संस्थान कडी यांजकडे व मौजे सेद्राणें पठण महालीं श्री यवतेश्वर महादेव संस्थान सिद्धपूर यांजकडे-येणेप्रमाणें दोन गांव शिवार्पण करून देऊन त्यांच्या सनदापत्रेंही आह्मांजवळ करून दिल्हीं आहेत. आणि बडोदे महालीं श्री नीळकंठेश्वर महादेव संस्थान बडोद्यास दरसाल नक्त रुपये ३०० तीनशें शिवार्पण करून दिल्ह्याप्रमाणें आजपर्यंत चालत आहेत.

रावजी आपाजी कैलासवासी जाहले, नंतर बाबाजी साहेबांस बडोद्यास राज्याचा बंदोबस्त करण्यास आणावें, ह्मणोन श्रीमंत आनंदराव महाराज यांची आज्ञा. त्याविशीं पत्रें बाबाजी साहेबांस लिहिलीं तीं खालीं लिहिल्या प्रमाणें:—

श्रीमंत आनंदराव महाराज यांचें पत्र बाबाजी साहेबांस पाठविलें कीं; तुह्मी बडोद्यास राज्याचे बंदोबस्ताचें काम चालविण्या करितां यावें ह्मणोन लिहिलें आहे तें दप्तरीं पाहून दाखल करणें.

रा० सिताराम रावजी यांचें पत्र बाबाजी साहेबांस पाठविलें त्यांत श्रीमंत महाराजांसही बडोद्यास येण्याविशीं लिहिले प्रमाणें आपण येणें. राज्याचे बंदोबस्ताचें काम चालविण्या करितां सत्वर यावे ह्मणून लिहिलें आहे. त्याचा दप्तरीं तपास करून दाखल करणें.

हु.

अजम बाबाजी साहेब मुक्काम लष्कर ज्यादा मोहबत हु०

साहेब मुषफिक मेहरबान कर्म फरमार्य दोस्तान आजदीन यें खमस मेजर वाकर साहेब सलाम बाजत सलाम— येथील खैर जा-

णेन आपली खैर आफियत कलमी करीत जावी. दिगर अजम बापु मैराळ यांचे भेटी अंतीं सविस्तर आपणास कळलेंच असेल; त्या अन्वयें स्वारी जलद यावी. बापु मैराळ यांणी अजम गंगाधर शास्त्री यांस पत्र लिहिलें. गाडद्याचे शिपाई मोध्यांस सामोरे याचे लिहिलें त्यास या विशीं काळजी आपण काडिभर न ठेवावी. बाबाजी साहेब आपली ज्यान अबरू ती जसी आमाची ज्यान व अबरू यांत तफावत नाहीं, हें खचित समजावें. आपण खातर जमा राखेान येथें यावें. भेटिअंतीं येथें तुमचें रहाणें संतोषानें जाहल्यास उत्तम. नाहींतर अजम महाराज आनंदराव गायकवाड सेना खासखेल समसेर बहादुर यांचे परवानें व अबरू व हुर्मतीनें तुह्मांस रजा देवऊं. तुह्मी आपले कामावर असे आपली खातर जमा व्हावी. सबब कालच अजम गव्हर्नर जनरल साहेब यांचें पत्र पाठविलें आहे. व हल्लीं आपली पूर्ण खातर जमा व्हावी ह्मणेान हें पत्र लिहिलें आहे. कैलास वासी रावबा बाबा साहेब यांचे हरएक माणसाची बरदास्त व्हावी सबब आमचे सरकार व आह्मी हमेशा तयार आहोंत. त्यांत आपण तर कैलास वासी रावबा बाबा साहेब यांचे योग्यतेचे प्रत्यक्ष बंधु; त्या पेक्षां संशय सर्वथा नधरावा. आणि आह्मी मेहनत करितों याचें कारण ही आपण सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास मनांत येईल. बाबाजी साहेब हें पत्र आपणास खातर जमा व्हावी सबब आह्मी आपलें खानगी पाठविलें आहे. परंतु आपणास येण्याविशीं अजम सिताराम रावजी दिवाण यांणीं पत्र पाठविलें आहे, त्याचा जाव त्यांस लिहावा, कीं तुह्मीं पत्र पाठविलें सबब निकडीनें येतों. परंतु श्रीमंतांचें पत्र असावें, तें पाठविण्याविशीं मेजर साहेब यांस लिहिलें आहे. व एक आह्मांस लिहावें कीं चिरंजीवानी पत्र निकडीनें येण्याविशीं लिहिलें सबब आह्मांस बडोद्यास येणें आहे तरी आपण आपलें सरकारी पत्र व महाराजांचें पत्र असें पाठवावें. या प्रमाणें लिहून पाठवावें. ह्मणजे आह्मी आपले सरकारचें पत्र खा-

तरजमे विशींचें महाराजांचें पत्र महाराजांस अर्ज करून पाठवू. परंतु अतःपर दीनावधि न फिरितां यावें. ता० २९ आगष्ट छ १० जमादिला खर सन १८०६ ज्यादा काय लिहिणें. प्यार मोहबत असो दिजे हे किताबत.

मेजर वाकर सही इंग्रजी.

अजब बाबाजी साहेब मु० लष्कर जादा मोहबत हु.

साहेब मुषफिक मेहरबान कर्म फरमाय दोस्त अजदील ये खलास मेजर वाकर साहेब सलाम बादज सलाम दिगर. आपण पत्र छ ४ रजबचें अजम बापू भैराळ यांस पाठविलें तें पोंचून त्यांतील सविस्तर अजम गंगाधरशास्त्री यांणीं समजाविलें, त्यावरून कळेल त्यास आपण बहुत उदासीनतेचे अर्थ दर्शविले तितके ही पाहिले असतां चित्तांत येण्या जोगे. परंतु आह्मी जो विचार योजिला आहे तो पक्काच. त्याचें सविस्तर बापू आपणास कळवितील, त्याजवरून ध्यानास येईल. त्याच्याविशीं आपण किमपी संशय ठेऊं नये. पेशजी व हल्लीं तहनामे झाले आहेत त्यांच्याच नकला करून सही करून आपणास देऊं परंतु अतःपर येण्यास मात्र दिरंग लागूं नये. तारीख २३ सपटंबर छ ९ रज्जब सन १८०६ जादा काय लिहिणें प्यार मोहोबत असो दिजे. हे किताबत.

मेजर वाकर साहेब यांची सही हु.

संवत १८६२

अजम बाबाजी साहेब मुक्काम लष्कर जादा मोहोबत हु.

साहेब मुषफिक मेहरबान कर्म फरमाय दोस्तान आज दिन ये खलास मेजर वाकर साहेब सलाम बादज सलाम. येथील खैर जाणून आपली आफियत हमेषा कलमें करीत जावी. दिगर आपण पत्र छ १३ माहे जमादिलाखरचें पाठविलें त्यांत मजकूर. अजम

सीताराम रावजी दिवाण बापू साहेब यांणी आपणांस निकडीनें येण्याचें लिहिल्यावरून आपण श्रीमंत महाराज यांचे दर्शनास येणार त्या विशीं श्रीमंताचें पत्र आमचें व पत्र यावें ह्मणून लिहिलें त्यावरून अजम बापू साहेब आपले येण्याचा बहुत संतोष. सबब सरकारचेंपत्र बापू साहेब यांणीं घेऊन पाठविलें आहे. व सविस्तर बापू साहेबांनीं लिहिलें आहे, त्याजवरून कळेल. बाबा साहेब! आह्मांस ही आपले येण्याची बहुत खुषी आहे. आपली ज्यान मान व हुर्मत यांचें संरक्षण हमेषा करण्याविशीं दोस्ती आमचे सरकारास कैलास वासी रावबा साहेब मुस्तकिम करून गेले आहेत ही गोष्ट प्रसिद्ध झाली आहे त्यापेक्षां या विशींचा संशय आपणास नसेलच. आपण येथें येऊन श्रीमंताची व सर्वांची भेट घेऊन आपल्या खुषीनें पुनः आपलें कामावर जाणें होईल. या विशींचा अंदेशा नसावा. ता० सपटंबर छ १२ माहे जमादिलाखर सन इंग्रजी १८०६ जादा काय लि० मोहोबत कीजे हे किताब.

इंग्रजी सही वाकर साहेब यांची.

हु.

सवत् १८६३

अजम बाबाजी आपाजी सलाम हु.

मेहरबान दोस्तान यतिज्जादे मोहिबान असुशियत व येतिबाद निशा. आज दिल ये खलास हानराबल जोनाथल डंकीन इस्क्वायर प्रेसिडेंट गव्हर्नर जनरल जंजिरे मुंबई शोला मा फोलाबरामुत सर्वी जेस्तम शहुद दिलये खमस मजीन बाद हल्लीं तेथीलची वर्तणुक अशरफमंद अजम मेजर वाकर साहेब यांजकडून समजण्यांत येत आहे, त्यास गायकवाड सेना खासखेल समसेर बहादुर यांचे सरकारचे दौलतींत मनस्वीं खर्च सबब बंदोबस्त करण्या विशींचा क्रम चालू जहाला. यांत इकडील संतोष मान्यता, येणे करून आपणास संतोष होईल. हल्लीं ईश्वर सत्तेनीं बंदोबस्ताचे कामास प्रारंभ जहाला, ते विशीं इक-

डील हीच सल्ला. जे रेसिडेंट साहेब यांचे अनुमतें आपले अक्कल मंदीनें श्रमतें कमी न होतां अमलांत यावें. आपले पुतणे अजम सिताराम रावजी यांस व त्यांचे बंधूचे ठायीं ममतावादें करून धारले कामांत त्यांस अनुमत व कुमक द्यावी. कारण आपण सर्व एक कुटुंबी, सबब हानराबल कंपनी सरकार सर्वांचें कल्याण व संरक्षण करण्यास मनः पूर्वक चाहतात, येविशीं खातर जमा असावी. आपण गायकवाड सरकारचे दौलतीचे खेरखाईचे लक्ष्य ठेवून बेमिलाफ काम चालवितील, त्यांत इकडील सरकारची मेहरबानी असे. रवाना ता० ७ फेब्रुवारी सन १८०७ छ २८ जिलकाद ज्यादा काय लिहिणें मोहोबत कीजे हे किताबत.

हु.

संवत् १८६२

अजम बाबाजी साहेब ज्यादा मोबत हु०

साहेब मुषफिक मेहरबान कर्म फरमाय दोस्तान– आजदिल ये खलास मेजर वाकर साहेब सलाम बादज सलाम. येथील खैर खुषी जाणोन साहेबीं आपली खैर आफियत हमेषा कलमी करीत असलें पाहिजे. दिगर पेशजी येथून आपणास पत्र लिहिलेंच आहे. त्यास तात्पर्य हें च कीं अजम गंगाधर शास्त्रीबावा यांची रवानगी त्वरेनें व्हावी तें घडलें. असल्या भरशावर खातरेंत आलें कीं काय? कामाचा बंदोबस्त आपण एक निष्टेनें श्रम करून करितां येणें करून कामकाज आटोपण्यांत आलेंच असेल. त्यास प्रथम प्रारंभा पासूनं आपण चित्ताचा खंबिर ठेवून आपले बुद्धिनें व श्रमें करून वर्तणूक करून दाखवितां या पेक्षां कंपनी सरकारांत अधिक संतोष काय? यांत जे जाहले बंदोबस्त याचे संतोषाचीं. पत्रें बंगाल सरकारची मुंबई सरकारांत लिहिलीं आली. व हें वर्तमान विलायतेस लिहिलें यानें सदरहु प्रमाणेंच संतोष मानतील. व मागें तिकडून ही किती एक वेळ या बंदोबस्ता विशीं अगत्य वादें पत्रें आलीं. कीं आपले

दोस्त गायकवाड सरकार यांचे दौलतीस चांगलें तेंच घडावें. त्यास याचे प्रारंभा पासून आपले विद्यमानें उत्तम प्रकारें वर्तणूक होत आली त्यावर त्या अन्वयें आह्मीं ही लिहित गेलों याजवरून सरकारचे चित्ता पासून प्रीति पुरस्कर हेंच लक्ष्य, कीं या कामाचा बंदोबस्त प्रारंभ केल्याप्रमाणें आपण बुद्धिनें श्रमें करून सरकार लक्षाप्रमाणें मनोदयांत आणिला असेलच. यांस हल्लीं आपले सर्वांचे भूषण–यांतच कीं ज्या कामाचा प्रारंभ केला तो जलदीनें आटोपण्यांत यावा. या करण्यांत आणखीही अधिक च्यार दिवस मेहनत केली असतां कोणताही वेध राहणार नाहीं. व जो कोणी या बंदोबस्त होण्यांत सामील नसतां आपणावर शब्द ठेवण्यास इच्छील त्यासही उच्चार करण्यास आरुता राहणार नाहीं. त्यांस जी चिंता आमचे मनांत ते ह्या पत्रांत आपणास दोस्ती इराद्यानें लिहून दर्शविली आहे. हें आपण मनन केलियानें ध्यानांत येईल. त्यास आमचे चित्तांतील अभिप्राय हाच कीं, हा बंदोबस्त लौकर अमलांत यावा तेव्हांच गायकवाड सरकारचें कल्याण, व आपली अब्रु. या पूर्वी आपणास लिहावें तरी लिहिण्यासारखा मजकूर नव्हता, सबब लिहिलें नाहीं. इकडील काम काजाची स्थिरता पर्जन्याचे अतिवृष्टीमुळें व अजम विठ्ठलराव दिवाणजी लष्करांत येऊन सामील न जाहले सबब त्यांस त्यांची मुलाकत उदयीक होईल. या उपरी आपणास वरचेवर लिहिण्याचा प्रसंग पडेल. काम काजाचे जसे जमा देण्यांत येत जाईल, तसे आपणास बेरच वर कळविण्यांत येत जाईल. व आपली ही या अन्वयें तिकडील काम काजाचें आटोपल्याची वरचेवर पत्रें येत असावी. यांत दिलास खुषी. तारीख १३ माहे आगष्ट सन इंग्रजी १८०७ छ ८ जमा दिलाखर ज्यादा काय लिहिणें प्यार मोहबत असोंदिल्ही पाहिजे हे किताबत. मुक्काम लष्कर मौजे घाटु तालुके मोरवी.

मेजर वाकर साहेब यांची सही इंग्रजींत

बाबाजी आपाजी हे काठेवाडांतून श्रीमंत सरकार आज्ञेनें बडो-द्यास आल्यावर राज्य कारभार संबंधी व खुद्द जातीची नेमणूक करून दिल्याबद्दल सनदा पत्रें झालीं त्याच्या प्रती खालीं लिहिल्याप्रमाणें.

हु.

अजम बाबाजी साहेब ज्यादा मोहबत हु.

साहेब मुषफिल मेहरबान कर्म फरमाय दोस्तानअ जदिल्ल ये खमस मेजर वाकर साहेब सलामबादजसलाम. येथील खैर जाणोन साहेबीं आपली खैर आफियद हमेशा कलमीं करीत असलें पाहिजे. दिगर पेशजी आपणास होळकर यांचे वकिलाविषयीं जें उत्तर लिहून पत्र रवाना केलें तें पाहून सविस्तर आलेंच असेल. त्यांस त्याचपत्रीं मजकूर लिहावयाचा होता परंतु विस्मरणामुळें लिहिण्यांत न आला, त्यास हल्लीं लिहून सुचवितों जे आह्मी बडोद्याहून निघाल्यानंतर फिरून अजमिस्तर मरसर साहेब यांणीं आह्मास पत्र बहुत अगत्यवादें अजम दौलतरावशींदे यांचें मागणें हुंडणावळ बट्याबाबत गायकवाड सरकारांत त्याचा निकाल व्हावा या विशीं लिहून आलें; त्यास ज्याअर्थीं शिंद्यानें हें मागणें इतके दिवस केलें नव्हतें त्या पक्षीं हें चित्तांत आणून सर्व अर्थें उपयोग समजून त्याची इच्छा सबब निकाल करण्याचें मानणे करावें. कारण त्यांचें हल्लींच्या प्रसंगीं इकडून ज्या विशींचीं पैरवी झाली असतां त्याचा उपयोग आणि लेहास युक्त पडोन संतोष मानतील. त्यास याजविशींचे आपणाशीं बोलावयाचें. अजम कर्नल साहेबांस लिहून सुचविलें असें. दुसरें अजम विठ्ठलराव दिवाणजी यांची नित्यशः भेटी होत आहे आणि अतिसहवासानें मशारनिल्हे विशींची दिवसें दिवस विशेष खातर होते. बाबाजी साहेब आपण दिवाणजीविशीं आह्मास सांगितलें होतें त्या अन्वयें मशारनिल्हेची स्थिति रीत व सर्व गोष्टींत वांकबगारी व पोक्त अक्कल काम कामांत हुषार हें सर्व समक्षता जाहल्यानें दृष्टीस आलें; या अर्थें जादा काय लिहावें. तारीख १०

सपटंबर इंग्रेजी १८०७ छ १ रजब–प्यार मोहोंदत असो दिली पाहिजे हे किताबत-

हु.

अजम मेजर वाकर साहेब दाम मोहबद हु. आजदिल ये खलास आनंदराव गायकवाड सेना खासखेल समशेर बहादूर सलाम दिगर. राजश्री बाबाजी आपाजी हे दौलतीचीं कामें उत्तम प्रकारें करीत आले व हल्लीं कोठवाडवैगेर मुलुखगिरीचीं कामें सरकार नक्षोंनें करून सरकार आज्ञेवरून हुजूर भेटीस आले. पुढील दौलतीचे बंदोबस्तास योग्य जाणून मशार निल्हेस दौलतीचे खासगी दरकांचें काम वंशपंरपेरें सरकारांतून करार करून दिलें आहे. त्याच्या सनदा तयार करण्याविशीं चिरंजीव सीताराम रावजी यांसीं आज्ञा जाहली आहे, तरी तुह्मी व ते एकत्र होऊन सनदा तयार

शिक्का.

करून दरकांची निभावणी चिरकाल अजम कंपनी बहादर यांची बाहेदारी करून द्यावी. सनदा लौकर तयार करविणें. वस्त्रें दिलीं पाहिजेत. सुरूसन मयातेन व अलफ.

खाशांचे स्व दस्तुरचीं अक्षरेंः–

सदरीं लिहिल्या प्रमाणें निभावणी करून दिजे. र० बारावासाबान.

शिक्का.

श्री झाळसा कांत.

संवत् १८६३

यादी सरकार दौलतींत लोचा फार जाहला सबब राजश्री बा-

बाजी खासगीवाले यांणीं बंदोबस्त करावा. येणें प्रमाणें कलमें सुरूसन सबां मयातेन व अल्लफ. कलमें.

१ सरकार दौलतीच्या खासगी दरकांचें काम तें बहुत विश्वासाचें तें तुह्मांस सांगितलें असे तरी सीताराम रावजी दिवाण यांचे हक्कांत व योग्यतेंत न्यून न पडे व दौलतीस नुकसान न होय याप्रमाणें चालावें. व सरकारी कामाच्या यादी तुह्मी कराव्या त्यावरी खाशांचे देखावे व्हावे. नंतर सरकारांतून मुकरर होईल ती सर्वांस मान्य. सरकारी कामें तमाम सर्व दरकदार सुद्धां भद्रेत करावी. दरोबस्त कागद पत्र सरकारचे व्हावे.

२ दौलतीची जमा मुलकी वगैरे तपासून त्यांत सतरा लक्ष पंचावन हजार रुपये रद्द कर्जास राखून बाकी ऐवजांत सरकारी वगैरे खर्च युक्त पाहून मान्य तो सरकार हुर्मतींत न्यून नपडे आणि मुलकी बंदोबस्तांत बाकी न पडे असा बंदोबस्त करावा. महाल मुलकी वगैरे दरोबस्त हिशोब इस्तकबील तागायत तपासून खासगीवाले यांणी खासगी कडे घ्यावें. कलम.

३ फौज; शिलेदार; पागेदार; शिबंदी; यांचा हिशोब आज पावेतों जुजरुसीनें करावा. त्या पैकीं वसूल यत्किंचित् मजुरा देऊन बाकी निघेल त्याचा कर्जाऊ ऐवज घेऊन फडशा करावें. पुढें ठेवणें त्यास लोभ करून पक्षापक्ष न करितां मनुष्य पाहून अब्रु माफक दरमहा निक्षिनें ठरवून बंदोबस्त करावा. त्यांणीं सर्वांनी सरकार हुकुमा प्रमाणें हजीरीस व काम काजास हरवक्त बेहुजूर सिद्ध असावें. कलम.

४ सरकार खेरखाईचा बंदोबस्त दौलतींतील दरकदार वगैरे मोठ्यां सुद्धां सर्वांनी तुमच्या वाजवीच्या सल्ल्यानें चावून आपलाले कुवती माफक अकलेनें व पैक्यानी सरदार व दरकदार व सावकार मामलेदार वगैरे सर्वांनीं सेवेंत तत्पर असावें. आणि तुह्मास हल्लीं हुकूम केला आहे त्यास सरीख असावें. कलम.

५ महालच्या वहिवाटी सरकार नफ्याचा विचार ध्यानास आणून कराव्या. सरकार किफायत करण्यास सर्वांच्या हातांत कोणास आसाह्य वाटल्यास सरकार नफासमजून त्यांचा पक्षपात धरूं नये. देखावें. कलम

६ हानराबल कंपनी सरकार आपल्या सरकारास हमेषा कुमक देतात व देतील, हा भरंसा. सबब तुह्मी त्याशीं व्यवहार अकृत्रिमपणें राखावा. कलम

७ सदरहु प्रमाणें दौलतीचा बंदोबस्त करण्याचा हुकूम तुह्मांस केला आहे. या करण्यांत तुह्मांस बहुतांचा असंतोष होईल सबब तुमचें खातरजमेस कंपनी इंग्रज बहादूर बहादार दिल्हे असत. तरी एक निष्ठेनें खेर खाईनें सरकार करीत जावी. सदरहु प्रमाणें खाशाचे मान्यें सहो. कलम.

७

१० छ ७ जिलकाद मोर्तब सु. रुइने हनराबल कंपनी इंग्रज बहा आहेत.

शिक्का.

सदरहु वाजवीचे दर बहादर दिल्हे

इंग्रजी सही.

मोहर फारशी.

श्री. झाळसा कांत

राजमान्य राजश्री बाबाजी आपाजी गोसावि यांसी अखंडित लक्ष्मी अळंकृत

स्नेहांकित. आनंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादूर सुरूसन सबां मय्यातेन व अल्लफ. तुह्मी पूर्वी पासून सरकारचें पदरचें काम काज एक निष्ठेनें करीत आलां व हल्लीं कडीची मसलत

व काठेवाड प्रांताची स्वारी सरकार नक्षानें करून बंदोबस्त चांगला केला, त्यावरून सरकारांतून कृपाळू होऊन खासगी दरकाचें काम तुह्मांस सांगितलें असे. तरी तुह्मी एक निष्ठेनें दरकांची वहिवाट करणें. दरक संबंधीं दायत्यांची याद आलाहिदाकरून दिल्ही आहे, त्याप्रमाणें दरक दायते सुद्धां अनुभव वंशपरंपरेनें घेत जाणें. सदर्हूचें निभावणीस वाजवीचे स्नेहानें अजम कंपनी इंग्रज बहादूर बहादार दिल्हे आहेत. जाणिजे छ ७ माहे रमजान.

शिक्का. शिक्का.

सदरहु वाजवीचे स्नेहानें इंग्रज कंपनी बहादूर बहादर असत.

ईग्रजी शिक्का.

श्री म्हाळसाकांत.

यादि राजश्री बाबाजी आपाजी खासगी वाले यांसी खासगी दरकांचें काम साल गुदस्त सांगोन सनद छ ७ माहे रमजानची जाहली आहे, त्यांत दायत्यांची यादी दरक संबंधें आलाहिदा करून दिली आहे. त्याप्रमाणें सालगुदस्त सन सब्बांमयातेनचे अव्वल सालापासून दायते महालानिहाय दरसाल वंशपरंपरेनें करार करून दिले त्याजबद्दल सुरूसन समान मय्यातेन व अलफ छ ११ माहे रबिलाखर.

१००१ परगणें बडोदें.	२५० परगणें मोतर.
७५० परगणे पेटलाद.	३०० „ शिनोर.
७५० परगणें अमदाबाद.	२०० „ कारळें.
२२० परगणें. विजापूर.	३०० „ राजपिंपळें.
	१२५ „ महूद
२०० „ विसानगर.	२५० जकात सायर कोटा.
७०० „ पट्टण.	३० कसबें उमरट.
२०० „ जिल्हें सोनगड.	२५ कसबें नालेज
	१२५ ठाणें पार्द्रे.

१०० „ परगणें नवसरी.
१०० „ बलसाड
२०० „ टेंभें.
१०० „ कासें अथवाळ.
२०० „ मोहें.
१०० „ तिलक वाडा.
५७५ „ कडी.
१०० ठाणें देहगांव.
५०० परगणे ढवळकें.
२०० „ वसराई.
१०० „ कडोद.
२५० जकात तापी उत्तर तीर.
७५ परगणें वाघोडें.
१०० अंतापूर बिसनपूर
१०० कसबें वरयाव.
५० रंगार घांट.

१०० खेरालू.
२५ परगणें चांदोड.
२५० परगणें साव खेडा.
२०० „ कदड बंद
३०० „ नडियाद.
२०० काम रेज.
२०० परगणें मरोळी.
३५० „ तेलाडी.
२५० „ वपोर.
२५० „ घणदेवी
३५० „ बेलसर.
१०० बंदर बिलीमोरा.
५० परगणें तडकेश्वर मोतें.
३७०० मुलुखगिरी.
२५०० काठेवाड.
१२०० महिकाठा.

२०० परगणें घलें.
२०० „ वडनगर ३७००

१५००१

एकूण पंधरा हजार एक रूपया दायते महाल मुलुख गिरी यांजवर साल गुदस्त पासून दरसाल वंशपरंपरेनें करार करून दिले ओहत. तरी सदरहु दायते साल दरसाल घेऊन सरकार चाकरी इमाने इतबारें करीत जाणें. जाणिजे छ ११ माहे रा॥ खर मु० बडोदें. मोर्तब .

मोर्तब.

श्री

यादी राजश्री बाबाजी आपाजी खासगीवाले यांस दरकाचें काम साल गु० सांगोन सनद छ ७ माहे रमजानची जाहली आहे. त्यांत दायतेयाची यादी दरक संबंधें आलाहिदा करून दिली आहे त्या प्रमाणें साल गुदस्त सन सबां मयातेनचे अवल साला पासून दायती, शिलेदार व पागेदार व शिबंदी यांजवर दरसाल वंशपरंपरेने करार करून दिले. त्या बदल कलमें. सुरू सन समान मयातेन व अलफ छ ११ माहे रा॥ खर

कलम

१ शिलेदार यांचे दर स्वारी दरसाल एक रूपया करार करून दिला आहे त्या प्रमाणें घेतजाणें.

१ हुजूरांत पागा व पतकी पागांनिहाय. दरसाल दर स्वारी रूपया अर्धा करार करून दिला आहे त्या प्रमाणें घेत जाणें.

१ शिबंदीवार दायते शिकेनिशींच्या दायत्यां प्रमाणें कारारकरून दिले आहेत त्याप्रमाणें घेत जाणें.

३

दरक संबंधी दस्तूर शिलेदार व पागा व शिबंदी यांजवर सदरहु प्रमाणें साल दरसाल करार करून दिल्हे असे. या प्रमाणें घेऊन सरकार चाकरी इमानें इतबारें करीत जावी. जाणिजे छ ११माहे रा॥ खर मु॥ बडोदें मोर्तब.

मोर्तब.

श्री झाळसाकांत.

संवत् १८६४

राजश्री बाबाजी आपाजी खासगी वाले. गोसावी यांस.

अखंडित लक्ष्मी आळंकृत राजमान्य

श्रे० आनंदराव गायकवाड सेना खासखेल समसेर बहादूर रामराम. सुरूसन समान मयातेन व अल्फ. सरकार दौलतीवर कर्ज बहुत होऊन ओढगस्त जहाली सबब तुह्मी अजम कंपनी इंग्रज बहादर यांसीं सरकार आज्ञेवरून बर्तफीच्या वगैरे ऐवजांचा बंदोबस्त करून शिलेदार, शिबंदी व पागादार यांचे हिशेब दुरुस्त करून सर्वां पासून सूट वगैरे मेहनत करून सरकार खैरखाईचा बंदोबस्त केला. त्या वरून सरकारांतून कृपावंत होऊन तुह्मांस इनाम गांव तपशील.

५००० मौजे कराळी पा० बडोदें देह एक.
५००० मौजे सोनेवाडी पा० घणदेवी देह एक.

१००००

एकूण दहा हजार रूपयांचीं गावें दोन. जल, तरू, तृण, काष्ट पाषाण, निधिनिक्षेपसहित साल मजकुरापासून करार करून दिले आहेत. तरी सदरहु गांवचा तुह्मी अनुभव पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें साल दरसाल घेत जाणें. सरकारांतून चिरकाल वंशपरंपरेनें गांव चाल विले जातील. जाणिजे छ ९ माहे रविलाखर मोर्तब सु.

मोर्तब.

श्री झाळसा कांत.

संवत् १८६५

यादी राजश्री बाबाजी आपाजी खासगीवाले यांचा कारकून मंडळी सुद्धां खर्चाचा बंदोबस्त साल मजकुरापासून चालू सुरूसन तिसा मय्यामय्यातेन व अल्फ.

१०००० खासा मशारनिल्हे.
७०००१ सरसाल योग्यतेनुसार खर्चा बद्दल ठराव.

३५००१ खासगी दरकांचे महालानिहाय व शिलेदार, पागेदार, शिबंदीचे दायते इनाम व गांव मौजे कराळे परगणे बडोदें व मौजे सोनेवाडी परगणे घणदेवी पेशजी करार करून दिले त्यां बद्दल.

३५००० महालानिहाय कित्ता दरबार खर्चाचे बाबती पैकीं घेत जाणें.

७०००१

३०००० खासगत घोड्यांचा खर्च चालावा सबब अमदाबाद येथें शिबंदी पैकीं शंभर स्वार करार करून दिल्हे आहेत. त्यांस तेथें हजरी देऊन चाकरी तैनातीनें करणें व तीस हजार स्वारां बद्दल ठरावाचे महालचे शिबंदीचे नेमणुकी पैकीं घेत जाणें.

१०००१

२२९०० कारकून मंडळीचे तैनातीचा ठराव दरसाल.

६००० कृष्णराव भगवंत.

१००० पालखी बद्दल नेमणूक पेशजी कडीस करार करून दिल्ही आहे ती चालत आहे

५००० जातीस.

१००० परगणे पट्टणची असामी पेशजी करार होऊन चालत आहे.

४००० परगणे कडी येथें खेरीज नेमणुकी सुकडीबाब जमे

पैकीं पावत जातील.

५०००

६०००

९९०० विठ्ठलराव देवजी.

३९०० हुजुरात पागा मशारनिल्हे-चे नांवे आहे त्यांत पाल-खी शागीर्दपेशा व तैना त बाबद दरमहा रूपये ३२५ प्रमाणें आहे. बाबद आकार बारमाही रूपये.

६००० प्रांत काठेवाड मुलुखगिरी वर दरमहा पांचशें पेशजी करार करून देऊन पत्रें करून दिल्हीं आहेत ते.

९९००

३००० बापशाजी दामोदर.

६०० प्रांत काठेवाड मुलुखगिरी पैकीं दरमहा रूपये पंन्नास प्रमाणें चालत आहे तो बारमाही आकार.

२४०० चिटणीशी दायते व महाला निहायखेरीज नेमणुकी आहे त्या पैकीं दरसाल पावत जातील.

३०००

४००० रामचंद्र मरोळ यांसीं तैनात तीन हजार व पालखी बाबद एक हजार एकूण चार हजार पेशजी करार करून दिल्हे त्या ऐवजीं मौजे वासणासेद परगणें बडोदें व मौजे आसणा परगणे तेलाडी हे दोन्ही गांव लावून देऊन पत्रें आलाहिदा करून दिलीं असत त्या प्रमाणें चालविले जातील.

२२९००

१२२९०१

एकूण एकलक्ष बावीस हजार नऊशें एक रुपया सरसालचा ठराव करून सदरहू ऐवज यादीस लाविला आहे त्या प्रमाणें साल मजकुरा पासून सालदरसाल सरकारांतून निभाविलें जाईल. या खेरीज कोणी एक पैशाची प्रतरणा हर एक कामांत करून लोभ करूं नये. करार करून दिल्या प्रमाणें घेऊन सरकार चाकरी इमानें इतबारें करीत जावी. जाणिजे छ २१ माहे जिलकाद मुक्काम बडोदें मोर्तब सु.

मोर्तब असे.

श्री मल्हारी कांत.

संवत् १८६९

राजश्री बाबाजी आपाजी खासगीवाले गोसावि यासीं लेहांकित. आनंदराव गायकवाड सेना खासखेल समशेर बहादूर रामराम. सुरूसन तिसां मयातेन व अल्लफ. निरभेराम सुरेश्वर देसाई परगणें

बडोदें यांचें वतन वपसायत व वनिफेची जमीन सरकारांत जप्त जाहली आहे त्या पैकीं तुह्मास बाग करण्यास सरकारांतून कृपाकरून जमीन फतेबागचे पश्चिमेस बोरसळीचा कुवा सहाकोशीं बांधलेला आहे त्या सुद्धां तपशील.

१ बोरसळीचा कुवा बांधलेला सहा कोशीं नग एक.
२३। जमीन कुंभे सुमार.

१९। बोरसळीचे कुव्या खालील सुलतानवाडीची कुंभे.

६। अनारसी भिकम याज बद्दल.
६ मुलजी कडुवा बद्दल.
३ पुरुषोत्तम भिका बद्दल.
२ बेचर भूकण बद्दल.
१ हवाल दारींतील.
१ बजाणी यांतील.

१९।

४ आदम पुरची, कुंभे.

२३।

एकूण कुवा सहाकोसीं नग एक व जमीन कुंभे सवा तेवीस सदरहु प्रमाणें दिली असे; तरी त्या जमिनींत बाग करून अनुभव घेत जाणें. सरकारांतून चालविलें जाईल. कदाचित् देसाई मजकूर यांचें वतन सरकारांतून मोकलीक करणें ठरल्यास याजमिनींतील कुवा व जमीन सरकारांतून तुह्मांकडे वंशपरंपरेने चालविली जाईल. जाणिजे छ १४ माहे साबान मोर्तब सु.

मोर्तब.

हु.

संवत् १८६९

अजम अक्रम महाराज आनंदराव गायकवाड सेना खासखेळ समसेर बहादूर ज्याहां.

साहेब मुफ्फला मेहरबान लार्क फरमाय मुखलीसान आजदील एखलास कर्नल अलक आडर वाकर रसिडेंट सलाम वादज सलाम येथील खैर जाणोन आपली खैर यत हमेषा कलमी करीत असलें पाहिजे. दिगर आह्मीं आपल्या पासून रजा घेतली त्या दिवसीं आपण रुबरू रूमुखें बोलण्यांत जें, हर्दू सरकारची दोस्ती व येखलास कायम चालण्याविशीं व आपल्या कबिल्यास कंपनी सरकारांनी वाजवीच्या रुईनें कुमक करावी जाणोन अजम फत्तेसिंग राव बाबा साहेब व अजम बाबाजी आपाजी खासगीवाले उभयतांस आह्मी अखेर सल्ला लिहिली आहे त्याप्रमाणें आपण उभयतांचे ठिकाणीं विश्वास हमेषा ठेवून आपल्या राज्यास जे श्रेयस्कर तेंच करीत असावें व ज्यांत कंपनी सरकारची दोस्ती दीवसेंदिवस ज्यादा होय तेंच अर्थ होऊन आह्मी विलायतेस हमेष हीच खबर ऐकत असावी असें घडावें. छ २४ जिलकाद तारिख ११ जानेवारी सन १८०९ ज्यादा काय लिहिणें मोहोबत असों दावी हे किताबत-

इंग्रजी सही वाकर साहेब यांची-

तुह्मांस बी. ह्मणजे इंग्रजी व मराठी असीं दोन बाजूस दोन मुदत पत्रें लिहिलीं असे-

अजम बाबाजी आपाजी सलाम हु-

मेहरवान दोस्तान येति ज्यादे मोहिखान असुशियत व येतिबाद निषान अज दिल एखलास हानराबल जो नाथन डंकीन इस्क्वॉयर प्रेसिडेंट गव्हरनर जनरल जंजिरे मुंबई. बादेशा कमा फोला वरू मुतस्मी नेस्त नाषहु लादील ये खमस मनोल बाद. हर्ल्ली अपाण अजम् अश्रफ मंद

कर्नल वॉकर साहेब यां समागमें पत्र पाठविलें तें साहेबीं समक्ष पावतें केलें त्यास आपले खावंद अजम अक्रम राव गायकवाड सेना खासखेल समशेर बहादूर हनराबल कंपनीं इंग्रज बहादूर सरकार परम दोस्त यांचे दौलतीचें कामांत आपण आपले व निष्ठेनें सेवा खेरखाईची केली, त्या विशींचे अर्थ सविस्तर या पूर्वी हिसाबीं बहुत लिहून कळविले-त्याजवरून खुषी होऊन हल्लीं लिहितों जे-जो मोठा बंदो बस्त महत्श्रमानीं नमोद्यात आला त्याचे कायमेविशीं सरकारासीं आपलें पूर्ण लक्ष्य असोन उत्तम रीतीनें वहिवाट चालविल्यांत मुलुखास व रयतेस सुख. आणि आपले खावंदांसही चांगलें-आणि यांतच हिंदुस्थानांत इंग्रज सरकारचें लक्ष्य आपले कडे निश्चय रूप राहील, हें निःसंशय जाणावें. ये विशी ज्यादा काय लिहावें. तारिख १९ जानेवारी सन १८०९ चंद्र २ जिल्हेज-सुरूसन तिसा मयातेन व अल्लफ. मोहोबत कीजे हे किताबत-

सही इंग्रजी जोनाथन डंकीन

यादी बाबाजी आपाजी यांसी राज्य संबंधी कामकाज उलगडण्यांत आणावा ह्मणून. बंगाल्याकडून याद सुरूसन अशर मय्या तेनव अल्लफ छ २९ साबान तारिख २० माहे सपूटंबर सन १८०९ चे मितीस करून दिली ती अठरा कलमाची. इंग्रजी व मराठी लिपिंत. एक बाजूस इंग्रजी लिपिनें व दुसरे बाजूस मराठी लिपिनें. १८ कलमें अठरांची लिहिली आहे. संवत् १८६६ मराठी लिपिचीं कलम.

१ राज्य प्रकरणीं कारभार श्रीमंत राजश्री फत्तेसिंगराव बाबा साहेब गायकवाड यांचे हवेलीस दरबारी, कारभारी, मुत्सदी, दरकदार वगैरे सर्वांनीं दाह घटका दिवस चढतां एकत्र होऊन च्यार घटका दिवस शेष राही तों पावेतों कचेरींत करावा-त्या सर्वांही सरकार कामा संबंधी मसलत व कुमक द्यावयास आमचेही येणें होईल. कलम.

२ जमा खर्चीचें धोरण बरोबर करितां ही पागादार, शिलेदार, शिबंदी

मोदिखाना वगैरेचे खर्चांत बाकी राहिले आहे. त्यास पूर्वीच्या यादी अन्वयें अगोदर समान करावें.

३ संवत् १८६६ चे फसली बाबद महालानिहायचे बंदोबस्त व्हाव याचे त्यास ज्या मामलतीवर चढवून सरकार किफायत होईल अशा मामलती द्याव्या. आणि महालानिहायचे आंकडे पाडून वरा ता करून सावकारास द्याव्या. संवत् १८६५ चे साला बाबद शिलेदार, शिबंदीचे ऐवजाची तजवीज करावी. कलम

४ महालानिहाय कारकून पाठवावयाचे त्यांच्या सनदा जाहल्या आहेत, त्या प्रमाणें रवाना होऊन दर महिन्यास जमा खर्चाचे हिशोब हुजूर सरकारांत येत असावेत. कलम

५ शास्त्रार्थ देण्याची एकुणतीस लक्ष रुपयांचीं कलमें सालगुदस्तां तपशीलवार नावनिशी लिहून शाफित केलीं आहेत, तो ऐवज वसूल करून सावकारी देणें बारालक्ष रुपये इजाऱ्या बद्दल कंपनी सरकारचें बहादरीचे आहे त्याचे फडीस द्यावें असे नेमिले आहे, त्याप्रमाणें निकाल होऊन बाहेदारी कापून द्यावी. या जरूरीचे कामास आमचे कडून कुमक आहे. परंतु सदरहु अन्वयें जलदीनें व्हावें. कारण व्याजामुळें गायकवाड सरकारास पेंच विशेष. तो न व्हावा सबब- कलम

६ किल्लेनिहाय. हुजूर शिबंदी व किल्लेदार, कमाविसदारांखेरीज ठेवण्याचें ठरलें आहे त्याप्रमाणें मुकरर होऊन किल्लेदार इमानी ज्यांचे कबिले बडोद्यास असतील असे मागील सालापासून नेमावे. कलम

७ अजम सिताराम रावजी यांज कडील शिबंदीस कोट करून ऐवज दिला तो अमदाबाद व पट्टण तालुक्यांतूनच उत्पन्न होऊन निकाल करावयाचे अजम कर्नेल वाकर साहेब यांही रुबरू कबूल केल्या प्रमाणें घडावें कलम

८ आपणास पेशजी यादी दिली आहे त्यांत लिहिलें आहे कीं, वडो द्यांतील इनसाफाचे कामास्तव अदालतीची नेमणुक जरूर जाली पाहिजे. कारण सर्वत्रांचे हुकूम व लोकांस उपद्रव याजकरितां हें जाहल्यानें बे इनसाफ होणार नाहीं. सबब त्यास एक भला माणूस श्रीमंताकडील व एक खासगीवाले यांजकडील व एक फडणीस यांजकडील व एक मुजूमदार यांजकडील असे च्यार नेमावे. आणि दरपुऱ्यास निर निराळी अदालत असावी. त्या लोकांस राहण्यास अब्रुमाफक स्थळें रयतेचे चांगल्या करितां बांधून द्यावीं. आणि त्यांचा मुख्य अधिकार थोरल्या अदालती कडे असावा. जो फिर्यादीस येईल त्यास तिकडे पाठवावा. त्यांणी चौघांनीं त्याचा निवाडा करून सरकारांत समजवावें. नंतर त्यास जो दंड अगर शिक्षा देणें त्याचा ठराव कचेरींत रुबरू व्हावा; परभोर होऊं नये. चबुत्र्याची बाबत या इनसाफात नाहीं. कलम

९ ठाणें लव्हाणचा बंदोबस्त व्हावा. कलम

१० महिकाठयाचे मुलुखगिरी संबंधी तालुक्यानीहाय येथील चालू जमेचा बंदोबस्त काटेवाड प्रांताचा केल्याप्रमाणें व्हावा. पालणपूर वगैरेचे वकील तर कितीएक दिवस जाहले हुजूर हजरच आहेत. कलम.

११ सीताराम रावजी संबंधी पंचाईत नेमिल्याप्रमाणें होऊन फडशा करावा. हे पंचायतीचे लोक मात्र योग्य पुरुष. हें काम जहालें असतां दुसरे कार्यास उपयोगी पडतील त्या अर्थी कोणी कामें यांजला सांगितलीं असतां हे ठरवितील तें लौकिकांत मान्य व सरकारासही योग्य दिसेल. कलम

१२ कान्होजीराव गायकवाड यांस गवताचे बेगमीबद्दल घीड नेमून द्यावें. कलम

१३ सदाशीवराव देशमुख व जावजी पाटील यांस रहाण्यास घरें द्यावीं

व देशमुखांचे स्त्रीस गांव नेमणूक आहे तो त्याचे हवालीं करावा.
कलम.

१४ 'जोरा मकण्याचे' गिरासाचा ऐवज त्यांस प्राप्त होणें त्याविशीं मशार निल्हेस कंपनी सरकारची बहादारी दिल्ही आहे त्याप्रमाणें त्याचें काम व्हावें.

१५ दुधीगीराशीये तकशीरवान सबब आमचे सरकारचे हस्तगत करावे.
कलम.

१६ बापु मैराळ यांची खानगी पुण्यास व्हावयाची ठरल्या प्रमाणें व्हावी. कलम.

१७ परगणे कडी येथील पाटलानीं पुनः परत यादी मुंबईस केली त्याचे संबंधानें काम करावें. कलम.

१८ एका गृहस्थाकडे दोन कामें नसावीं. कारण सरकार पदरचे गृहस्थ आहेत, त्यांचे सर्वत्रांचे समावेश अब्रू माफक थोडया बहुतांनीं सरकारांत जाहलें पाहिजे, सबब. कलम.

सदरहु कलमें आपल्यास पुर्तेपणीं विदितच आहेत. आणि कर्नल वाकर साहेब हे व आह्मीं बहूत वेळ बोलतही गेलों. परंतु कशामुळें न घडलें याचे पुनः पुनः उच्चाराचें प्रयोजन नाहीं. हल्लीं इच्छा हीकीं, या उपर दीनक्रमणा न व्हावी. कारण कीं येणें करून गायकवाड सरकारचे नफ्यास नुकसान व ज्याचा कर्तव्यतेंत संबंध आहे त्याचे अब्रूस ही नुकसान आहे. इतकेंही असून न घडल्यास अक्टींग रेसिडेंट यांणीं सरकारची आज्ञा आहे ती सिद्ध करण्यास जो विचार दिसेल तो करणें प्राप्तच आहे.

शिक्का.

श्री झाळसाकांत.

यादी बावाजी आपाजी यांजकडे मुलुखगिरी काठेवाड व परगणे पेटलाद दुभागा व परगणें कडी येथील मामलती कामें होतीं त्यांचे हिशोब जमाखर्चाच्या झडत्या व यादी कसरीच्या इ० तागायत सन सब्बा मय्यातेन व संवत १९३३ अखेर पावेतों सरकारांत आल्या त्यास मुलुख गिरी महालानी हायचे कसरीचे यादीस जमा सुरूसन तिसां मय्यातेन व अलफ.

जमा ——————————————— खर्च.

१५१७०९८॥॰ परगणे पेटलाद सरकार भागाफद्दल इ० सन इहिदे मय्यातेन. संवत् १८५७ तागायत सन सब्बा मय्यातेन संवत् १८६३पावेतों.

११८३१२॥८॥॰ परगणे पेटलाद नवीन भागा बद्दल इस्तकबिल तागायत सन सब्बा मय्यातेन अखेर संवत् १८६३ पावेतों रु०

१४८९७२॥८॥॰ परगणे कडी बद्दल यादी देान.

११६६७४८॰ इस्तकबिल सन सल्लास मय्यातेन संवत् १८५९ ता०. सनसित मय्यातेन संवत् १८६३ बद्दल.

३२२९८॥८॥॰ सन सब्बा मय्यातेन संवत् १८६३ बद्दल.

१४८९७२॥८॥॰

९५७१२७ मुलुखगिरी महिकाठा, काठेवाड बद्दल इस्तकबिल सन सब्बा मय्यातेन संवत् १८६३ अखेर पावेतों.

९७००९॥८॥॰ रामदास केशवदास पाटील अमीन दुभागा पेटलाद यांजबद्दल सुकडी वगैरे यांची जमा.

९९९७३८॥॰ रुपये पैकीं खर्चा पसायत व

गांवें मनोतीनें ठेविलीं त्यांचें उत्पन्न भरीस घालितां सुकडी पैकीं खर्च ४२९६३॥॰॥ रुपये बाकी शिल्लक.

१४३३१३१९⁄॥॰

पैकीं खर्च ——————————————— रुपये.

५३९३३४।॰ सरकार भरणा.

७४०४९।⁄॥॰ परगणें कडी संबंधें.

२८०४८॥ सुकडी बद्दल भरणा चौसाला.

५३२४॥॰⁄ स्वारी खर्च बडोद्यांत सन सितांत.

४०६७६९॥॰ सन आर्बेन मयातेन अखेर हिशोबाची मकलासी जाहली त्यांत फाजील निघोन पैकीं सब्बां अखेर पावेतों दरसाल फाजील ऐवजीं वसूल पडला तो झडत्यांस खर्चीं आला. बाकी फाजील येणें राहिले ते रुपये.

७४०४९।⁄॥॰

१८३४८८⁄॰ पेटलाद दुभाग संबंधें. खर्च.

८५९६८।।· सरकारांत भरणा महाराजांकडे सन सब्बा मय्यातेनचे सालीं.

९७५१९।≈ फाजील दुभागाबद्दल.

८५८२३।≈।। सरकार भागाबद्दल.

६७८२३।।८।। नेमणूक सब्बां अखेर.

१७९९९।।≈ खर्चाचे वहिवाटी मुळें.

८५८२३।≈।।·

११६९५।।।८।। नवीन भागा बद्दल.

४७८४९।।। नेमणूकी फाजील सबां अखेर पैकीं

५७०१।।≈ वहीवाटी मुळें कमी होतां नक्की.

६९४६८=।।। गु० सन सबां सन इहिदे व

सन सीते
दुसाला
खर्चा ब-
द्दल.

११६९५।।।=।।।.

९७५१९।=

१८३४८८८=

२८१७९६।।=।. प्रांत काठेवाड मुलूखगिरीचे ऐवजीं.

२५१७९६।।=।. मुलुखगिरी संबंधीं अजमासें देणे सन सम्मान अखेर पावेतों ९५१०८६।-।। रू० पैकीं रद्द कर्ज रतनजी कानदास यांजकडे भरणा मुलुख गिरीचे.

३०००० कसरीचे यादी पैकीं.

२८१७९६।।=।.

५३९३३४।.

७४७००० खर्चाबद्दल हिशोब जमाखर्च अप्रतरणीक समजाविले सबब सरकारांतून योग्यतेनुसारमानून मंजूरा दिले.

६९०००० बाबाजी आपाजी यांसी इ० सन इहिदे तागायत सन सीत मयातेन पावेतों साले (६) सहाचे दरसाल रुपये ११५००० प्रमाणें मुलुखगिरी संबंधें.

५०००० विठ्ठलराव बाबाजी कडी संबंधें इ० सन सल्लास तागायत सब्बां अखेर पांच सालें दरसाल १०००० प्रमाणें.

७००० रामदास पाटील इहिदे तागायत सब्बां अखेर सात सालें–दरसाल १००० प्रमाणें.

७४७०००

१२८६३३४।

वाकी ——————————————— रुपये.

१४६७९६।।≈।।

एकूण इस्तकबिल तागायत सन सब्बां संवत् १८६३ अखेर पावेतों हिशोब व कसरीच्या यादी महाल मुलुखगिरी मिळून जमा चौदा-लक्ष तेहतीस हजार एकशें एकतीस रुपये पावणे चार आणें. पैकीं खर्च, बारा लक्ष शांऐशीं हजार तीनशें चौतिस रुपये चार आणे. बाकी एक लक्ष शेताळीस हजार सातशें शहाण्णव रुपये पावणे सोळा आणे निघाले ते सरकार आज्ञा होईल तिकडे भरणा करावा. जमा खर्च झडत्या व कसरीच्या यादी तुह्मीं दिल्या त्या खेरीज जमेत तफावतीचें कलम निघाल्यास त्याची पुरवणी व खर्चात कोणीएकाचें नावें ऐवज खर्च लिहिला तो रुजू न जाहल्यास त्याचा जाब तुह्मीं पुरवून द्यावा. व मुलुखगिरी संबंधें देणें नक्की होईल त्याचा उलगडा सरकारांतून करून दिला जाईल. सदर्हु झडत्या व यादी कसरी बद्दल जमा खर्च इस्तकबिल तागायत सन सब्बां मय्यातेन संवत १८६३ अखेर पावेतों सर-

कारांत समजून घेऊन सदरहु यादी करार करून दिलीअसे. जाणिजे छ २१ माहे जिलकाद मुक्काम बडोदे. मोर्तब सु०

मेजर वाकर साहेबांची साक्ष.

इंग्रजींत लिहिली आहे.

मोर्तब.

बाबाजी साहेबांस सदरी लिहिले नेमणूकी शिवाय सरकारांतून असाम्या वगैरे करून दिल्या वगैरे उत्पन्न.

१ प्रांत काठेवाडखाते जिलीब दरसाल नेमणूक रूपये १५६० ची करून दिली त्याप्रमाणें इस्तकबिल तागायत संवत् १९१२ अखेर सरकारांतही चालविली ती रोख पंधराशें साठ व सामान ऐन जिनसी कापडी जामदारखान्या कडून दसऱ्या पूर्वी मिळत असे.

१ सरकार हुजुरांत खातें दोन घोड्यांची ऐन जिन्नसी सामान व दोन घोड्यांकडे चंदी, रातब व खासदार यांची रोजी येणे प्रमाणें इस्तकबिल ता० संवत् १९१२ अखेर पावलें असे.

१ किल्ले ढभोई महालीं दर साल रूपये ९० ची असामी व नवसरी महालीं खासगी दरकांकडील असामी व सुरतेस हवेली आहे त्या खर्चाकडे दरसाल रूपये १०० ची नेमणूक करून दिली त्याप्रमाणें इस्तकबील ता० संवत् १९१२ अखेर सरकारांनेंही चालविलें आहे.

१ बडोदें महालीं जोबल टेंकडी हें बीड सुमारें कुंभे अजमासें ६०० सहासें पर्यंतचे खासगत गुरां, ढोरांचा खर्च चालावा म्हणून सरकारांनेंही बक्षीस दिलें होतें तें इस्तकबील ता० संवत् १९२९ चालविलें.

१ बाबाजी साहेबांस खासगत राहण्यास वाडा बांधावयास जागा श्रीमंत कैलासवासी आनंदराव महाराज यांही प्रथम नदीचे पुला नजीक राजपुऱ्यांतून बाहेर निघतांना उजवे बाजूस जागा पाहून नक्की केली. तेथें श्रीमंत सरकार आज्ञा जाहाल्या प्रमाणें वाडा बांधावयाचें काम त्यांही सुरू केलें. आणि आपले खर्चानें वाड्याचे पुढील दरवाज्याचें काम पुरें केलें. नंतर वाड्याचें काम चालविलें, त्या वेळेस श्रीमंत महाराज आज्ञा जाहली. जसा रावपुरा असाच याचे जोडीस तुमचे नांवाचा पुरा वसवून त्यांत वाडा चांगला बांधावा. हल्लीं तुम्हीं काम चालविलेली जागा चांगली आहे; परंतु सरकार वाड्यास लांब आहे. येथें पागा वगैरे कारखान्यार्ची तुमचीं कामें तुम्ही करावीं. ते समयीं सरकार आज्ञे प्रमाणें त्या जागेवर वाड्याचा पुढील दरवाजा तयार जाहलेला तो तसाच कायम ठेवून त्याचे पाठीमागें वाडा बांधावयाचा तें काम रहित करून तेथें पागाबांधली, ती इमारत हल्लीं आमची उभी आहे. पुढें सरकार आज्ञे प्रमाणें हल्लीं आम्ही रहातों ही जागा कायम करून बाबाजीपुरा असें नांव ठेवून श्रीमंत सरकारआज्ञेनें वाडा वगैरे पागेसुद्धां इमारती बांधून वाड्यासभोंवती वस्ती आणून त्यांसही राहाण्यास जागा देववून ज्यांस सवड नसेल त्यांस खर्चास देऊन वस्ती आबाद केली आहे. बाबाजी साहेबांस काठेवाड वगैरे प्रांताकडून नजराणा घोडे आलेले बांधावयास पागा त्यांणी आपले खर्चानें बांधलेली नजर पागा आमची होती, ती त्यांहीं त्या वेळीं श्रीमंस सरकार लग्न कार्या करितां जागा जानेशास दिली तेव्हां पासून ती जागा सरकारास शुभदायक वाटल्यानें सदर पागा श्रीमंत सरकाराकडे दिली, त्याप्रमाणें हा वेळ पर्यंत त्या नजर पागेंत सरकार लग्नकार्यें होत आहेत, तें सर्वांस विदित आहे. त्या पागेचे इमारती खर्चाचे रुपये सरकारांतून आम्हांस मिळाले नाहींत. श्रीक्षेत्र डाकूर मुक्कामीं गोमतीचे माकणिया वोवाऱ्यावर धर्मशाळा त्यांही आपलें खर्चानें

बांधिली आहे तिची वहिवाट देखरेख अद्याप आह्मांकडे चालत आहे. याप्रमाणें इस्तकबिल तागायत संवत् १८६७ पावेतों कामकाजांत वागून संवत् मजकुरीं मि० कार्तिक वद्य १४ रोजीं बाबाजी साहेब कैलासवासी जाहले.

विठ्ठलराव, बाबाजी यांचे औरसपुत्र आमचे वडील यांची कारकीर्द.

हु०

अजम विठ्ठलराव बाबाजी मुक्काम बडोदें सलामत.

मेहरबान दोस्तन यतिजोद मोहिबान दुसिशियत व येतिबादनिशा आजदिल येखमस हानराबल जोनाथन डंकीन इस्कायर प्रेसिडेंट गव्हर्नर मुक्काम जंजिरे मुंबई बादेशोला किमा फोला नसबी रनेस्त मशहुद आदा इमा असर वादकेपरिवीम. तुमचे वडील बाबाजी आपाजी यांचा इतिकाल होऊन स्वर्गवासी हें गमगनीचें वर्तमान ऐकून दिलास बिसियार परशान मदी हाशील जाहली हे सांग वरील दुःख इजवर होऊन इजानें वस जरूर जाहलें कीं तानियत नामा लिहून खुदाय बिहिस्तीचे खेश कबिल्यास दिलबारी द्यावी. विना बाराहे मुसिबत नामा दुःखदुर करावयास लिहिला आहे. अमुक सुस स्वर्गवासी जाहलेसीं त्यांचे आजे खानदानवर दुःख कठीण झालें. आणि एक बलपन्हा सेना खासखेल समशेर बाहादर यांचे दौलतीचे कामाकाजाविशीं फार नुकसान जाहलें. कारण कीं त्यांची खैरखाई व नेकनियत व कोसिसीचे सबबेनें आलीज्या सरकार मजकूर तर्फेचे वकिलांची शिकवणी ऐकून त्यांही आजराब दोस्ती अमानतदारी व खैरखाई व नेक नीतिवर नजर देऊन साहेब महसुफ सेना खासखेल यांचे सरकारचे दिवाण होते त्याचा बचाव केला तरी बाबाजी मरहुमांचें कुटुंब कसें सोडतील? बलके त्याचे दोस्तास सजावरकीं त्यांचे मागें त्यांचे घराण्याची बरदास्त व सांभाळ करावा. मशारनिल्हे कैलासवासी त्यांही

आपले खावंदांचीं मातब्बर कामें चांगले रीतीनें केलीं. आणि सरकार इंग्रज बहादर व सरकार गायकवाड यांत कांहीं दुजाई नाहीं मोहिबास कैलासवासी बाबाजी यांचें मोठे खिजमतीवर बसणार त्यास तुह्मास सजावरकीं ह्या सरकार बुलदयत्कीदारीची दोस्ती आणि आपले खावंदांची कृपा मनांत ठेवून चांगला बंदोबस्त कीं बलगादी असतां जाहला आहे तो बंदोबस्त बाहितर रीतीनें मजबूद मुस्तकीम राखून त्या सरकारचे आबादी व बाह्यबु दिवसेंदिवस जादा होऊन सदैव कायम चालावी. अशा बुलंद सरकाराची तुह्मासी इतकीच इच्छा आहे. या नंतर बाबाजी मरहुम होते ते समयीं तुमची भलाई व नेकनामीं व सुखी रहावें, येविशीं कलमबंदी वसीयत जाल्याप्रमाणें लिहून ठेविली आहे ती कलमबंदी नजरेंत ठेवून आपले वडिलांचे लिहिल्या बमोजिब चालावें. त्यांत तुह्मास खुब चालण्याविशीं शिखावत आहे. आणि आमचीही खवाईस आहे कीं ज्याप्रमाणें तुमचे वडील थोर आहेत त्याच रीतिनें तुह्मी थोर होऊन आपले वडिलाचें नांव लौकिक वाढवावें. ते मरते समयीं तुमचें चांगलें व्हावें या फिकिरींत होते. आणि हा मुद्दा केव्हां हांशीस होईल कीं, जेव्हां तुह्मी वडिलांचे मागें नेक चालण्याची पैरवी ठेवून कामें चालवाल तेव्हां हर्दु सरकारचा इतबार तुह्मांवर राहील. हमेषा अवकांत तुमचे तनदुरुस्तीची खुषवक्की लिहित जावी. व अल्लीशान कप्तान कर्नल साहेब तेही तिकडील हकीकत लिहित जातील. खाना छ० २२ माहे जिलकाद सुरु सन इहिदे अशर मय्यातेन व अलफ—मुतावील तारीख २० माहे दिसेंबर सन १८१० इ० ज्यादा काय लिहिणें प्यार मोहोबत असों दिजे हे कितावत.

सही इंग्रजी जोनाथन डंकीन.

आमचे वडील विठ्ठलराव बाबाजी कडीचे मामलतीवर होते, ते अमदाबादेकडून बडोद्यास बाबाजी साहेब यांचें प्राणोत्क्रमण समयीं येऊन दाखल जाहले, नंतर उत्तर क्रिया वगैरे बाबाजी साहेब यांची जाह-

ल्यावर मशारनिल्हे वडील विठ्ठलराव भाऊ साहेब यांचे नावें सनदपत्रें श्रीमंत सरकारांतून जाहलीं आहेत तीं खालीं लिहिल्याप्रमाणें.

श्री म्हाळसाकांत.

चिरंजीव राजश्री विठ्ठलराव बाबाजी यांसीं आनंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादर आशिर्वाद. सुरु सन इहिदे अशर मय्यातेन व अलफ. तुमचे तीर्थरूपांस कैलासवास जाहला. त्यांचेकडेस खासगी दरकाचे वगैरे काम होतें, तें तुह्मांकडेस सांगितलें असे. तरी दरकाचें वगैरे खैरखाईचें काम इमानें इतबारें करून वंशपरंपरेनें अनुभव घेत जाणें. जाणिजे छ० २ जिलकाद. आशिर्वाद.

मोर्तब.

श्री म्हाळसाकांत.

शिक्का.

यादी चिरंजीव राजश्री विठ्ठलराव बाबाजी खासगीवाले सुरु सन इहिदे अशर मय्यातेन व अलफ. कैलासवासी बाबाजी आपाजी यांजकडे दौलती संबंधें खासगी दरकाचा वगैरे कारभार वहिवाटींत होता, त्यांचे कराराची यादी सन सब्बां मय्यातेनांत छ ७ जिलकादीं सात कलमांची जाहली आहे, त्याप्रमाणें हल्लीं तुह्मांकडे करार करून सांगितले आहेत त्यांची आलाहिदा सनद सादर केली आहे. त्यास पेशजी कैलासवासी यांसीं दरकसंबंधें वगैरे हक्क नेमून देऊन यादी करार करून दिल्या आहेत, त्याप्रमाणें तुह्मांकडे चालविलें जाईल. त्याचा अनुभव तुह्मीं घेत जाणें. याविशीं व तुह्मीं कुटुंब बाबस्तेसुद्धां यांसीं सरकारांतून गैरवाजवी होणार नाहीं. याविशीं

सदरहू यादी अन्वयें निभावणीस वाजवीचे रुईनें अजम कंपनीइंग्रजबहादर दिले आहेत. छ० १२ जिलकाद. रसवानगी कृष्णराव भगवंत.

मोर्तब.

अजम कप्तान जेम्सरीविट कर्नल साहेब आंगरसी दिट्ट ? निसबत् आनरावल कंपनी इंग्रज बहादर.

साहेबाची सही इंग्रजींत.

बाबाजी साहेब यांसीं आमचे वडील विठ्ठलराव भाऊसाहेब यांस कामकाजासंबंधी माहिती असून वर्तावयाची कलमबंदी व माहीत व्हावयाचीं कलमें कंपनी सरकारचे सल्लयाप्रमाणें यादी २ त्या खालीं लिहिल्याप्रमाणें.

प्रतयाद. १.

श्री.

यादी चिरंजीव राजश्री विठ्ठलराव भाऊंस माहिती असून वर्तावयाची कलमबंदी सुरुसन इहिदे अशर मय्यातेन व अलफ.

१ सरकार सेनाखासखेल समशेर बहादर यांची सेवा जीवादारभ्य होत आली तसें सरकारांनीं चाकरीचे इराद्यानें चालविलें नाहीं. साम्यतेनें चालविलें, त्या पक्षीं पुढें चालवितील, येविशीं श्रीमंत फत्तेसिंगराव बाबासाहेब यांणीं जीं वचनें शपथ पूर्वक अजम कर्नल साहेब व वेदशास्त्री राजश्री गंगाधर शास्त्री यांचे साक्षीनें दिलीं आहेत. आपलेकडून सांप्रदायास न्यून पाडूं नये येविशीं.

१ अजम कंपनी सरकार यांची कृपा संपादन होऊन मुस्तकिम अभय त्यांचे घेतले आहे ते सर्वोपरी बहाल राहून हरवक्त रक्षण करून मोठे महत्वानें चालविलें तसे पुढें चालविण्याची खातरजमा अजम आर्बिटग रेसिडेन्ट कर्नल साहेब यांनीं वेदशास्त्र संपन्न राजश्री

गंगाधर शास्त्री पटवर्धन यांचे विद्यमानें कंपनी सरकारचे तर्फेचें वचन देऊन केली. त्यापेक्षां ते ज्ञात आहेत व वचनाचे साचे आहेत. निभावणी करतील त्यास त्यांसीं अकृत्रिमपणें व्यवहार ठेवून सरकारी यथायोग्य कामें कंपनीचे सल्ल्यानें व मदतीनें एकी राखून उलगडीत जावीं. व बुद्धिवाद अजम कंपनीचे तर्फेनें सांगतील तो ध्यानांत धरून वर्तत जावें.

१ सरकारी कामें आपलेकडे बहुत आहेत. तेथील व्यवहार नीट सरकारचा नक्ष नफा पाहून करून अकृत्रिमपणें वेदशास्त्र शास्त्री-बुवांस समजावून त्यांचे विचारें कंपनीचे सल्ल्यानें रीतीनें चालावें.

१ कोणाचे मनांत आह्मीं येऊन उपमर्द केला, त्यावरून ते सर्वोपरी नाशास प्रवर्तक बुद्धिनें यत्नास चुकले नाहींत, तसें पुढें ही चुकणार नाहींत. परंतु कंपनी सरकार यांनीं आंगी जनता केली. त्यांचे दरबारीं इमान आहे, त्यापक्षीं, ते पुढें व्यंग पडों देणार नाहींत. याविशीं अजम कर्नल साहेब व वे० राजश्री शास्त्रीबाबा निसबत कंपनी बहादर यांचें अभय पक्कें आहे, त्यास सरकार चाकरी व कंपनीचें लक्ष्य एक राखावें. ह्मणजे कोणाचा यत्न चालावयाचा नाहीं. तसा संबंधही आह्मीं कोणतेविशीं राखला नाहीं, व आशा ठेविली नाहीं. चाकरी करून शेर मिळवून ठेकीनें निर्वाह चालविला. यांत कोणाचाही बोलण्याचा वाद नाहीं. याविशीं पक्कें अजम कंपनीचे ध्यानांत आहे. तसें सर्वांस आपण मुकून कंपनीचा आश्रय केला, त्यापक्षीं त्यांजला माहित आहे. याविशीं त्यांची मदत पक्केपणें आहे. तेच ते करतील त्यांत त्यांचें भूषण आहे. जाणिजे कनाम ? आहे.

१ सरकार सेनाखासखेल यांनीं कृपा करून खासगी दरकाचें काम वंशपरंपरेनें योजून दायतें व इनाम गांव नेमून देऊन खासगी कडोल हरएक कामाची याद व्हावी. त्याजवर सरकार चिन्हें

होऊन काम चालावें, असें ठरून कागद पत्र कंपनीचे इतल्यानें उलगडून करून दिले; आणि झाडून दौलतीचा कारभार आपले हातानें घेतात. आपले इतल्याखेरीज कांहीं होत नाहीं, हें कंपनीचे संतोषानें मदत होऊन चालत आहे, त्या प्रमाणें लक्ष्य धरून कामकाज दरकांचें व कारभाराचें चालवावें. यासीं सरकार कंपनी बहादर अनुकूल आहेत त्या पक्षीं निर्वेधपणें चालवावें.

१ कितीएक लोकांचे आचारा प्रमाणें त्यांस फळें कंपनीचा सल्ला घेऊन दिलीं. याजमुळें सुष्टत्व व दुष्टत्व आहे. त्याची काळजी आपणास नाहीं. त्या विषयींचा कंपनीस अभिमान आहे. ते या विषयीं तुह्मांस संकट पडूं देणार नाहींत. निर्वाह करतील खातर जमा आहे.

१ दरकदार फडणीस यांचे लक्ष्य दुसरें नाहीं. व मुजूमदार कैलासवासी रावबाबा व माधवराव तात्यांचा ऋणानुबंध अकृत्रिम होता, तसाच तात्यांनी मजशीं ठेविला. व हल्लीं त्यांचे चिरंजीव लेंकरूं परंतु लक्ष्य त्यांचें वडिलांसारखें त्या पक्षीं त्यांजशीं कोणेविशीं अंतर न व्हावें. मी त्यांचा बोज राखितों, त्याप्रमाणें राखावा. वरकड दरकदारगिरी व त्याचें महत्व चालत आहे, त्याप्रमाणें चालवावें.

१ सरकारासीं ज्यांच्या नजरा पहिल्या बदलल्या होत्या त्यांची फळें ते पावलें. व पुढें जो या आचारास प्रवर्तक झाला त्यास कंपनीचे मदतीनें फळ देऊन सरकारचे शपथेंत व्यंग न पडावें, हें आपलें करणें त्यांत व्यंग घडों नये.

१ मुलुखगिरी व महालानिहायचे सरकारी व्यवहार जमाखर्च पाहून सरकारांनीं माझें चाकरीवर नजर देऊन संतोषानें कंपनीचे साक्षीनें सन सब्बा मय्यातेन संवत् १८६३ अखेर फडशाचे यादीवर मखलासी करून बाकी शिल्लक सरकारची यादीस निघाली

ती अनामत सरकारच्ची द्यावयाची. तसें काठेवाड संबंधें पारख वगैरेचें देणें सब्बां अखेर आहे. कंपनीचे साक्षीनें सरकारांतून उलगडावें असें ठरवून कंपनी सरकारानीं मान्य केलें, त्याप्रमाणें ते हिशोब समजावून देणें. कंपनी मदत करून फैसला करून देवितील. पुढें सम्मान पासून आलिकडे सरकार आज्ञेनें व कंपनीचे सल्ल्यानें होत आहे, त्यापक्षीं ते निभावणी करीत आहेत व करतील.

१०

सदरहु दहा कलमें सर्व.

(टिप. हें कलम बखरींत गळलें आहे.)

श्री.

यादी चिरंजीव राजश्री विठ्ठलराव भाऊनीं माहिती व्हावयाची कलमें. सुरूसन इहिदे अशर मय्यातेन व अल्लफ.

१ वेदशास्त्रसंपन्न राजश्री गंगाधर शास्त्री पटवर्धन यांचें आमचें वचन भाष्यप्रमाण पूर्वीचें जाहलें कीं एकमेकांस अंतर वंशपरंपरा देऊं नये. तसेंच अलीकडे परस्परें अकृत्रिम चालेल. पुढें त्यांजला माझेठायीं गुरूमूर्तिरूप मोजून हरएक घरगुती व दौलत संबंधीं सल्ला विचार पुसत जावे. ते कुलीन आहेत. बुद्धिमान व इमानी आहेत. ते तुह्मांस बुद्धिवाद कल्याणप्रदच सांगतील; आणि मदत ही अंतःकरणपूर्वक लोभयुक्त करतील. त्यांचे ठायीं पूर्णविचारें विश्वास धरून कामकाज करीत जावें. यासीं अंतर तिळतुल्य येऊं नये. यांत हर्दु सरकारचा संतोष राहून तुमचें तेज वृद्धि पावेल. लौकिक कीर्तिप्रद होईल. गोष्ट निश्चयें मनांत धरावी.

१ कितीएक बारीक मोठ्या माझ्या मनःपूर्वक चाली आहेत त्या चालविण्याविशीं अजम कर्नल साहेब व वेदशास्त्री बावांनीं जिम्मा

घेऊन वचन दिलें त्या प्रमाणें ते निभावतील. तुह्मीं शास्त्री बावांसीं माहीत व्हावें. ते सांगतील त्या चालीप्रमाणें चालवें.

१ मजजवळ मंडळी कुलीन निष्ठावान् पाहून विठ्ठल देवाजी व कृष्णराव भगवंत व बापु मैराळ व बापशाजी दामोदर बाळगून सर्वांस स्वरूपास चढविलें तसें त्यांनीं अकृत्रिमपणें मजशीं वर्तून सेवा केली, व पुढें त्या प्रमाणें करतील. व जें काम सोपेल ते जीवादारभ्य करतील, ही माझी खातर जमा आहे, ते पक्षीं यांचा बोज मी चालविला त्याप्रमाणें चालवून सर्वांचें संगोपन मज सारखें करून कोणास माझा आठव होऊन श्रम पावतील तें करूं नये. माणसें वारंवार मिळत नाहींत. कागदापत्रांचा दाखला, माहितगारी बापशास आहे; व दरबार संबंधीं व घरगुती सारीं धोरणें बापु मैराळ यांस माहित आहेत. त्यापक्षीं त्यांजला पुसोन माहीत होऊन त्यांचे सल्ल्यानें करीत जावें. यांत तुमचें कल्याण अधिक आहे. हें सर्व एक विचारें चालवून तुमचे ठायीं माझें लक्ष धरून वर्ततील ही खातरजमा आहे, व त्यांचें कल्याणही यांतच आहे. तेपक्षीं ते अंतर करणार नाहींत व तुह्मांकडून होऊं नये.

१ घरांतील मर्यादा माझें स्वरूप मोजून तुह्मी व मुलीनें व मंडळीनें रक्षून आज्ञेत वर्तत जावें. महायात्रेस जाऊं लागल्यास पंन्नास हजार रुपये देऊन यावत्जीव तो पावेतों दान धर्म वगैरे लागेल ते होऊन संतोष राखावा. तिजविशीं अंतर जो करील त्याचें फळ चांगलें घडावयाचें नाहीं.

१ पदरची किरकोळ कारकून मंडळी व मराठे व आश्रित व शागिर्द पेशावल व जमादार वगैरे आहेत त्या सर्वांस आधार आपला. त्यांचें सर्वांचें मी चालविलें त्याप्रमाणें तुह्मी चालवावें. कदाचित् कोणी चुकला तर एक वेळ क्षमा करून मनांत रोष ठेऊं नये.

असें करितां ज्याची निष्ठा बिघडेल त्यास ईश्वर पाहून घेईल. त्याचा संग धरूं नये.

१ मी ऋणानुबंध योग रतलों त्याची मर्यादा राखून चालावें. आणि त्यांचें अन्नआच्छादन वगैरे खर्च योग्यता हल्ली ज्याप्रमाणें चालत आहे त्याप्रमाणें चालवावें; अंतर होऊं नये. कोणी आपले आचारास आंतरित होणार नाहींत. तत्राप कोणाचे प्रारब्ध ओढवून मतिभ्रष्ट जाहली त्यास कल्याण सर्वथैव होणार नाहीं. कोणी याचा उद्देश धरल्यास घरांतील समागमें वाटे लावावे. व त्यांत भ्रष्ट जाहलियास त्यांजला वाटे लावावे. ठेऊं नये, आणि दुर्दशा करूं नये. दागिनें तसलमातीस दिले आहेत.

१ घरांत दागीना वस्त्रपात्र लवाजमा दौलतदारीचा संपादन जाहला तो संपादून तुह्मास अनुभवार्थ आहे. कर्ज कोणाचें केलें नाहीं. एक रतनजी कानदास यांची खातेबाकी चालू खर्चाची असेल ती अखेर सालीं जमा होऊन फिटेल तें धोरण राखून उलगडावें. तुह्मांस सेकव नाहीं. पुढें या धोरणानें चालान टेकीनें माझे चालीनें चालावें. माझे आशीर्वादें तुमची प्रतापवृद्धि होऊन कल्याण घडेल.

१ माझे हातचे जे बाळगलेले आहेत तेच तुह्मांस जे कसकसांतून सेवा करतील तेच ध्यानांत धरावी. नवीन लक्षक माणसांचे बुद्धीस लागून कल्याण घडणे दुरापस्त; याजकरितां हलक्या माणसांचे बुद्धीस लागूं नये.

१ राजश्री बापु मैराळ यांचे विचारें सर्वांनीं चालावें. ते अकृत्रिम सल्ला सांगतील; तेणेंकरून सर्वांचें कल्याण असे.

९

सदरहु नऊ कलमें. सही.

श्री म्हाळसाकांत.

चिरंजीव राजश्री विठ्ठलराव बाबाजी यांसिप्रती. आनंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर—आशीरवाद सुरूसन इहिदे मय्यातेन व अल्फ. तुमचे नावें पागा सरकार हुजुरातच्या शिरस्ते प्रमाणें करार करून दिले असे. याचा करार दाहा आलाहिदा करून दिला आहे, त्या प्रमाणें पागेचा अनुभव घेऊन सरकार चाकरी एक निष्ठेनें करणें. जाणिजे छ-७ माहे सव्वाल हे आशिर्वाद.

मोर्तब.

श्री.

यादी शिबंदी सरकार बंदोबस्त स्वार निसबत चिरंजीव राजश्री विठ्ठलराव बाबाजी वगैरे बाजेलोकसुद्धां असामी १०७ यांसीं तैनात दरमहा रुपये २५०० अडीच हजार बिनबट्टा बिनकसूर साफी करार केले त्या पैकीं रोजी व हसा वगैरे शिबंदीचे शिरस्ते प्रमाणें पावतील. दरम्यान तंटा करूं नये. सरकार चाकरी इमानें इतबारें देश परदेश करावी. उजूर करूं नये. हजेरी सरकार मागेल त्या वेळेस द्यावी. हजेरींत स्वार कमी झाल्यास त्यांची तैनात पावणार नाहीं. चाकरीची तारीख हजेरीची चालू येणे प्रमाणें निभावणीचा करार सुरूसन इसन्नेअशर मय्यातेन बाबद सुरूसन सल्लास अशर मय्यातेन व अल्फ. छ ५ माहे जिलकाद.

५०० मशारनिल्हे असामी १.
२०० जात असामी २ दर १००प्रमाणें.
१७४६ स्वार असामी ९७ दर १८ प्रमाणें.
३० कारकून असामी १.

२४ शागीर्द पेशा असामी ६ दर ४ प्रमाणें.

२५०० रु० असामी.

१०० ७

करार प्रा।० करार.

सदरहुप्रमाणें आमचे वडील विठ्ठलराव भाऊ साहेब यांणी ती० कैलासवाशी बाबाजी साहेब यांची उत्तरक्रिया यथासांग करून मौजे कराळी आमच्या इनामगांवीं सदर क्रियेकडे दान देण्यास जमीन वगैरे खरेदी घेऊन दान दिली. त्या पैकीं जमीन कुंभे ११ शिलकेस राहिलेली आह्मांकडील देवस्थान खर्चाकडे चालत आहे. श्रीमंत सरकारांतून वडील विठ्ठलराव भाऊ साहेब व वे० राजश्री गंगाधर शास्त्री नि० कंपनी सरकार या उभयतां मिळोन श्रीमंत फत्तेसिंगराव गायकवाड मुतालिक यांजकडे दौलतीचें कामकाज करीत होते. पुढें संवत् १८६८ चे सालीं ती० गंगारूप काशीबाई बया आमची मातुश्री तीर्थस्वरूप बाबाजी साहेब यांचें कुटुंब श्री महा यात्रेस श्रीमंत सरकारांतून स्वार, शिबंदी लवाजम्यासह कुशळगड व शिंदे सरकार आदिकरून राजे रजवाडे रस्तोरस्तीं ज्यांचा अम्मल त्यांचे व श्रीमंत सरकारचे परवानें घेऊन यात्रा करून परत आल्या ते समयीं श्रीक्षेत्र काशी येथें **दधिविनायक** या नावाची हवेली खरेदी घेतली आहे. नंतर श्रीमंत फत्तेसिंगराव गायकवाड व गंगाधरशास्त्री नगरचे स्वारींत काठेवाडांत गेले. तिकडील स्वारी होऊन आल्यानंतर गंगाधरशास्त्री यांहीं गायकवाड सरकारांतून मुतालकीचीं वस्त्रें घेऊन पुण्याचे वकिलातीस गेले. त्यांहीं आपले तर्फे बाबामराठे व यशवंतरावदादा गोडबोले यांस येथें काम काजांत ठेविलें. ते व विठ्ठलराव बाबाजी एक विचारें सरकार दौलतीचें कामकाज करीत होते. नंतर यशवंतराव दादा यांस सरकारांतून कामांतून काढलें. पुढें गंगाधरशास्त्री यांस कैलासवास जाहला. नंतर सरकार दौलतीचें काम अजम कर्नल साहेब रेसिडेन्ट यांचे इतल्यानें विठ्ठलराव बाबाजी करीत होते. ते समयीं कंपनी सरकारचे तर्फेनी

कामदार दुसरा असवा असें झाल्यामुळें अजम कर्नल साहेब यांनीं आपले खात्रीचे धाकजी दादाजी आणविले. त्यांही आपले हाताखालीं उमियाशंकर यांस घेऊन विठ्ठलराव बाबाजी यांचे अनुमतें दौलतीचें काम श्रीमंत फत्तेसिंगराव बाबासाहेब यांचे हवेलींत होतें. पुढें फत्तेसिंगराव बाबासाहेब कैलासवाशी जाहल्यानंतर श्रीमंत आनंदराव महाराज यांही श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांस मुतालिकेचीं वस्त्रें दिलीं. तेसमयीं विठ्ठलराव बाबाजी व धाकजीदादाजी हे उभयतां सयाजीराव महाराज यांचे वाड्यांत जाऊन दौलतीचा कारभार करीत होते. नंतर श्रीमंत आनंदराव महाराज कैलासवाशी जाहले. नंतर दौलतीची गादी श्रीमंत सयाजीराव महाराज यांजकडे जाहली, ते समयीं कारभारी मशारनिल्हे उभयतांचे दौलतीचें कामकाज करीत होते. नंतर आलफिस्टन साहेब बडोद्यास येऊन दौलतीचा बंदोबस्त करून विठ्ठलराव बाबाजी यांचे हातून दौलतीचें कामकाज घेत जावें; आणि श्रीमंत सयाजीराव महाराज मुखत्यार याप्रमाणें झाल्यानंतर कंपनीसरकारचे कामदार कामांतून निघाले. पुढें श्रीमंत सयाजीराव महाराज कांहीं कामकाज चालविण्याकरितां आमचे मुतालीक रा० विठ्ठलराव देवाजी यांस काठेवाडांतून आणविलें. तेव्हां ते व विठ्ठलराव बाबाजी असे उभयतां कामकाज पाहूं लागल्यानंतर उमियाशंकर यांजकडे तफावत निघाली ती सरकाराहीं घेऊन त्यांस कामांतून दूर केलें. त्यानंतर विठ्ठलराव बाबाजी व विठ्ठलराव देवाजी असे उभयतां सरकार दौलतीचें काम करीत असतां आमचे वडील विठ्ठलराव बाबाजी यांनी श्री निळकंठेश्वरीं खासगत वाड्याशेजारीं श्रीगणपतीचें देवालय चिरेबंदी बांधून देवळापुर्ती धर्मशाळा बांधली. आणि त्या श्रीगणपती देवाची पूजा, नैवेद्य, उत्साह निरंतर चालावा ह्मणून श्रीमंत सरकारांत विनंती केल्यावरून पेटलाद महालीं रुपये १००० एक हजार सुरुसन अशरी मय्यातेन व अल्लफचे सालापासून करार करून देऊन श्रीचे नावें सनद ही छ २७ माहे जिल्हेजची करून दिलेली आह्मांजवळ आहे, त्याप्रपाणें नेमणूक चालत आहे.

आणि सुरत मुक्कामीं गोपीपुऱ्यांत रामजव्हारी याजपासून हवेली खरेदी घेतली आहे. ती वकील कृपाराम दाजी सुरतकर हा दबून घेऊन बसला आहे. तसे मौजे कराळी परगणें बडोदें हा गांव आमचा इनामी त्या गांवीं संवत १८७८ चे सालीं जागा खरेदी घेऊन खासगत खर्चानें हवेली बांधली आहे. परगणें बडोदें खाडीचें शिवेंत जमीन चार कुंभे व परगणे सावली महालीं मौजे जावळें या गांवीं जमीन तेरा कुंभे खरेदी घेतली आहे. आमचे वडील विठ्ठलराव बाबाजी यांस सरकार महालच्या मामलतीचींवगैरे कामें केल्याबद्दल त्यांचे हिशोब सरकारांत समजावून मखलासी करून घेतली ती सालीं लिहिले प्रमाणें.

श्री ह्माळसा कांत.

शिक्का.

यादी चिरंजीव राजश्री विठ्ठलराव बाबाजी खासगीवाले सुरूसन अशरी मय्यातेन व अल्लफ. मशारनिल्हे सरकारचा ऐवज येणें त्यांचे फडशा बद्दल रु०
२५८८९३।।।·।। ऐन.

१४६७९६।।।≈।।। सरकारची शिल्लक मशारनिल्हेचे तीर्थरूप कैलासवासी बाबाजी आपाजी काठेवाड मुलुखगिरी करून आल्यावर सन सब्बा मय्यातेन संवत् १८६३ चे सालीं सरकारांत कसर समजाविली त्यापैकीं खर्च भरणा जाऊन बाकी ऐवज शिल्लक येणें त्याबद्दल. बर हुकूम याद मि० संवत् १८६३ मि. ज्येष्ठ शु० १.

११२०५६।।।·।।।· परगणे॰कडी येथील कसरी बद्दल मशारनिल्हे यांनीं समजाविले त्या बद्दल यादी.

८०८०४।।।≈।।। संवत् १८६३ ज्येष्ट शु॰ १.

३१२५१।।।= संवत् १८६८ ज्येष्ट शु॰ २.

११२०५६।।।·।।।·

२५८८५३।।।·।।·

१४४०६९।≈।।। व्याजाबद्दल इस्तकबील तागायत संवत् १८७५ साल मजकूर ज्येष्ट शु॰ १५ पावेतों एकंदर दर शेंकडा ·।।· प्रमाणें.

९२९४२।≈।। सन आर्बा अशर संवत् १८७० मार्गशीर्ष शु॰ १. गंगाधर कृष्ण पुण्यास जातांना हिशोब केला तो पावतां एकंदर जमेचे वसुलाचे वजा करितां बाकी नक्की व्याजाबद्दल.

५११२६।।।≈। हल्लीं इ॰ संवत् १८७० मार्गशीर्ष शु॰ २ तागायत संवत १८७५ साल मजकूर ज्येष्ट शु॰ १५ पावेतों एकंदर बाकी जमे धरून सालाचेसालास ज्या यादी आलाहिदा एकंदर आले त्याबद्दल.

१४४०६९।≈।।।·

४०२९२३८≈।·

पैकीं मशारनिल्हे यांजकडील वसूल पावला त्याबद्दल.

१२२५ सरकारांतून शिलर्केंचे ऐवजीं चिट्टी छ १९ माहे जमादिलावल सन इहिदे अशर संवत् १८६७ पेटलाद महालपैकीं दहिवल वगैरे गांवचे बाबतीबद्दल महालचा ऐवज येणें त्या ऐवजीं.

८४४६५॥॥⁄ मशारनिल्हे यांजकडे सरकारच्या पांग निसबतीस त्यांस चंदी वगैरे ऐवज देणें निघाला त्याबद्दल.

२७३०॥।।· हुजुरांत पागा पेटलाद व कडीबद्दल.

५७४३५८⁄॥।· नजर पागां बद्दल.

८४४६५॥॥⁄

६२०६७ मशारनिल्हे यांची खासपागा शंभर स्वार सरकार चाकरीस आहेत त्यांजबद्दल संवत् १८६८ चे सालीं गैरहजीरी बद्दलची कै. फत्तेसिंगराव गायकवाड कांठेवाडांत जातांना अमदाबाद मुक्कामीं ऐवज घेतला रुपये ८२०६७ पैकीं चौकशी करितां गंगाधर कृष्ण पुण्यास जातांना ठराव जाहला कीं सरकार नजराणा रुपये २०००० वीसहजार घेऊन बाकी माघारे द्यावयाचे ठरले त्याबद्दल मजुरा रुपये ६२०६७.

३४१८५॥॥⁄।· महालानिहाय. मशारनिल्हे यांची बाकी व फाजील द्यावयाचे त्याबद्दल.

९५१४॥।⁄॥।· परगणे कडी येथील बाकी बद्दल.

२४६५०॥।⁄॥· परगणे पट्टण येथील फाजीला बद्दल.

३४१६५॥॥⁄।·

३५९०३ परगणें वडनगरबद्दल ऐवज सरकारांत घेतला त्याचा करार वाजवी हिशोब पाहून माघारे देऊं. त्याप्रमाणें महालाचा हिशोब रामचंद्र कृष्ण व मोरो काशी अभ्यंकर यांनीं चौकशी करून माघारे द्यावयाचे ठरले त्याप्रमाणें बाद याद आलाहिदा.

२१७८५६॥।·।·

बाकी ऐवज सरकारचा येणे संवत् १८७५ ज्येष्ट शु० १५ पावेतों रुपये १८५०६५।= एकूण सरकारचा ऐवज तुह्माकडे येणें तो व्याजसुद्धां चार लक्ष दोन हजार नऊशें तेवीस रुपये सव्वातीन आणे. पैकीं वसूल दोन लक्ष सत्राहजार आठशें पावणे सत्तावन्न रुपये पाव आणा. बाकी एक लक्ष पंच्याऐशीं हजार पांसष्ट रुपये सात आणे साल मजकूर संवत् १८७५ ज्येष्ट शु० १५ पावेतों बाकी येणें राहिला तो ऐवज सदरहु हरिभक्त पारख यांजकडे रद्दकर्ज देवविले आहेत. भरणा करून कबज घेणे. सरकारांत जमा आहेत. येणें प्रमाणें हिशोबाचा फडशा जाहाला आहे. चूकभूल परस्परे द्यावी, घ्यावी. जाणिजे १३ माहे सावान. मुक्काम बडोदें.

मोर्तब.

येणेंप्रमाणें विठ्ठलराव बाबाजी व विठ्ठलराव देवाजी या उभयतांनीं संवत् १८८३ पावेतों काम काज केलें. पुढें आमचे वडील विठ्ठलराव बाबाजी यांची प्रकृत दिवसेंदिवस बेआरामी होऊंलागली. आणि विठ्ठलराव देवाजी सात महालचे बंदोबस्तांत तिकेंड जाण्याचे सबब आमचे वडील विठ्ठलराव बाबाजी यांचे प्रकृतीचे बेआरामीमुळें कारभाराचें काम पाहण्या करितां रा० भाऊ पुराणिक व आमचे तर्फे रा० कृष्णराव भगवंत असे उभयतां नेमले. पुढें संवत् १८६४ अव्वल मृगसालीं मि० आषाढ व० ११ रोजीं श्रीमंत सरकार आज्ञेनें आह्मास दत्तक घेऊन नंतर दुसरे दिवशीं संवत् मजकुरीं मि० व० १२ रोजीं विठ्ठलराव भाऊ साहेब कैलासवासी जाहले. रोज गु० रोजीं आह्मास दत्तक घेतेसमई आमचें नांव भास्कर ठेवून दरबार जाहला.

श्री म्हाळसा कांत.

चिरंजीव राजश्री भास्करराव विठ्ठल खासगीवाले यांसीं सयाजीराव गायकवाड सेना खासखेल समशेर बहादर आशीर्वाद. सुरूसन तिस्सां अशर मय्यातेन व अल्लफ. तुमचे तीर्थरूप विठ्ठलराव बाबाजी खासगीवाले यांचें शरीरीं बेअरामी होऊन देहावसानाचा समय जाहला तें सर्व मशारनिल्हे यांनीं सरकार आज्ञेवरून विधिपुरस्सर तुह्मांस दत्तपुत्र घेतले नंतर मशारनिल्हेस कैलासवास जाहला, सबब ही सनद तुह्मांस सादर केली असे तरी पेशजी कैलासवासी बाबाजी आपाजी खासगीवाले तुमचे आजे यांजकडे दौलतसंबंधें खासगी दरकाचावगैरे कारभार वहिवाटींत होता, त्याचे कराराची यादी सन सब्बां मय्यातेनचे सालीं छं ७ जिलकादचे तारखेचे सात कलमांची जाहली आहे. त्या प्रमाणें तुमचे तीर्थरूप कैलासवासी विठ्ठलराव बाबाजी खासगीवाले यांजकडे खासगी दरकांचे वगैरे कामाची वहिवाट सांगून सनद व कराराची यादी सन इहिदे अशर मय्यातेनचे सालीं अजम कंपनी सरकारचे बाहदारीची करून दिली आहे, त्या प्रमाणें तुह्मांस दौलतीचें खासगी दरकांचें वगैरे काम सांगितलें असे. तरी तुह्मीं एक निष्ठेनें दरकाचा वगैरे कारभार करून दरक संबंधें वगैरे हक्क नेमून देऊन पेशजी यादी कराच्या करून दिल्या आहेत, त्या प्रमाणें तुह्मांकडे चालविलें जाईल. त्याचा अनुभव तुह्मीं वंशपरंपरेनें घेऊन सरकार चाकरी इमानें इतबारें करीत जाणें. येविशीं व तुह्मांस कुटुंब बाबस्ते सुद्धां सरकारांतून गैरवाजवी होणार नाहीं. सदरहू अन्वयें निभावणीस वाजवीचे रुईनें अजम कंपनी सरकार बहादर दिले असत. जाणीजे छ ६ माहे सफर हे आशीवाद.

मोर्तब.

सही इंग्रजी साहेबाची.



याप्रमाणें बंदोबस्त करून देऊन आमचें वय लहान सबब रा० भाऊ पुराणिक व आमचेतर्फे रा० कृष्णराव भगवंत कचेरीचें सरकार दौलतीचें काम कारभार वडील विठ्ठलराव भाऊ साहेबांचे बेआरामी पासून पाहत होते. त्या उभयतांसच कामकाज पाहण्यांस सांगितलें आणि रा० विठ्ठलराव देवाजी हे सात महालचे बंदोबस्ता करितां डभईस जाऊन तिकडून कडीस गेले. मागें संवत् १८८६ चे सालीं इंग्रज सरकारांत वकिली करण्या करितां वेणिराम अदीतराम कामकाजांत आले त्यांनी आपल्या तर्फे राजश्री गोपाळपंत दादा यांस काम काज समजाविण्या करितां बडोद्यास ठेवून आपण मुंबईस जाऊन तिकडून कलकत्त्यास गेले. त्या वेळीं आमचे वडलांचे नावें आमचे आजे यांही संवत् १८९७चे सालीं पाडू विजापूरवाली पागा हुजूरातीची सनद सालीना नेमणूक रुपये ६०००० साठ हजारांची करून दिलेली पागा संवत् १८८९ ज्येष्ठ मासीं सरकारांही हजरी घेण्या करितां सरकार वाड्या पुढें बोलाविली. तिची हजिरी घेऊन परत रजा देतेवेळीं गोपाळपंत यांणी कमी जास्ती मजकूर कपटानें श्रीमंत सरकारास कळ विल्यावरून सरकारानें ही सदर पागा सरकारांत ठेविली. त्या पागेचीं घोडीं व चंदीचें सामान व च्यार जामे वगैरे आमचे खासगी पैकीं आहेत तें आमचें आह्मांस मिळालें नाहीं. कबजी माल संवत्१८८८ चे सालीं सुटेल त्याचा हिशोब पाहण्यास गोपाळपंतदादा यांस जप्तीचे कामावर नेमलें. कृष्णराव भगवंत व गोपाळपंत यांचें एक चित्त नसल्यामुळें कृष्णराव भगवंत यांस कामांतून काढले. पुढें वेणिराम आदीतराम हे कलकत्त्याहून बडोद्यास आल्यावर गोपाळपंत यांस कामांतून काढले. आणि वेणिराम आदीतराम यांनीं आपले नावें

वेणीराम आदितराम वकीलहिमतरावबहादर असा मरातब घेऊन कारभार करूं लागले, त्या वेळीं तहदाखल याद सरकारांतून जाहली ती खालीं लिहिल्या प्रमाणेः—

यादी अजम कंपनी सरकार इंग्रज बहादूर यांसीं एक तर्फे जे. जावक. वडिलोपार्जित करार मदार कौलनामे जाहलेले व सयाजी राव गायकवाड सेना खासखेल समसेर बहादूर करार करितात. आमच्या राज्यांत जोशी धर्माधिकारी व भट व पाटील व जमीदार व हक्कदार यांसीं गायकवाड सरकारांतून इनाम जाहगीर वतनदार आहेत, त्यांज पाशीं गायकवाड सरकारच्या पुरुषांनीं अधिकारी राजे यांनीं आलाहिदा सनदा पत्रें दिलीं आहेत. त्या प्रमाणें कोणी हरएक प्रकारें तंटा बखेडा होऊन कंपनी सरकाराकडे फिर्याद आला अस तां मनास आणून गायकवाड सरकाराशीं समजावून देऊन गायकवाड सरकारचे गादीविसीं जे कोणी अधिकारी होतील त्यांजकडून बंदोबस्त करून द्यावा.

हल्लीं राज्यांत गायकवाड सरकारचे दौलतींत दोघी राण्या व पुत्र पांच आहेत. त्यांस आमचे मागें जो कोणी गादीचा हुकूम व बंदोबस्त चालवील त्याचे आज्ञेंत सर्वत्रांनीं चालावें. त्याचे हुकूमांत गादीची चाकरी करावी. दौलतींत व राज्यावर दावा नाहीं.

१ दिवाण रावजी आपाजी.
१ बाबाजी आपाजी दिवाण.
१ माधवराव गोपाळ मुजुमदार.
१ नबाब हुसेनखां बहादूर.
१ मीर सरफराज अल्ली.
१ मैराळ बापूजी वकील.
१ बापशा दामोदर.
१ राघो बल्लाळ हुजूर पागेदार.
१ बापूजी अनंत चिटणीस.
१ श्री गजानन मैराळ भाऊ.
१ गंगाधर शास्त्री पटवर्धन.
१ माहादजी खंडेराव नगरकर.
१ हरि भक्तिशेट नगरकर पोतदार.
१ लल्लु मगन पारख सानडीकर.
१ आनंदराव गोपाळ जाहगीरदार.
१ पीलाजीराव गायकवाड.
१ तखतबाई गायकवाड.
१ सखाराम दाजी कानेटकर.

१ बाबाजी गोविंद पागेदार. १ जगाभाई रणछोडदास.
१ तातो रघुनाथ बंदरवाले.

येणे प्रमाणें कंपनी सरकार बहादरीवाले सरकार गायकवाड रा ज्यांत चाकर त्यांचे नावें आलाहिदा सनदा सरकारच्या आहेत त्या प्रमाणें पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवावें. गायकवाड सरकारांतून चालविलें जाईल.संवत् १८८८ मि० माघशु०१ छ १२ सफर.

मोहर.

In this wise, the holders of the guarantee from the Company (the Honourable East India Company) are in the service of the Gaekwar, and sunuds (deeds of grant) have been given to them in their names. The terms of them (sunuds) should be observed in respect to their sons and grandsons &c to any descent. The Government of the Gaekwar will observe them.

इंग्रजी
मोहर.

सदरीं लिहिल्या प्रमाणें ठराव जाहल्यावर पुढें आह्मांजवळ वे णीराम आदितराम हे दस्तुरी दर शेंकडा रूपया १ एक मागूं लाग

ले तें आह्मीं कबून न केल्यामुळें आह्मांवर अदावत ठेवून सरकारास आमचे विरुद्धतेचा मजकूर समजावून त्यांनीं दरबार सुद्धां कांहीं दिवस मना करविला होता. पुढें दरबार आह्मांस खुला जाहला. परंतु आमचे तर्फेचे सरकार दौलतीचे कामकाजांत कोणी कामदार मनुष्य घेतलें नाहीं. पुढ अजम सदर लार्डसाहेब बडोद्यास रेसिडेन्टसीचे कामावर आले त्यांही आमचा अहिवाल सर्व समजून घेतला तेव्हां सरकारास कळविलें कीं, आपण भास्करराव विठ्ठल यांजकडील पांडू विजापूरवाली पागा तुह्मी हजरीस मागून जबरदस्तीनें ठेवून घेतली ती त्यांस परत द्यावी असें जाहल्यावरून सरकारांही आह्मांस बोलावून आह्मांस आमचे कितीएक प्रकार दीलभरीचें वचन भगत बावा यांचे मार्फतीनें देऊन आह्मां पासून सदर पागे बद्दल संवत् १८९६ चे वैशाखशु० १५ चे मितीची रा० बाबदेवराव यांस समक्ष मध्यस्त घालून साहेबांस दाखविण्या करितां फारखत लिहून घेतली. पुढें सरकारांही आमची दीलभरी करून वचन दिल्या प्रमाणें सरकारी कामदार यांची व आमची आदावत पडल्यावरून त्यांही आमचा फायदा सरकारचे वचना प्रमाणें कांही एक होऊं दिला नाहीं. असो. श्रीमंत सरकार महाराज आमचा मानपान अब्रु इज्जत ठेवून चालवीत आले. शिवाय दरबारांतून बाबती वगैरे देववीत आले त्या वडिलांचे वहिवाटी पासून चालल्या प्रमाणेंः-

श्रीमंत सरकार स्वारीसमयीं सरकारचे मागें खवासखान्यांत बसण्याची आमची वहिवाट; व रेसिडेन्ट वगैरे साहेबलोक सरकाचे मुलाकतीस वाड्यांत येतील त्यांस सामोरे पायऱ्यापर्यंत जाण्याची वहिवाट व दरबार संबंधी श्रीमंत सरकार महाराजांस व साहेब लोकांस विडा, पान, सुपारी, अत्तर, गुलाब व हारतुरे आमचे हातून देण्याची वहिवाट, तसें रेसिडेन्ट साहेब प्रथम कामावर येतील त्यांस बडोद्यापासून पंधरा वीस कोसां पर्यंत सरकारी लवाजमा हुद्यासुद्धां पागा व हत्ती, डेरे, राहुटी सहित सामान आह्मां बरोबर देऊन

सामोरे पाठविण्याची वहिवाट. तसेंच मुंबईचे गव्हर्नर अथवा कलक्टर त्याचे जनरल साहेब बडोद्यास येतील त्यांसी ही सामोरे जाण्याची, दरबार समयीं त्यांस पान, सुपारी, हार तुरे देवविण्याची वहिवाट आमची आहे. सरकारांतून आमचे जिलीब व पालखी अब्दागीरी चे व दफ्तराकडील मेणकापडी व खारव्याचे रूमाल सरकार कापडी जामदारखान्याकडून दरसाल असत. व दसऱ्याचा पोषाख व दसऱ्याचीं बकरीं दरसाल सुमारें ६० व दीपवाळीकरितां रोषणाई बद्दल तेल व०८॥. व नाहाणाकरितां सुवासीक तेल व आंगाचा मसाला व दारूकाम व मातीचीं कोडियें सुमारें ५००० कुंभार याजकडून येत असत. व संक्रातीचीं सुघडें खण २५ व तीळ गूळ श्रीमंत सरकारांतून व फाल्गुनमासीं हुताशनी करितां शुभाचे गाडे सुमारें ५, बडोदें कमाविसींतून व तमासे फाल्गुन शु० १५ पासून व वद्य ५ पर्यंत पांच दिवस चालू दररोज येत असून वद्य ५ पासून पुढें चैत्र शुद्ध १ पर्यंत बेटला अगर तमाशे जसजसे मागवूं त्या दिवशीं येत असतात. व रंगाचे कचेरी करितां श्रीमंत सरकार स्वारी आह्मांकडे यावयाची चाल असे. तसें चैत्र गौरीच्या हळदीकुंकुवास श्रीमंत सौ. मातुश्री राणीसाहेब आह्मांकडे येत असत. तसें बडोदे कमाविसींतून वाळ्याचे पंखे २ व वैशाखमासीं अक्षय तृतीयेचे घडे सुमारें २५ व ज्येष्टमासीं वाड्याचे शाकारणी करितां नळीये सुमारे ५०००० पन्नास हजार व पिकलेले आंबे दररोज २०० प्रमाणें ज्येष्ट शुद्ध १ शुद्ध १५ पावेतो पंधरा दिवसाचे आंबे ३००० व श्रावण मासीं राखी व भाद्रपद मासीं बडोदे कमाविसींतन देव डांगर सावा व भाज्या असें ऋषिपंचमी करितां मिळत आहे. व आमचे तैनातीस सरकारी हत्ती राहत असे, त्यास चंदी, रातब व घांस व हत्तीचे सामान व गडेकरी व महात यांचा दरमहा सरकारांतून मिळत असे. व खासगी दरकांचे संबंधाने आमचे येथें कागदपत्र राहत असत. आणि त्यांच्या प्रती आह्मीं करवून त्यांजवर आमची नि-

शाणी होऊन ते कागद सरकारांत देत होते. पण त्या कागदांत कोणी अफरातफरी करूं नये सबब त्या कागदांच्या प्रती करण्याकरितां सरकार जामदारखान्याकडून कोरे कागदांच्या अमदाबादी टोकड्या सुमारे ६ सहा दरमहाचे दरमहा आमचेकडे येत असत. व त्या कागदांचे रखवाली करितां गाडद्याचे शिपाई असामी ४ व हवालदार येणेंप्रमाणें हत्यारबंद पाहारा आह्मांकडे राहत असे. आह्मांस जकातीच्या कोट्यावरील वगैरे अजीं माफी उभयसरकाराकडून चालत आहे, त्याविशीं परवान्याचे आमचे येथें दफ्तरीं दाखले उभयसरकारचे मोहोर शिक्क्यानशीं पुष्कळ आहेत, असे पुरावे असून हल्लीं आह्मास निमे माफी मिळत आहे, तरी येविशीं मागील वहिवाटीप्रमाणें सरकार कृपाळू होऊन चालवितील. तसे श्रीमंत सरकारांतून नागपंचमीचीं लुगडीं व भाद्रपदमासीं श्रीगणपतीचे उत्साहाचा पोषाख व मार्गशीर्षमासीं श्रीखंडेरावाचे उत्साहाचा पोषाख दरसाल मिळत असे.

असे प्रकारचा मानपान अबरू इजत श्रीमंत सरकारांही आमची चालवीत आले असून वेणीराम आदितराम यांस वकील दस्तुरी आह्मीं न दिल्यामुळें आह्मासुद्धां बाहेदारावाले यांजवर कित्येक प्रकारें अदावती ठेवून संवत १८९३ चे सालीं पुनः कलकत्त्याकडे जातों ह्मणून निघून गेले. आमचे वडील विठ्ठलराव भाऊसाहेब कैलासवासी जाहल्यावर श्रीक्षेत्र कर्नाळी येथें श्रीनर्मदा तीरीं जागा खेरदी घेऊन तेथें देवालय बांधून त्यांत श्रीविठ्ठलेश्वर महादेवाची स्थापना करून देवालयासभोंवती धर्मशाळा बांधिली आहे. त्या देवाची पूजा, नैवेद्याचा खर्च आमचे खानगी कडून आजपर्यंत चालत आहे. आह्मांस श्रीमंत सरकारांत दसरा, दिपावळी नजराण्याबद्दल व श्रीगणपतीचे उत्साहाबद्दल वगैरे बाबतीबाबद कापड व नक्त सरकार खानगी जामदारखान्याकडून उधार घ्यावयाचे त्या ऐवजीं रोख उक्ता ठराव संवत् १८९७ चे सालीं जाहला त्याचा तपशील.

१७०३ श्रीगणपतीचे उत्साहाबद्दल. सरकार स्वारी दर्शनास येते त्या बाबद.

८६१ कापड पोषाख लुगडीं खण.

१०० श्रीमंत राजश्री. महाराज.
५० श्रीमंत राजश्री. रावसाहेब.
२५ श्रीमंत राजश्री. आपासाहेब.
२० श्रीमंत राजश्री. नानासाहेब.
२० श्रीमंत राजश्री. दादासाहेब.
२५ श्रीमंत राजश्री. आबासाहेब.
३० श्रीमंत सौ. चिमणाबाई बयासाहेब.
३० श्रीमंत सौ. गिरजाबाई बयासाहेब.
२० श्रीमंत सौ. गुजाबाई.
२० श्रीमंत सौ. गजराबाई.
२० श्रीमंत सौ भागिर्थीबाई.
२० श्रीमंत सौ. अंबाबाई.
१५ सौ. बनूबाई घोरपडे.
१५ सौ. बायजाबाई कदम.
१५ सौ. गंगाबाई खानविलकर.
१५ सौ. गूजाबाई शिर्के.
१५ सौ. रमाबाई पवार.
१५ यमुनाबाई.
२५ भ माबाई.
१७ खुद.
८ सून.

२५

२५ कोंडाबाई.

१७ खुद्द.
८ मातुश्री रूजू कन्या.

२५

२५ गुलाबबाई.
१७ खुद्द.
८ मातुश्री.

२५

२० बीबान.
१३ खुद्द.
७ सून.

२०

३० बाळोजीराव आबाजीराव दर १५ प्रमाणें.
१५ यशवंतराव.
२५१ मानकरी मंडळी
९० जांवई.
१८ व्यंकटराव घोरपडे.
१८ तुकाजीराव कदम.
१८ दसरोजीराव शिर्के.
१८ मुकुंदराव पवार.
१८ गंगाजीराव खानविलकर.

९०

३० भगत बाबा.
२० खुद्द पोषाख.

१० स्त्रीस छुगडें खण.

३०

२११· जगतापा कडील बाया असामी ५ दर ४। प्र०
६ थोरात बाई असामी १.
५ मैनाबाई कानजरे.
५ भागाबाई कडू.
५ जाजादा बाई.
१५ घाटेबराकडील बाया असामी ३ दर ५ प्रमाणें.
१० मनाजी राजे शिर्के.
७ भाऊकाळे यांची स्त्री.
७ कदम विहीण.
७ शिर्की विहीण.
६ दादा शिर्के यांची स्त्री.
६ वाडीकर जाधव यांची स्त्री.
६ कानाजी राजे शिर्के.
६ महाडीक.
६ खानविलकर.
५ खंडेराव पवार.
·॥॥· भीमा व बहीण खण २.

२९१

८९१

६७५ दागीने सोन्याचे कडीं जोड२.
१ श्रीमंत महाराज यांसी.

श्रीमंत रावसाहेब यांसी.

२

ठराव. रूपये.

१०० गवई यांचे बिदागी बद्दल.
४२ कळवंतीणीचे ताफ्याचे बिदागी बद्दल
२५ पखवाजी गुरव यांस बिदागी बद्दल.

१७०३

१३८ नजराण्याबद्दल.
४६ दस-या बद्दल.
१ मोहोर नग १.
७ पुतळ्या.

८

रूपये

४६ दिपवाळी बद्दल.
१ मोहोर नग १.
७ पुतळ्या.

८

रूपये.

४६ संवत्सर प्रतिपदे बद्दल.

१ मोहोर नग १.
७ पुतळ्या.

८

१३८

८० मोहोरमचे फकीरी बद्दल.
५० श्रीमंत राजश्री महाराज.
३० श्रीमंत राजश्री रावसाहेब.

८०

२०० शिमगेपट्टी तमासगिरांचे बिदागी बद्दल.

२४० पहिलवान यांचे दरमहा बद्दल दरमहा रु० २० प्रमाणें.

२०० वाढ दिवसाबद्दल.
६० श्रीमंत राजश्री महाराज.
४० श्रीमंत राजश्री रावसाहेब.
३० श्रीमंत राजश्री आपासाहेब.
२० श्रीमंत राजश्री नानासाहेब.
२० श्रीमंत राजश्री दादासाहेब.
३० श्रीमंत राजश्री आपासाहेब.

२००

३२९ शिमग्याचे रंगाचे समारंभा बद्दल.
१०० श्रीमंत राजश्री महाराज.
४० श्रीमंत राजश्री रावसाहेब.

३० श्रीमंत राजश्री आपासाहेब.
२५ श्रीमंत राजश्री नानासाहेब.
२५ श्रीमंत राजश्री दादासाहेब.
३० श्रीमंत राजश्री आबासाहेब.
२० यमुनाबाई.
१५ बाळोजीराव.
१५ आबाजीराव.
१५ यशवंतराव.
१० बाळाबाई चिरडी.

३२५

११४ चैत्रगौरीचे हळदीकुंकुमा बद्दल.
२० श्रीमंत सौ. गिरजाबाई बयासाहेब.
२० श्रीमंत सौ. गिरजाबाई बयासाहेब.
८ श्रीमंत सौ. गुजाबाई.
८ श्रीमंत सौ. गजराबाई.
८ श्रीमंत सौ. भागिर्थीबाई.
८ श्रीमंत सौ. अंबाबाई.
७ सौ. बनूबाई घोरपडे.
७ सौ. बयाबाई कदम.
७ सौ. रमाबाई पवार.
७ सौ. गंगाबाई खानविलकर.
७ सौ. गुजाबाई शिर्के.
७ यमुनाबाई.

११४

३०००

सरहु प्रमाणें संवत १८९७ चे सालीं ठरा केला आहे. येणें प्रमाणें करार.

मुंबईचे गव्हर्नरसाहेब यांही आमचे नांवचें पत्र पाठविलें, तें अजम भास्करराव विठ्ठल मुक्काम बडोदें. सलामत.

मेहरबान दोस्तान येतोजादे मोहीबान खुसुमत व इतीहानीशा. अजदील ये खलास रैट हनराबल सर राबर्ट ग्रांट साहेब गव्हर्नर बहादूर बादे शोला कीमा फोक अलित सहीर नेस्तम शेहुद खातर अंदाहेमा आशीर्वाद कदेरी विला आमीही बानी तारीख ७ जूनचें पत्र पाठविलें तें पावलें. ऐसीयांस तारीख २३ मार्च सन १८३७ चे रोजीं आ दोस्ताचे घरीं जो मुकदमा बनून आला तो ऐकून इना जेबाचे दिलास बहुत नाखुषीचा बहेष जाहला. त्यास आमीही ज्या बाबे लिहिली त्याची चौकशी करावी म्हणून हुकूम केला आहे. दुसरें आपणास मालूम व्हावें जे. येविशींची चोकशी जाहली म्हणजे इनसाफाचे रूईनें योग्य नजेरेस येईल, त्या प्रमाणें बंदोबस्त करण्यांत येईल. कैलासवासी आपले वडील विठ्ठलराव बाबाजी हे मोठे योग्यतेचे मनुष्य. त्यांचे खानदानास बाहेदारी दिली आहे ती आपण जों पर्यंत नेक वर्तणूक करितील तों पर्यंत बराबर राहील, येविशीं आपली खातर जमा असावी. आलिजांहा पोलिटिकाल कमिशनर साहेब मोहीबांचें सर्व प्रकारें सर्व रक्षण करतील. व आपली मर्जी असल्यास आपले घरीं कांहीं गाडग्याचे लोक रखवालीस ठेवितील. वरकड हरहमेषा खतखडीत पाठवून दील आराम करीत जावें. र० छ ३ माह रविलाखर सुरूसन संमान सल्लासीन मय्यातेन व अल्फ. मु० तारीख ७ जुलई सन १८३७ इसवी. ज्यादा काय लिहिणें प्यार कीजे हे किताबत.

इंग्रजी साहेबाची सही.

वेणीराम आदितराम निघून गेल्यावर त्यांचे मागें काम काज पाहण्यास गोपाळराव भैराळ व गणेशपंत ओझे निसबत फडणीस हे

पाहूं लागले. पुढें संवत् १९०४ चे मार्गशीर्ष वद्य ७ रोजीं श्रीमंत गणपतराव महाराज गादनशीन जाहले. राज्याभिषेक संवत् मजकुरीं महि सफर छ ९ रोज ऊर्फ पौष शुद्ध १२ इंदुवासरीं जाहला. तेव्हां पासून रघुनाथराव धायबर व गोविंदराव पांडुरंग रेडे व गणेशपंत ओझे असे त्रिवर्ग काम काज करीत असतां संवत १९०६ चे आषाढ मासा पासून रघुनाथराव धायबर व गोविंद पांडुरंग व विठ्ठल खंडेराव तांबेकर कामकाज पहात असतां संवत् १९०७ चे सालीं रघुनाथराव धायबर यांस कमी करून गोविंदराव पांडुरंग श्रीमंत गणपतराव महाराज यांची स्वारी मुंबईस जाऊन संवत् १९०७ चे ज्येष्ठमासीं परत बडोद्यास आल्यावर गोविंदराव पांडुरंग यांस घरीं बसवीलें, आणि विठ्ठल खंडेराव तांबेकर कामकाज करीत होते. आह्मी मुंबईच्या स्वारींत श्रीमंत गणपतराव महाराज यांचे स्वारी बरोबर होतों. वेणीराम आदितराम वकील यांचे वेळेपासून जे जाहले कामदार यांस दिवाणगिरी आपल्यास मिळावी ह्या हेतूनें आमच्यावर अदावत बनेल त्या रीतीनें ठेवीत असत. रा० विठ्ठल खंडेराव तांबेकर यांचे कारकिर्दीत त्यांनीं श्रीमंत खंडेराव महाराज यांस खर्चाची नेमणूक करून दिली. त्यावर त्यांस कोणी कर्ज देऊं नये अशी समज बडोद्यांतील पारख वगैरे सर्वांस दिलेली. याजमुळें कारण परत्वें श्रीमंत खंडेराव महाराजांस खर्चाची अडचण पडूं लागल्यानें त्यांही आह्मांस सांगितलें कीं तुह्मी बाहेदारीवाले आहां. तुमचे कांही एक कमी कामदार यांजकडून व्हावयाचें नाहीं. ईश्वर सत्तेनें माझाही उदय काल होईल. तेव्हां सर्व गोष्टी तुमच्या आमच्या चांगल्या होतील. त्याविशीं तुह्मी कांहीं एक मनांत अंदेशा न आणितां ह्यावेळीं कर्ज रुपये बाराहजार पर्यंत आह्मांस द्यावे. वगैरे आमची दिलभरी पुष्कळ रीतीनें केल्यावरून मालक आहेत दैवयोगें कधीं चांगले दिवस त्यांस प्राप्त जाहल्यास आपलें स्मरण ठेवितील असें जाणून संवत् १९०९ चे अधिक भाद्रपद वद्य ९ शुक्रवारीं

त्यांस आमदाबाद येथील पारखाकडून पाराहजार कर्जाऊ देवविले. हें वर्तमान तांबेकर यांस कळतांच त्यांनीं श्रीमंत गणपतराव महाराजांस कळविलें कीं, सरकारचा हुकूम एकीकडे ठेवून भास्करराव विठ्ठल यांनीं खंडेराव महाराजांस कर्जाऊ रूपये बारा हजार दिले, त्यास ते बाहेदारीचे जोरानें वागतात. याजकरीतां हरतजवीजेनें यांची बादेदारी रद्द होईल तें करणें सरकारास अवश्यक आहे. याजकरितां आतां मजला कळलें, त्या रीतीनें ये विशींचा उद्योग करितों असें म्हणून श्रीमंत गणपतराव महाराजांचे मनांत आह्मांविशीं पक्कें विरूद्ध आणून आपण त्या उद्योगास लागले. परंतु ईश्वर कृपेनें वर्ष सहा महिन्यांत अजम औटराम साहेब बडोद्याचे रेसिडेंट यांचा व तांबेकर यांचा बेबनाव जाहल्यानें ते विलायतेस गेलेले परत बडोद्यास रेसिडेंटीचे कामावर यावयाचें ठरलें. तेव्हां आतां आपल्यास खराब करतील जाणून तांबेकर यांनीं अजम औटरम साहेब बडोद्यास येण्यापूर्वीच श्रीमंत गणपतराव महाराजांचा निरोप घेऊन बडोद्याहून निघून गेले. नंतर गोविंदराव पांडुरंग व गणेशपंत ओझे यांस कामकाजांत घातले. त्या उभयतांनी श्रीमंत गणपतराव महाराज यांचे मनांत आह्मांविशीं विरूद्ध असल्याचें सदरी लिहिलेले वाकबगारीवरून उभयतांनीं आह्मांवर आदावतीनें संवत् १९१२ चे सालीं तुफान उभें करून आह्मांकडील कारकून यास बदसल्ला देऊन सरकारांतून त्याजला नेमणूक करून देण्याचें कबूल केलें. आणि त्या कारकुनापासून श्रीजवळ शंकर हीं दोन अक्षरें आमच्या सारखीं बनावट तयार करून काम चालविलें. आणि अजम रेसिडेंट साहेब यांजकडे आह्मांस उभयतां कामदार यांनीं आपले बरोबर घेऊन गेले. तेथें आह्मांस साहेबांनीं विचारतां आह्मीं जबाबदिला कीं, दस्ताऐवजी कागदावर खालीं व श्रीजवळ वरती असे दोनही ठिकाणीं सही करण्याची आमची चाल आहे. असें असून हल्लीं कागद दाखवितां त्या कागदावर खालीं सही आमची नाहीं. श्रीजवळ शंकर हीं दोन अक्षरें केलीं आहेत, तीं आह्मीं केलेलीं नाहीं. आमचे नि-


शाणी सारखीं आहेत, याप्रमाणें जाब दिला. तेव्हां साहेबांनीं आह्मांस रुबरू सांगितलें कीं, तुह्मांकडे ये विशीं कांहीं नाहीं. तुमचे कारकुनानें लुंचेगिरी केली आहे. त्या कारकुनास कैद जाहली पाहिजे, ह्मणून उभयतां कामदारांस सांगून आह्मांस रजा दिली. याप्रमाणें जाहल्यावर उभयतांनीं मागाहून काय उलट मजकूर अजम रेसिडेंट साहेबांस समजावून त्यांजकडून कलकत्त्यास रपोट करविला. आणि त्या कारकुनासही कांहीं दिवस कैद ठेविले होतें. कलकत्ता सरकारानीं श्रीमंत गायकवाड सरकारचे कामांत आमचे वडील यांही कसकसा उपयोग केला आहे त्याबद्दल कंपनी सरकारानीं व गायकवाड सरकारानीं आह्मांस जे जे लेखपत्र करून दिले आहेत ते सर्व दाखले मुंबईसरकारांत आहेत. त्या विशीं तपासही केला नसून सदर बद्दल आह्मांसही कांहीएक विचारलें नाहीं. आणि एकदम आमचे बाहेदारींतून कंपनी सरकारानीं हात काढून घेतल्याबद्दल रेसिडेंटसिस तूर्त पाठविले. त्यांनीं सरकारांत लिहून कळविलें तो खबर आह्मांस दरबारांत बोलावून दिली. नंतर उभयतां कामदार यांनीं आमची नेमणूक बंद करून इनामी गांवें दोन मौजे कराळी व मौजे सोनेवाडी हे जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेप वंशपरंपरेनें आह्मांस इनाम असलेलेही जप्त केले. व आह्मीं आपले खर्चानें इमारती बांधून तयार केलेलीं देवस्थानें शहर बडोदें व सिद्धपूर व किल्ले कडी येथील तजविजी तजविजेनें सरकारांत ठेविली आहेत. असा आह्मांवर जुलूम होऊं लागल्यानें ये विशीं रेसिडेंटसिस आह्मीं इतला केला. त्याचें उत्तर आह्मांस मिळालें कीं तुमचे बाहेदारींतून सरकारानीं हात उठवून घेतला, सबब आतां तुमचे वडिलांचे यजमानाचे दरम्यानगिरींत आह्मीं हात घालूं सकत नाहीं, असा मिळाला. तेव्हां आमचा कोणी वाली नाहीं असें जाणून बसून राहिलों. पुढें संवत् १९१३ त श्रीमंत गणपतराव महाराज कैलासवासी जाहल्या नंतर श्रीमंत खंडेराव महाराज गादीनशीन जाहल्यावर संवत् १९१६ पावेतों उभयतां कामदार यांनीं कामकाज केलें. पुढें संवत् १९१७

चे सालीं गणेशपंत भाऊ ओझे यांस धरीं बसविले. नंतर गोविंद राव पांडुरंग रोडे हे भाऊ शिंदे सेनापती यांचे सल्यानें कामकाज करीत असतां संवत् १९१८ अव्वल मृगसालीं भाद्रपदमासीं आम्हांस श्रीमंत सरकारांत बोलावून पोषाख देऊन आमचे इनामी गांव दोन मौजे कराळो व मौजे सोनेवाडी जत केलेले आमचे आम्हांस दिले. आणि दरबारांत कचेरीचें वगैरे आमंत्रण सुरू केलें. त्या वेळीं सालाबाद सरकारांत दसरा दिपवाळी बदल व श्रीगणपतीचे उत्साहाबद्दल वगैरे बाबती बाबद कापड व नक्त सरकार खानगी जामदारखान्याकडून उधार द्यावयाचें त्या ऐवजी रोख उक्ता ठराव दरसाल रुपये ३००० तीन हजारांचा केला आहे. त्याबद्दल कामदार मशारनिल्हे गोविंदराव पांडुरंग रोडे यांही आम्हांस सांगितलें कीं तुमचो नेमणूक ६०००० साठहजारांची. त्यांचे पांच आणीचे मानानें दहा हजारांचो दोन गांवें व दोन हजार जिलिब पालखी बद्दल येणें प्रमाणें बाराहजार रुपये तुम्हांस द्यावयाचे ठरले आहेत. त्याप्रमाणें सालाबाद बाबती बद्दल तुम्हांकडून उघड द्यावयाचे रुपये ३००० तीन हजार ठरले आहेत. त्या तीन हजारांचो पांच आणीचे रुपये ६०० सहाशें तुम्हीं साल दरसाल तुमचे सर्व बाबती बद्दल सरकारांत देत जावे. याप्रमाणें आम्हांस कामदार यांही सांगून तेव्हां पासून आम्हांस सरकार खानगीजामदारखान्याकडून उधार नजराणे व श्रीमंत सरकारस्वारी श्रीगणपताचे दर्शनास आमचे येथें येते वेळीं कापड उधार मिळत आलें, तसे शिमग्याचे तमाशे आम्हीं मागविल्याप्रमाणें येत आहेत. बाकी बाबती राहिल्याबद्दल सुद्धां रुपये आम्हांपासून दरसाल घेत असून ठरावाच्या बाबती चालवीत नाहींत. आलीकडे सरकार दसरा, दिपवाळी व वर्ष प्रतिपदा ह्यातीनही नजराण्या करितां मोहर पुतळ्या सरकार खानगी जामदारखान्याकडून उधार मिळत असतां त्या सरटी माधवराव दिवाण यांनीं जामदार खान्याकडून मोहोरा, पुतळ्या कोणास उधार देऊं

नये. ज्यांच्या त्यानीं बाजारांतून खरेदी घेऊन नजराण्यास आणाव्या. याप्रमाणें जाहल्यावरून आह्मीं सरकारांत यादी देऊन काम चालविलें आहे, त्याचा निकाल जाहला नाहीं. आणि दरसाल रूपये सहाशें आह्मांपासून सरकार घेत आहेत, तरी हल्लीं ज्या बाबती सरकारांतून चालत, त्या बाबती बद्दल ठरावाप्रमाणें रूपये आह्मांपासून घेण्यांत येऊन जाजती राहिलेले रूपये सहाशांतून कमी केले पाहिजे. राजश्री गोविंदराव पांडुरंग यांस संवत्–१९२४ सन १८६७ चे सालीं घरीं बसविलें. आणि नारायणराव भाऊ शिंदे यांस धुरंधरनिधि असा किताब देऊन श्रीमंत खंडेराव महाराज यांही दिवाणगिरीचीं वस्त्रें त्यांस दिली. त्यावर संवत् १९२५ चे सालीं आह्मीं खटल्यासह पुष्कर तिर्थीं यात्रेस गेलों असतां लेखी रजा न घेतल्या बद्दल बहाणा ठेवून आमचे मागें पुनः त्याच सालीं दोनही गांवें जप्त केलीं. व आमचे घरच्या घोड्यांची खासपागा तैनात कडी शिबंदीच्या पेट्यांतील तीही पागा सरकारांत घेतली. त्यां तील शंभर घोडीं आमचीं खासगत होतीं व चांदीचीं सामानें व च्यारजामे व चोपदाराची छडी व भांडींकुंडीं दरोबस्त आमचीं असून आह्मांस मिळत नाहींत. तसें सदरपागे करितां लष्कर सादेर मुक्कामीं पागेचे छावणीस जागा सरकारांत आह्मीं रोख रूपये भरून खरेदी घेतलेली. ते रूपये अगर ती जागा आमची आह्मांस मिळणें वाजवी आहे. तसें सरकारांतून घोड्यांचे व सामानाचे वगैरे किमतीचे रूपये मिळत नाहींत ते ही मिळावे. संवत १९२७ चे मार्गशीर्ष शु० ६ तारीख २० माहे नवंबर सन १८७० रोजीं श्रीमंत खंडेराव महाराज कैलासवासी जाहले. नंतर श्रीमंत मल्हारराव महाराज गादीनशीन जाहले, आणि भाऊ शिंदे यांस कैद केले. नंतर त्यांचे प्रीतींतील बळवंतराव राहूरकर यांस आणविले. त्यावर त्यांचे मेहूणे शिवाजीराव खानविलकर यांस प्रतिनिधी केले. ह्या कारभारी कामदारांकडून राज्याची सुधारणा न होतां बखेडे होऊं लागले. तें प्रकरण हिंदुस्थान सरकारा पावेतों गेल्यावरून राज्याचे सुधारणे विशीं मुदत दिली. तेव्हां

महाराजांही इंग्रज सरकारास लिहून दादाभाई नवरोजी यांस आणविलें. तेव्हां कामकाज त्यांचे सल्ल्या प्रमाणें चालत नाहीं असी दादाभाईची खात्री जाहल्यामुळें त्यांनी कामाचा राजीनामा देऊन ते निघून गेले. नंतर मागील राहिलेले कामदार मंडळींनें त्यांचे मनास आलें तसें महाराजांस मत देऊन करूं लागल्यावरून राज्यांतील कित्येक लोक यांजवर जुलूम जाहला. ते रेसिडेंटशीस फिर्यादीही जाहले वगैरे कारणामुळें श्रीमंत मल्हारराव महाराजांस बडोदें येथील राजधानी सोडून मद्रासेस जावें लागलें. मागाहून त्यांचे मुलांसह उभयतां कुटुंबांसही महाराजांकडे मद्रासेस नेलें. त्यांचे मागें राज्याचा अधिकार इंग्रज सरकारचे वतीनें गव्हर्नर: जनरलचे एजंट आणि कमिशनर यांजकडे कमिशनांत सर्वांचे फिर्यादीचा तपास चालून सरलुईस पेली यांनीं आमचीं इनामी गांवें दोन व देवस्थानें आमचीं आह्मांस द्यावीं, संवत् १९३१ चे सालचे दोनही गांवचे उत्पन्नाचे रुपये १०००० द्यावे असा हुकूम जाहलेला तें लखाण सर राजे दिवाण सरटी माधवराव यांस बडोदें राज्याचे बंदोबस्ता करितां आणविलें. त्यांही येथें येऊन दत्तक कायम करून श्रीमंत सयाजीराव महाराज तारीख २७ माहे मे सन १८७५ मि० वैशाख शु० ७ संवत् १९३२ रोजीं गादीनशीन जाहल्यावर आमचे विशीं सदरीं लिहिलेला जाहलेला ठराव गव्हर्नर जनरलचे एजंट यांजकडून आणून सर राजे दिवाण सरटी माधवराव यांजकडे दिला. त्याप्रमाणें दोनही गांवांपैकीं मौजे सोनेवाडी परगणें घणदेवी हा गांव आमचा आह्मांस संवत् १९३२ चे सालीं दिला. आणि मौजे कराळी परगणें बडोदें हा गांव श्रीमंत लक्ष्मी बाई यांचे तैनातीस श्रीमंत मल्हारराव महाराजांही दिला होता, तो त्यांजकडे वहिवाटीस असल्यामुळें त्याचे रुपये ५००० पांच हजार सरकारतिजोरींतून तूर्त घेत जावे. पुढें श्रीमंत सरकार सयाजीराव महाराजांस पूर्ण अधिकार प्राप्त जाहल्यावर सदर गांव तुमचा आणि तुमचीं देवस्थानें आणि राहिलेले रुपये

तुह्मांस मिळतोल असें सरदार माधवराव यांनी आह्मांस सांगितलें. त्या प्रमाणे श्रीमंत महाराज सरकारास पूर्ण अधिकार प्राप्त जाहल्यावर सरकारांत विनंती करीत आहोंत. परंतु आद्याप त्याविशींचा खुलासा होऊन येत नाहीं तरी ह्या विशींचा खुलासा होईलच. कारण श्रीमंत मल्हारराव मद्रासेस गेले तेव्हां त्यावेळेस येथें राज्याधिकारी कोणी नाहीं. याजमुळें येथील सरदार व दरकदार सावकार वगैरे सर्व लोक दीलहवाल होतील त्यांस खात्रीलायक दीलाजा दिला पाहिजे असें जाणून इंग्रज सरकारांही जाहीरनामा प्रकट करून सर्वांस खबर दिली कीं, कंपनी सरकारानें ज्यापाशीं जसा करार मदार केला असेल ते ठराव दरोबस्त व तहनामे वगैरे इंग्रज सरकारानें बहाल ठेविली आहेत ह्मणून जाहीरखबरीनें कबूल केलें आहे, त्याजवर दृष्टि दिल्यानें सर्व लक्षांत येईल. याजकरितां श्रीमंत महाराज सरकारास पूर्ण अधिकार प्राप्त जाहला आहे, तरी आमची नेमणूक जी आह्मांस करून दिलेली तिचा सरकार तिजोरींतून देण्याचा बोज्या सरकारास आहे असें नाहीं. परभारें महालावर दायते करून दिले आहे तरी दरकसंबंधें दायत्यांची याद आहे. त्याप्रमाणें दायत्यांचा ऐवज आह्मांस मिळत आल्याप्रमाणें आह्मांस सालदरसाल वंशपरंपरेनें देवविण्याचा व आमचा गांव मौजे कराळी व सोनेवाडी ह्या दोनही गांवची सनद एकच आहे, सबब कराळी गांव आमचा आह्मांकडे सनदे प्रमाणें व देवस्थानें आमचीं आमचे खर्चानें बांधिलीं तीं येणे प्रमाणे निरंतर आह्मांकडे चालविण्यास श्रीमंत सरकार महाराज समर्थ आहेत. या गादीच्या स्थापनेच्या आदिकालापासून आजपर्यंत श्रीमंत गायकवाड सरकार यांच्या घराण्याच्या आश्रयानेंच दिवस कंठीत असून त्यांचें कल्याण चिंतीत आहों. मि० अधिक आश्विन शुद्ध १० संवत् १९४४ संवत् १९४५ तारीख १४ माहे अक्टोबर सन १८८८ हे विज्ञापना.




REFBK-0019385